म. ग्रं. सं. ठाणें
विषय भूप्रवास
सं. क.
REFBK-0015040



द. वि. जोगळेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७५०८०
ग्रंथ शाखा (ठाणे ग्रं)

# पहाड, पाणी आणि परी

REFBK-0015040

दा. वि. जोगळेकर

भारतीय प्रकाशन मंदीर
मुंबई ४.

© सौ. विमल दा. जोगळेकर

प्रकाशक :
मोहन शंकर कुलकर्णी
भारतीय प्रकाशन मंदीर
मुंबई ४.

मुखपृष्ठ : चित्रकार र. स. कंटक

छायाचित्रें : स्वतः लेखक

मूल्य तीन रुपये

मुद्रक :
चिंतामण वामन जोशी
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग–कुलाबा.

माझी दोन तपांवरील
सहचारिणी
सौ. विमल हीस—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

# जरा एक मिनिट...

नुकताच मी कष्मीर-कांगडा-कुलूच्या प्रवासाहून आलो होतो. 'निळें नंदनवन' या माझ्या कष्मीरच्या मार्गदर्शिकेची पहिली आवृत्ती कित्येक वर्षांपूर्वी संपून गेली होती. आणि माझे मित्र श्री. शंकरराव कुलकर्णी यानीं त्याची दुसरी आवृत्ती काढण्याबद्दल सुचविलें, त्यावरून हें पुस्तक लिहिण्याची कल्पना सुचली. त्यांनींच प्रसिद्ध करण्याचें मनावर घेतलें. म्हणून हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. त्याचप्रमाणे माझे जेष्ठ मित्र श्री. आण्णासाहेब महाशब्दे (या पुस्तकांतील आण्णा) श्री. पुरुषोत्तम धाक्रस व श्री. चिंतामणराव जोशी यांचीहि मदत झालेली आहे, परंतु त्यांचे आभार मानणें त्यांस आवडणार नाहीं.

दत्त जयंती, शके १८८७
दिनांक ८ डिसेंबर १९६५
३७७ वि. प. रोड, मुंबई ४

दा. वि. जोगळेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ७५०४७
ग्रंथ संख्या स्थल

## ‘...टी अ र मे ल’

ऑक्टोबर १३, १९६४

**आण्णा** नि मी. दोघेच अखेर कुलू खोऱ्याच्या “ यात्रे ” ला निघालों.

जायचें नक्की ठरल्यावर तिकिटांच्या चौकशीला लागायलाच पाहिजे होतें. चौकशीअंतीं समजलें कीं पुढील दोन आठवड्यांची फ्रन्टीअर मेलची, सगळ्या वर्गांची, सगळीं राखीव तिकिटें संपलेलीं आहेत.

झालें ! आली आतां सहलच रद्द करायची वेळ ?

“ उडत ” जायची आमची ताकद नव्हती. शिवाय बघत बघत जायचें म्हटल्यावर उडता प्रवास काय कामाचा ? तेव्हां कांहीं शौकिन मुलें शाळा–कॉलेजांच्या फाटकांशीं “ लाईन मारीत ” घुटमळत उभीं असतात ना, तसा तिकिट ऑफीसच्या खिडक्यांपाशीं मी ताटकळत उभा राहूं लागलो. आणि अखेर जमलें. एका गृहस्थानें फ्रन्टीअर मेलची दोन तिकिटं परत करतांना मी पाहिली. खिडकीपलीकडल्या “ मण्डळी ” ना नर्म आणि चाटु वचनांनीं विनंती करीत माझा वेटिंग लिस्टचा अर्ज परत आलेल्या तिकिटांच्या माहितीसह पुढें सरकावला.

अर्जावरची आमची नांवें वाचून ‘ एक नवल वर्तलें. ’ “ अय्या ! तुम्ही अमक्याचे तमके काहो ? ” माझ्या रोखानें खिडकीच्या आंतून प्रश्न आला, नि आमचा प्रश्न सुटला. चक्क ओळखच निघाली. तिकिटें खिशांत पडलीं.

पहिल्या वर्गाची तिकिटें मिळाली, तीं मी घेतली होतीं. अण्णांना ही गोष्ट कितपत आवडेल याची धाकधूक मनांत होती. असा सहज सढळ हातानें खर्च करण्याची आम्हांला संवय नव्हती. अमूक तारखेच्या आतली तिकिटें मिळाली तरच घ्यायची अशा मर्यादा घालून घेणें भाग पडलें होतें. दिवाळीला आम्हांला

मुंबईस परतायलाच पाहिजे होतें. जेमतेम तीन आठवडे मिळत होते, आणि ठरविलेल्या मर्यादेंतील शेवटल्या दिवसाची म्हणजेच आजची पण पहिल्या वर्गाची तिकिटें मिळाली होती.

पण या पहिल्या वर्गाच्या तिकिटांबद्दल अण्णानीं भलताच मुद्दा उपस्थित केला.

“ कांहीं म्हटलंत आबा, तरी हीं पहिल्या वर्गाची तिकिटें माझ्या स्वास्थ्या-साठींच काढलेली आहेत.” अण्णांनी भलताच गैरसमज करून घेतला होता. त्यांच्या स्वास्थ्यासाठीं मला पहिल्या वर्गाच्या तिकिटांचा भुर्दंड पडला असें त्यांचें म्हणणें. परंतु वस्तुस्थिती तशी नव्हतीच मुळीं.

“ अहो आण्णा ! ईश्वरसाक्ष खरं सांगतो. स्लीपरकोच वगैरे दुसरी कोणतीच तिकिटं मिळाली नाहींत. आणि त्यांत विशेष असं काय आहे ? मलाहि अलि-कडे पहिल्या वर्गाचीं तिकिटं काढावींच लागतात. ”

“ ती तुमच्या मण्डळींच्या स्वास्थ्यासाठीं हो ! ”

“ म्हणजे ? मला काय स्वास्थ्य टोचतं ? ”

“ तुम्ही काय ! व्यायाम-आसनंवाले ! ”

“ तसं नाहीं हो आण्णा ! मला सुद्धां अलिकडे आराम हवासा वाटतो. तरुण का आहे मी आतां ? आणखी आठ-नऊ वर्षांनीं तुमच्या सध्यांच्या वयाचा झालो म्हणजे तुमच्या इतपत तरी माझी चपळता राहील कीं नाहीं कुणास ठाऊक ! ”

“ तुम्हीं आहांत म्हणून ! नाहीं तर खरं म्हणजे कोणत्या तरी प्रवासी कंपनीच्या डब्यांतूनच आम्ही जायचे.”

“ मला नाहीं वाटत ती तीस दिवसांत चाळीस गांवांची सहल तुम्हांला आवडेल. त्यांच्या बांधलेल्या कार्यक्रमाच्या खुंटाच्या परिघांत फिरत राहाणं तुम्हांला मुळींच मानवणार नाहीं. ‘ पारतंत्र्यांतील सुराज्यापेक्षां स्वातंत्र्यांतील गोंधळ परवडला ’ पक्षांतले तुम्ही.”

“ पण आतां उतार वयांत उरक नाहींसा झाला तर काय करावं आमच्या सारख्यांनीं ? शिवाय मोठमोठ्या मान्यवर व्यक्तींनीं या प्रवासी कंपन्यांना दिलेली शिफारसपत्रें वाचल्येत ना तुम्हीं ? ”

“ वाचल्येत ना ! त्यांच्या खरेपणाबद्दलहि मला शंका नाहीं. ज्यांना उरक

नसेल त्यांनीं खुशाल जावं त्या डब्यांतून. परंतु एका मान्यवर भटक्यानं एकदां जाऊन आल्यावर पुन्हा कानास खडा लावून घेतला आहे तें माहीत आहे ना?'

"तें खरंच आहे. शिवाय खर्चाच्या बाबतींत डावं उजवं कसं काय असतं त्याची कल्पना नाहीं कांहीं.'

"वा! या आघाडीवर तर आपली निश्चित सरशी आहे. त्यांच्या तिसऱ्या वर्गाइतका स्वस्त आपला पहिला वर्ग स्वस्त ठरेल. कितीतरी अनावश्यक खर्च आपण टाळूं शकतो. त्यांना ते टाळतां येत नाहींत. त्यांचे कांहीं खर्च फुकट जातात. व्यवस्थापनाचा खर्च असतोच. शिवाय त्यांचा तो धंदा आहे. ते पैसे जास्त घेतात अशी तक्रार असूंच नये. मुख्य प्रश्न आहे तो म्हणजे खऱ्या भटक्याला तें मानवतं का नाहीं, हा आहे."

"तुम्ही स्वतंत्रपणं जाऊन कांहीं विशेष बघतां असं का तुमचं म्हणणं आहे?"

"तो थोडासा आपल्या मानण्याचा प्रश्न आहे. परंतु एवढं मात्र नक्की कीं आम्ही आम्हाला हवं तेंच बघतों. मनसोक्त बघतों. महत्वाचं, गौण आमचं आम्ही ठरवितों. आमचे आयोजक नियंत्रक आम्हीच असतों. आहो, ही डब्यांतलीं प्रवासी मंडळी प्रवासांतच मला पुष्कळ वेळां भेटली आहेत. काय काय पाह्यलं ते मोठ्या चवीनं सांगूं लागतात. आणि आपल्याला असं आढळतं कांहीं वेळां कीं त्या चवींत मीठच राहून गेलेलं असतं. त्या बिचाऱ्यांच्या ते गांवींही नसतं. मीहि त्यांचं 'अज्ञानांतील सुख' तसंच त्यांच्यापाशीं राहूं देतो. उगाच ढका लावून त्यांच्या रंगाचा बेरंग कशाला करा! खरं म्हणजे आण्णा, या प्रवासांतील ऐतेपणच मला बोचतं. प्रवास कसा स्वकष्टार्जित हवा! तरच तो प्रत्ययकारी ठरेल. जीवन कांहीं समृद्ध झाल्यासारखं वाटेल. ऐता प्रवास कितीहि सुखदायक असला तरी तो म्हणजे गाद्यागिरद्यांवर लोळणारांनीं खाल्लेला पौष्टिक खुराक."

"तुमच्या या सगळ्या गोष्टी अगदी खऱ्या आहेत असं आपण धरून चालूं. परंतु उत्साहाच्या भरांत एक गोष्ट मात्र विसरू नका."

"अशी मी विसरण्यासारखी कोणती गोष्ट बुवा!"

"सांगून झालेलीच पुन्हा आठवणीकरतां सांगतोय. तुमच्याबरोबर माझ्यासारखा एक म्हातारा आहे हें लक्षांत असूं द्या. मला झेपेल इतपतच तुमची झेंप असूं द्या म्हणजे झालं!"

" आतां काय सांगायचं तुम्हाला आण्णा ! माझ्या प्रकृतीबद्दल तुमचा अगदी गैरसमज आहे. तुम्हाला जाववणार नाहीं त्याठिकाणीं मीहि जाणार नाहीं असं आपलं ठरलंच आहे. पण हें सुद्धां एक ढोंग आहे. तुमच्या नांवाखालीं मी मलाच जास्त जपणार आहे. तुम्हाला वाटतोय तितका टणक्या कांहीं मी आतां राहिलेलो नाहीं. "

तसे गेलीं दोन-तीन वर्षं आम्हीं बोकत आहोंत. एकदां कुलू खोऱ्याची यात्रा करून येऊं या. परंतु योग जमून येत नव्हता. दरवर्षी कांहींना कांहीं अडचणी यायच्या. म्हणजे यावर्षी आल्या नाहींत असें नाहीं. उलट जास्तच आल्या. ( असें म्हटल्याशिवाय कर्तृत्व उठून दिसत नाहीं ने ? ). परंतु ठरतां ठरवितां ऑक्टोबर महिना उजाडला. कांहीं दिवसांनीं दसराहि उजाडेल. दसऱ्याला सीमोल्लंघन करायचें असतें. पण याला हिमप्रदेश अपवाद असतो. 'जनरल विंटर' शी मुकाबला करायला कुणी तयार नसतें. चीनसारखा शत्रू सुद्धां ! एकूण हिमप्रदेशांत जाण्याचा हंगाम संपत आला होता. आणि रेल्वेच्या सवलतीच्या तिकिटांचा सुद्धां. तेव्हां निघायचें तर तावडतोब निघायला पाहिजे होतें.

" कुलूला आपण जातोच आहोत तर एकदां रेकॉर्डला लावण्यापुरतं तरी आम्हाला कश्मीर दर्शन घडवा कीं ! " असें आण्णांनीं म्हटल्यावर या तीन आठवड्यांत थोडेसें कश्मीर आणि बरेचसें कुलू-खोरें पाह्यचें आम्ही ठरविलें. दोन्हीकडील आराखडा तीन आठवड्यांत बसवायाचा ! मोठें कठीणच काम होतें ! माझी कश्मीरची सहल नऊ वर्षांपूर्वी चांगली महिनाभर सवडीनें झाली होती. पण त्रेसष्ट वर्षांचे आण्णा, कश्मीर पाहायला म्हणून थोडेच पुन्हा निघणार होते ! शिवाय पाहाडांतील उंच उंच ठिकाणं पायीं अगर घोड्यावरून जाऊनहि त्यांना झेपण्यासारखी नाहींत. तेव्हां कश्मीर सहल, प्रवासीकंपनीच्या डब्यांतल्या सारखी उरकायची; आणि कुलू मात्र हौसेमौजेनें त्यांतल्यात्यांत सावकाशीनें पाहायचें असें ठरविलें.

ऐन विशींतल्या प्रवासांची आज आठवण येते. मुंबई-महाबळेश्वर ही आमची सायकल-ट्रिप दोन अडीच रुपयांत भागायची. थोडेसे हाल होत असत जिवाचे. पण त्या वयांत त्यांची क्षिती बाळगत होता कोण ? एक वर्ष तर सायकली मराठवाड्यापर्यंत हाणल्या होत्या.

अलिकडे दहा पंधरा वर्षांत झालेल्या सहली मात्र त्यामानानें आरामांत झाल्या. ब्रह्मचर्याश्रमांतील सहलींच्या मानानें या सहकुटुंब सहली आरामांत व्हायच्याच. यांतहि एक मख्खी असते. स्त्रीदाक्षिण्यापायीं आपल्या वाट्याला येणारा आराम, हालांच्या सरहद्दीवरचाच असतो.

प्रौढपणांतले कांहीं दौरे पुढाऱ्यांच्या ऐटींतहि झाले आहेत. म्हणजे दस्तुर खुद्द पुढारी किंवा व्ही. आय. पी. आहेत असं नव्हे. तसे मुळींच नाहीं. गैर-समज नसावा. परंतु माणूस एकाद्या ' मिशन 'वर गेला म्हणजे त्याची बडदास्त पुढाऱ्यासारखी आपोआपच ठेविली जाते कीं नाहीं ? तसे फुकट भाव खाण्याचे योग कांहीं वेळां आले आहेत, इतकेंच !

आतां पन्नाशीनंतर सुद्धां भटकायची हौस कायम आहे. आपण काय काय पाहिलं आहे त्याच्यापेक्षां काय काय पाहायचं, राहिलं आहे त्या स्थळांची यादी मनांत घोळत असते. या सर्व आठवणी, हाल अपेष्टायुक्त आणि सुखमय प्रवासांच्या, आतां रवंथ करायला बडा मजा येतो !

इंजिनांतल्या कोळशाचे कंकर एवढ्या बंदोबस्तातूनसुद्धां किती हे आंत आले आहेत ! कदाचित वातानुकूल डब्यांमध्येंच फक्त त्यांना मज्जाव असेल. बाकी सर्वत्र त्यांचा संचार चालू आहे.

दमण गंगा मघांशीच पार केली आहे. हे प्रांतांतर क्रमांक एक. उद्यां सकाळीं आम्हीं उठूं तेव्हां प्रांतांतर क्रमांक दोन झालेले असेल. राजस्थानांत असूं तेव्हां आम्ही.

♣ ♣

'फ्रंटीअर मेल'

..............................................................................

*ऑक्टोबर १४, १९६४*

**भारताच्या** राजधानीवरून गाडी नुसती गेली! राजधानींत पाय सुद्धां आम्ही ठेवला नाहीं. तरी सुद्धां राजधानीचें वारें जाणवलें. इथें भोजनगृहाचा डबा लागला. ऑर्डरवाल्यानें आमच्या नुसत्या चहाच्या ऑर्डरकडे साफ दुर्लक्ष केलें. बरोबर दोन टोस्ट आणायला सांगितल्याबरोबर दोन मिनिटांत सर्व सामानाचा ट्रे आला. टोस्टचा भुर्दंड फुकट भरावा लागला. फुकट म्हणजे आमच्या जवळ घरचें फराळाचें भरपूर असतांना. दुपारी जेवण भरपेट झालें होतें.

राजधानीवरून जातांना राजधानीच्या आठवणी अपरिहार्य होतात. मुंगल-कालीन पादशाही-राजधानीच्या आणि आतांच्या लोकशाही राजधानीच्या दंतकथा आणि 'किस्से' यांच्यात तुलना केली तर आतांची राजधानी संख्येत आणि 'गुणवत्तेत' सुद्धां पूर्वीच्या राजधानीवर मात करील कदाचित्. स्थल-कालांत, नांव रूपांत बाह्यतः फरक पुष्कळ झाला आहे. परंतु राजधानीच्या अंतःस्वरूपांत फार थोडा फरक आढळून येईल.

त्याच चोरवाटा, तींच कळीचीं दारें नि तशींच भुयारें यथापूर्व आहेत. यांची माहिती नसल्यास बिनमाहितगारास पूर्वीप्रमाणेच तटाबाहेर उभें राहावें लागतें. कुळवंतिणी, कलावंतिणी नि कुणबिणी त्याच आहेत. बादशहाची जरा कुठे कमजोरी दिसली तर सिंहासन बळकावूं पाहाणारे महत्वाकांक्षी शहाजादे आहेत. आणि सिंहासनावर कोणी येवो कोणी जावो, आपलें आसन संभाळून राहाणारे सचीव तसेच आहेत. संधी मिळाली कीं कुटिल कारस्थानांना तसाच ऊत येतो.

लोकशाही नि समाजवाद यांचीं तत्वें, थोर चिंतक सांगून गेले आणि सांगत

आहेत. ज्यांच्यापर्यंत तीं पोचलीं आहेत त्यांतील बहुसंख्य तीं स्वतःच्या महत्वाकांक्षेकरतां राबवतात. बाकीच्या अफाट जनसमुदायापर्यंत तीं पाझरलीच नाहींत. आपण म्हणतों जग बदललं आहे, बदलत आहे. किती पण ? न कळण्याइतपत ! महत्वाकांक्षी माणसांतला जंगलीपणा जवळ जवळ तसाच आहे. सामान्य माणसाचें सामान्यपण आहे तसेंच आहे. मतलब, राजधानींतील बलप्रयोग ( व्यक्तिगत ऐवजी आतां सामूहिक, एवढाच फरक ! ) यथापूर्व चालू आहेत.

गाडी आतां ऐन पंजाबात आली आहे. बाहेरचें कांहीं सुद्धां दिसत नाहीं. परंतु कांहीं पाहायचें चुकणार आहे म्हणून चुकचुकायचं कांहीं कारणच नाहीं. मधूनच दिसणाऱ्या गावांतील घरांचे कृत्तिका नक्षत्रांसारखे पुंजके आणि चहूबाजूला वाटोळी क्षितिजें या शिवाय या मैदानी मुलखांत, या द्रुतगती गाडींतून बघण्यासारखें असतें तरी काय ! खंडाळ्याचा घाट नाहीं, डुंगरगडचें जंगल नाहीं; कोट्या जवळचे रंगीबेरंगी खडक नाहींत, इतकेंच काय पण वाडी-हैदराबादकडे दिसतात तशा खेळांतल्या बुडकुल्यांप्रमाणें एकावर एक चढलेल्या प्रचंड शिळा सुद्धां नाहींत. शतलूज मात्र रात्रीच्या झोपेंत ओलांडली जाणार असल्यामुळें पाहायची चुकणार आहे. बियास सकाळीं भेटणारच आहे.

दिल्लीला आमच्या कंपार्टमेंटमध्यें सैनिकी कचेरींतील एक डोगरा तरूण आला आहे. गोरा ! तरतरीत ! कांतिमान ! किती देखणा आहे ! जम्मूचा ना तो ! जम्मू-कष्मीरमधील झाडूवाले नि मेहेतर (यांना तिकडे जमादार म्हणतात.) आपल्यापैकीं बहुतेकांपेक्षां ( आमच्यापेक्षां तर नक्कीच ) देखणे असतात. कष्मीर आम्हांला उद्यां दिसायचं आहे. परंतु त्या प्रांताच्या इतिहास भूगोलांतील ' टोपोग्राफी ' मात्र आतांच नजरेसमोर तरळूं लागली आहे. बाहेरचें कांहीं दिसत नाहीं. साहजिकच दृष्टि अंतर्मुख बनत आहे.

समोर दिसतें आहे तें पामीर पठारावरून आलेल्या आर्यांनीं वसविलेलं कष्मीर. कष्यपमीर-कष्मीर ! वुल्लर सरोवराचा दीड हजार चौरस मैलांचा जलमय प्रदेश. यांतून झेलम-वितस्तेचा कालवा काढून पाण्याचा निचरा केल्यावर वस्ती करण्यास योग्य असा हा भूभाग ज्या इंजिनियरानें बनविला त्या ऋषिवर्य कष्यप मुनीचा हा कष्यपमीर-कष्मीर ! वैदिक कालांत ज्यानें मार्तंडेश्वराचें अफाट बेलाग शिळांचें सूर्यमंदीर उभारलें त्या राजा रामदेवाचें कष्मीर ! सम्राट ललितादित्याचें नि अवंतीपूरच्या अवंतीवर्म्याचें कष्मीर ! झुलकादरखां,

आझादखां नि मदादखां या मोंगली जुलमी सुलतानांचे कश्मीर! यांच्या जुलमानें नि भयानें वनवासास गेलेल्या हिंदूंना अभय देऊन ज्यानें त्यांचें पुनर्वसन केलें त्या झैन्-उल-अबदीनचें, त्या परधर्म सहिष्णु मोंगली थोर सुलतानाचें कश्मीर! अकबरादि दिल्लीपतींचें कश्मीर! पंजाबच्या प्रतापी राणा रणजितसिंगाचें कश्मीर! आणि अखेर जम्मूच्या गुलाबसिंगादि डोगरा राजांचें कश्मीर!

या डोगरा तरुणानें ही मालिका चालविली. या तरुणाच्या सामानाचे केव्हढाले ढीग समोर पसरले आहेत! जाणें-येणें मुष्कील झालें आहे. हा रजा घेऊन चालला आहे आपल्या घरीं, जम्मूला. आणि आमचा मुंबईपासूनचा सहप्रवासी नारायणन् तोहि रजा संपवून कामावर रुजू व्हायला चालला आहे जम्मूलाच. परंतु याचें सामान म्हणजे नुसती ट्रंक-वळकटी. त्याच्या उलट, घरच्या माणसांना नाना भेट-वस्तू देऊन खूष करण्यासाठीं कनवालनें पेटारे भरून आणले आहेत. आणि नारायणन् ते रिकामे करून आला आहे. आपल्या प्रेमाच्या नि लोभाच्या सुहृदांना भेटायला चाललेल्या कनवालचा चेहरा कसा फुललेला आहे. उलट त्यांचा निरोप घेऊन आलेला नारायणन् प्रौढ असून सुद्धां कालपासून विमनस्क, उदास आहे.

आज स्नान भोजनोत्तर झालें. उद्यां बहुधा स्नानाच्या गोळ्याच घ्यायला पाहिजेत. परवां श्रीनगरास पोचल्यावर स्नान होईल. दोन स्नानांतील अंतर कमीत कमी असावें म्हणून आज उशीरा स्नान. कांहींतरी आपलं मनाचं समाधान! कोळशाच्या किटाळानें या पहिल्या वर्गाच्या डब्यांत सुद्धां नुसता धुमाकूळ मांडलाय. जंक्शनवर मेहेतरकडून साफ करून घेतां येतें. पण तोपर्यंत हात जोडून पाहात थोडंच राहावतं! म्हणून एक झटकणें बनवलेंय. मळखाऊ म्हणून आंध्रच्या तांबड्या कापसाच्या सुताचा कुडता घातला आहे. पण किटाळानें त्याचा सुरेख ' मॉटल ग्रे ' रंग बनविला आहे.

सकाळीं कोटा जंक्शनवर गाडी थांबल्यावर बाळ पंडिताची आठवण झाली, आणि स्टेशन मास्तरच्या खोलींत जाऊन त्याचा ठावठिकाणा विचारला. मास्तर कांहींच बोलले नाहींत. परंतु त्यांनीं टेलिफोन जोडून ' बोला ' म्हणत टेलिफोनचा रिसीव्हरच माझ्या हातीं दिला. पंडित घरीं भेटला हेंच आश्चर्य. वहिनीहि घरीं होत्याच. स्टेशनवर येऊन भेटण्यास त्यांना आतां वेळ उरला नव्हता. तीं पोहोचायच्या आंत गाडी सुटली असती. आधीं कळविलें नाहीं म्हणून त्यांनीं

दूरध्वनी वरून शंखध्वनी केला. कळविलें असतें तर वहिनींनीं कदाचित स्टेशनवर भेटायला येतांना कसला तरी डबा भरून आणला असता. गरम गरम घरची न्याहारी झाली असती. सगळं खरं ! पण मला हें जमत नाहीं. आधीं लिहून स्टेशना-स्टेशनांवर माणसांचा घोळका जमा करणं. त्यांतली किती मनापासून येतील, किती भीड पडून येतील हें सांगतां येत नाहीं. त्या पेक्षां त्या भानगडींतच न पडलेलें बरें !

आश्चर्य असें कीं आण्णांनींहि वाटेंतल्या कोणत्याच गावीं कुणा इष्टमित्राला कळविलें नव्हतें.

"काहो आण्णा, तुम्ही कां कुणाला कळविलं नाहीं ?" मी आण्णांना गाडी कोट्याहून पुढं गेल्यावर विचारलें होतें.

"कशाला कळवायचं ?"

"दिल्लीला तरी निदान रात्रीचं जेवण, नाहींतर गरम गरम थालीपीठ मोटारींतून आलं असतं !"

"असं ? तुमचा काय अनुभव आहे, तो तुम्ही मला इतक्या वेळां सांगितलात. तरी सुद्धा मी कळवायला हवं होतं ?"

"माझ्यापेक्षा तुमची गोष्ट निराळी आहे."

"कांहीं निराळी नाहीं."

"माझ्या एका दूरच्या नातेवाईक मुलानं मनमाडला पहाटेस आम्हांला जोंधळ्याची भाकरी, चटणी आणि दूध आणून दिल्याचं पण सांगितलं होतं ना ? अजून त्याची आठवण येते."

"अशा आठवणी किती ?"

"अपवादात्मकच ! पण आठवतात त्याच, पुन्हा पुन्हा."

"बरं मग, तुम्ही कुणाकुणाला कळविलंत ?"

"कुणालाच नाहीं."

"झालं तर मग ! उगीच कुणाला भीड पडायला नको !"

इतर मोठमोठ्या शहरांप्रमाणें या कोट्याच्या परिसरांत सुद्धां धुरांडी निचिमण्या दिसूं लागल्या आहेत. औद्योगीकरण म्हणजे समृद्धी असं समीकरण आहे ना हल्लींच्या युगाचं ? कृषिप्रधान भारताला अन्नधान्याबाबत अवलंबून राहावं लागत आहे तें मात्र उद्योगप्रधान अमेरिकेवर ! केवढा विनोद आहे ?

भयंकर विनोद आहे हा ? परदेशी माणसाला हें समजल्यावर (आणि तें समजतंच ) आमच्या पंचवार्षिक योजनाक्रमाचें किती कौतुक वाटत असेल !

दुपारीं मथुरा जंक्शन आलें. तिथं न उतरतांच मथुरा आणि वृंदावन या दोघांची तुलना मनांत सुरू झाली. मथुरेंतील भांडखोर नि शिरजोर चोबे आणि तिथली दुर्गंधी या दोनच गोष्टी नजरेसमोर आल्या. उलट वृंदावनाच्या आठवणी किती प्रसन्न होत्या ! बाबूजींचें आरसपानी मंदिर तर रंगनाथाचें काळ्या पाषाणाचें. ती कुंजगली ! तो कंदबवृक्षाखालचा डोह ! ती मीराबाई ! यांच्या सभोवतीच्या आणि त्यांत गुरफटलेल्या दंतकथा, कशा सजीव वाटतात ! गोरसाची स्वस्ताई नि शुद्धता आठवून तोंडाला आतांहि पाणी सुटत आहे. गाडी हलली तेव्हां तो गोपालकृष्णाचा परिसर दृष्टीआड झाला.

उद्यां आम्ही कष्मीरच्या हद्दींत शिरणार आहोंत. त्या आधीं कांहीं खास कष्मीरी शब्द आण्णांच्या कानावर घालून ठेवायला हवेत. नाहींतर ‘ चष्मा ’ आणि ‘ नाग ’ हे शब्द भलत्याच संदर्भात ऐकूं आले कीं चेहरा कोराच राहतो. ‘ चष्मा ’ म्हणजे डोळ्यांना लावायचा नव्हे आणि ‘ नागा ’वर दहाचा आंकडाहि दिसायचा नाहीं. चष्मा म्हणजे लहान झरा (पुष्कळ वेळां पन्हळी अगर नळी लावलेला). आणि नाग म्हणजे मोठा चष्मा अगर त्यांचा समुदाय. पुष्करिणीच्या तळाशीं असतो तसा. ‘ बल ’ म्हणजे तळें किंवा सरोवर. ‘ सार ’ म्हणजे मोठें सरोवर (अमसुलाचं किंवा चिंचेचं, भुरकायचं सार नव्हे.)

हाऊस बोट आणि शिकारा यांचीहि मंडळी गल्लत करीत असतात. हौसबोट म्हणजे नांगरलेलें अगर तारांनी बांधून ठेवलेलें पाण्यांतील तरंगतें नौकागृह—आणि शिकारा म्हणजे होडकें. सामानाचा शिकारा आपल्या होडक्यासारखाच असतो. परंतु प्रवाशांचा शिकारा म्हणजे लहानशा मंडपीखालीं, अलीशान बैठकी घालून भोंवताली सरक पडदे असलेली सपाट तळाची होडी.

♣ ♣

## ‘ब नि हा ल’

(पॅरीस हॉटेल)

*ऑक्टोबर १५, १९६४*

**सकाळीं** नऊच्या सुमारास आम्ही पठाणकोट या शेवटच्या स्टेशनवर उतरतां. या पुढील श्रीनगर पर्यंतचा दोनशें बासष्ट मैलांचा प्रवास बसचा आहे. आज दसरा. नऊ वर्षांपूर्वी आम्ही इथें उतरलो होतो त्या दिवशींहि असाच एक सण होता. राष्ट्रीय सण! पंधरा ऑगस्टचा स्वातंत्रदिन! त्या दिवसाची आठवण राहाण्यासारखी एक गोष्ट तिथें घडली होती. रेल्व खात्यातर्फे फलाटावर ध्वजवंदनाचा कार्यक्रम होता. परंतु गंमत अशी कीं तिथें जमलेल्या एकांहि माणसाला पुरें राष्ट्रगीत अवगत नव्हतें. अखेर तें आमच्या बरोबरच्या कमलाताईनीं म्हटलें.

दसरा असला तरी या सणाची म्हणून इथं कांहीं निशाणी दिसत नाहीं. कुलूला आज मात्र मोठी झुंबड उडाली असेल धालपूर मैदानांत. कुलूचा हा सर्वांत मोठा सामूहिकरीत्या साजरा करायचा सण. सर्व खोऱ्यांतील देवदेवता मिरवणुकीसाठीं कुलूला एकत्र आणल्या जातात. माझी अर्थात् ही पुस्तकी माहिती आहे. तरी सुद्धां या सणाच्या सांगतेच्या आधीं एखादा दिवस आम्ही कश्मीर उरकून कुलूला पोहोचूं अशी उमेद आहे. कारण त्यांचा हा महोत्सव इथून पुढें दहा दिवस चालतो.

मुंबईहून गाडींत बसायच्या आधीं आम्हीं इथल्या सरकारी वाहातूक खात्याला तार केली होती आमच्या जागा राखून ठेवण्याबद्दल. तेव्हां जागेकरतां कांहीं धडपड न करतां तिकिट मिळेल अशी आपली माझी कल्पना. पण कसचं काय हो! तार आल्याची इथें कुणाला दादहि नाहीं. माझ्या एकट्याच्या

तारेची ही हकीगत नाहीं. इतरांच्या तारांचीसुद्धां तीच गत. शेवटीं मी रांगेंत उभा राहातों. नुसतें उभें राहून भागत नाहीं. मध्येंच कुणी घुसूं नये म्हणूनहि काळजी घ्यावी लागते आहे. वास्तविक रांगा लावण्याची संस्कृती नागरी. आणि तिथें उभे असलेले सगळेच प्रवासी नागरी आहेत. परंतु मध्यें घुसण्याची संस्कृती सुद्धां नागरीच आहे ! हेहि माझ्या लक्षांत येतें. पहिल्याच गाडीचीं तिकिटें मिळालीं म्हणून मी घाईघाईनें अण्णांना सांगायला येतो. सामान आम्ही टपावर चढवून घेतो. हात पिशव्या आणि शाली संभाळीत गाडींत बसतों. आणि गाडींत बसल्यावर मग पहिल्या गाडीचें ' सूख ' आमच्या प्रत्ययास येतें.

आमचीं तिकिटें पहिल्या गाडींत, पण शेवटच्या क्रमांकाचीं होतीं. गाडी सुटल्यावर आम्ही बसमधून प्रवास करीत नसून सांडणीवर स्वार झालों आहोंत असें भासूं लागतें. गाड्या खऱ्या खुऱ्या आराम गाड्या आहेत. परंतु रस्ते आरामांत नसून आजारांत पडलेले आहेत. रस्ता-दुरुस्ती, थेट मुंबईच्या चालीवर वाटोवाट अविरत चालू आहे. नाहीं तरी भारतांत प्रत्येक चळवळीचें पुढारीपण आज अर्धशतक तरी मुंबईनेंच संभाळालें आहे. हा दावा मुंबापुरीनें या बाबतींत सुद्धां खोटा कां पडूं द्यावा ?

पूजेची (आपल्या कडील दिवाळीची) सुट्टी सुरू झाली कीं प्रत्येक बंगाली नि उडिया प्रवासी जो उठतो तो श्रीनगरचेंच तिकीट काढतो. (पठाणकोट शेवटचें स्टेशन असलें तरी रेलवेचें तिकिट बसच्या आकारासह श्रीनगरचें मिळतें) किंवा कसें नकळे ! पठाणकोटला उतरल्यापासून कानावर जो शब्द येतोय तो आपला ' ऑ 'कारांत. भारी बडबडी जमात ! आमच्या बसमधल्या चोवीस प्रवाशांत एकोणीस ऑकारांती आहेत. त्यांच्या ऑमार-तॉमार पुढं आण्णा आणि मी कांहीं वेळ आपापसांत बोलायचे सुद्धां विसरतों.

नऊ मैलांवर लखनपूरला गाडी थांबते. आम्ही खाली उतरतो. आण्णा एक सिगारेट मला देतात, एक आपण घेतात. पंचवीस वर्षें मी दुसऱ्याची–फक्त दुसऱ्याचीच–विडी पितों आहे. स्वतःच्या खिशांत बाळगीत नाहीं. हा माझा संयम म्हणायचा का स्वतःची पदरमोड होऊं नये म्हणून माझ्याकडून होत असलेला हा भटजीपणा म्हणायचा याचा थांग मला अद्याप लागत नाहीं.

" बरं का आण्णा ! नऊ वर्षांपूर्वी आम्ही इथं आलों ना, तेव्हां या रावी-कांठीं, या कश्मीरच्या सरहद्दीवर एक गंमत झाली." मी सिगरेट शिलगावून आण्णांना म्हणत होतों.

" गंमत ? " माझ्या 'नऊ वर्षांपूर्वीच्या गम्मती' आतांच तर सुरू होत होत्या.

" हं गंमत ! तेव्हां या जम्मू-कष्मीरच्या सरहद्दीवर प्रवेश-परवाना दाखवावा लागे. आमच्यापाशी तो होताच. परंतु पंजाबांतील एका पाटीलबाबाजवळ तो रीतसर नव्हता. रीतसर नव्हता म्हणजे परवान्याकरतां करायच्या आवेदन-पत्रकावर तिथल्या स्थानिक आमदारानं शिफारस केल्यावर त्या पत्रकालाच तो परवाना समजला, आणि आला तेंच घेऊन इथपर्यंत."

" मग ? सोडला का नाहीं त्याला ? "

" नाहीं हो ! परत जावं लागलं बिचाऱ्याला. भारताच्या या अविभाज्य भागांत त्याला प्रवेश नाकारला गेला."

" श्यामाप्रसादांचा सत्याग्रह इथेंच झाला होता ना हो ? "

" हो, इथेंच. " यावर आम्ही दोघेही स्तब्ध होतो.

त्या नंतर घडलेल्या दुःखद घटनेनंतर प्रवेशपरवाना रद्द झाला होता. परंतु " भारताच्या या अविभाज्य भाग प्रकरणाची वाटचाल मात्र कशी जैसे थेच आहे याबद्दल आम्ही बरेचंसें बोलतो. गाडी पुढं चालू लागते.

टवी नदी ओलांडून गाडी जे. अॅन्ड के. च्या जम्मू या हिवाळी राजधानींत शिरते. नदी ओलांडल्यानंतर लहानशी टेकडी चढल्यावरच हें गांव लागतें. तरी सुद्धां पंजाबांतील इतर मैदानी गांवाप्रमाणें या गांवची उंची हजार फूटच आहे. हिवाळ्यांत इथून लांबवर हिमशिखरें दिसत असलीं तरी इथें या गांवांत बर्फाचा ताप नाहीं. म्हणून राजधानी इथें आहे. गांव टेकडीवर असल्याकारणानें घाण-पाण्याचा निचरा नैसर्गिकरीत्याच होऊन जात असला पाहिजे. म्हणून गांव स्वच्छ वाटतें.

पाकिस्तान सरहद्दीवर करीत असलेल्या नित्याच्या कटकटींच्या बातम्या वर्तमानपत्रांतून आपण वाचतों. त्या बहुतेक जम्मूहून आलेल्या असल्याचें आठवतें. म्हणून मी चौकशी करतों, सरहद्द इथून किती दूर आहे ? तेव्हां समजतें कीं ती फक्त पंधरा मैलच आहे. सरळ रेषेंत याहूनहि कमी असेल.

गाडी इथें सुमारे तासभर थांबणार आहे असा अंदाज येतो. सांगतांना जेवणासाठीं अर्धातास गाडी थांबणार आहे, असेंच औपचारिकरीत्या सांगण्यांत येतें, परंतु आपल्याला छापील दोन ओळींच्या मधला न लिहिलेला मजकूर वाचतां येतोच कीं नाहीं ?

म्हणून आम्ही रघुनाथजी मंदिराकडे मोर्चा वळवितों. डोगरांचें हें कुलदैवत. याचे सोनेरी कलश उन्हांत चमचमत प्रकाश-पल्लवीच्या भाषेंत आपल्याला बोलावतात. नेटकें आणि देखणें देवस्थान आहे. इथं लक्षावधी शिवलिंगें आहेत म्हणतात. शिमिटांत मोठ्या बैदुलासारखीं बसविलेलीं बरींचशीं दिसतात खरी! उंचावरील प्रशस्त प्राकारामुळें ही वास्तु लोभस वाटते.

गाडी उधमपूरच्या पुढें सरकते. उधमपूर कष्मीरांतला सगळ्यांत मोठा लष्करी तळ. गाडी या पुढचा कूडचा घाट चढूं लागली म्हणजे खऱ्या कष्मीरची चाहूल लागते. वर निमुळते होत गेलेले पाईन्स आतांपर्यंत दक्षिणी नवख्या प्रवाशानें फक्त चित्रांत पाहिलेले असतात. त्यांचें साक्षात् दर्शन त्याला प्रथम इथें होतें. घरांच्या प्रांगणांत नि डोंगरांच्या उतारावर जी जी म्हणून वनस्पती दिसते ती सर्वस्वी अपरिचित. तुळशी, सबजा, आंबा, वड, पिंपळ, निंब, कश्या-कशाचें नांव नाहीं. आतां रस्ता गर्द जंगलांत चढत आहे तर दुसऱ्या क्षणीं वळण मारून मोकळ्यावर येत आहे. सभोवतालच्या सृष्टीचें स्वरूप भव्य, थोडेंसें रौद्र, रोमांचकारी वाटूं लागलें आहे. आणि आपल्या क्षुद्रपणाची जाणीव होऊं लागली आहे. आपली बस खेळण्यांतली वाटूं लागली आहे.

आतां कूड गांव आलें. आरंभीच्या वळणावरचा 'चष्मा'च सांगतो आहे. शेरे कष्मीरांना बंदिवासांत ठेवलं होतं तेंच हें गांव म्हणून लक्षांत येतं. आतां गावांत गाडी आलेली असते. हा डाव्या हाताला डाकबंगला. अरे गाडी थांबली नाहीं! चहा पिण्यापुरती सुद्धां नाहीं. बटोटला थांबलेच. गांव मागें राहिलें. वळणावरचा मैलाचा दगड उंची अठ्ठावनशें फूट दाखवितो. बापरे! म्हणजे हें कूड सवाई महाबळेश्वर!

गाडी पट्टणचा घाट चढूं लागली आहे. वळणावरून खालीं उजवीकडे पाहिलं कीं वर येणाऱ्या बस नि टूरिंग, खेळांतल्या वाटूं लागतात. आपली बस मात्र मोठी! मागच्या वळणावर झटदिशीं एक बस आपल्या पाठीमागंच आलेली दिसते. तिची चाहूल लागूनच कीं काय आपली बस गीअर बदलून नेटानें वेगानें चढाव चढूं लागते. तिच्या "ऱ्हि-ऱ्हि-ऱ्हि" आवाजानें मागच्या गाडीचें आव्हान तिनें स्वीकारलेलें असतें. "काय बिशाद मला पकडशील!" असा ध्वनी त्यांतून ऐकूं येत असतो. सुमारे अर्धा तास हा पाठशिवणीचा खेळ चाललेला असतो.

आतां पुन्हा एकदां रस्ता झाडीच्या गुहेंत शिरतो आहे. एकजात सगळा देवदार! वेंगेत मावणार नाहीं एव्हढाला एक एक वृक्ष! उंच सरळ सोट! छाया इतकी गर्द कीं दुपारी चार वाजतांसुद्धां एकादीच उन्हाची पत्रावळ जमिनीवर पडलेली दिसते. ही देवदारवट सगळें आकाशच वरच्यावर पेलून धरते आहे. हवा थंडगार! हातासरशीं ठेवलेल्या शाली नि फरकोट भराभर प्रवाशांच्या अंगावर चढत आहेत. आम्हीहि ती काळजी घेतलेली आहेच. पुन्हा एकदां बससह आम्ही एक क्षुद्र वळवळणारे जीव झालों आहोंत. मैलाच्या दगडांवरील उंचीचे आंकडे आतां आमचें लक्ष वेधून घेत आहेत. सदुसष्टशें फुटांचा आकडा मघाशींच पाहिला. पुढचा अडुसष्टशें फुटांचा. मग सात हजार! आठ हजार! उंचीची झिंग आली आहे. दहा हजार फुटांपर्यंत तरी गाडी चढतच राहावी असें वाटतें आहे. आणखी गेली तरी हरकत नाहीं!

परंतु तसें होत नाहीं. कसेबसे काश्यापर्यंत अडुसष्टशें फूट होतात. आणि गाडी उताराला लागते. झिंग उतरते. समोर पीरपंजालच्या रांगा दिसूं लागतात. सगळे भुंडे डोंगर! नीरस! खडकांची करड्या रंगाची आंतडीं बाहेर दिसत असतात. या देवदारवटींतून, आरामशीर जागेवर बसून समोरच्या डोंगराला नांवें ठेवायला सोपें होतें. परंतु तो बिचारा सगळीं हिमवादळें आपल्या छातीवर पेलून धरतोय, म्हणून कष्मीर खोऱ्याचें फूल जमीनदोस्त होत नाहीं,ही गोष्ट लक्षांत आल्यावर त्याचें भुंडेपणहि धन्य वाटूं लागतें. या भुंड्या पहाडांतच बनिहाल बोगदा आहे.

देवदारवटीची गुहा आतां संपली आहे. रस्त्यानं एक सफाईदार वळण मारलंय. आतां समोर बटोट दिसूं लागलंय. रात्रौ मुक्कामाला गाड्या कूड किंवा बटोटला थांबतात. कूडला गाडी थांबली नाहीं तेव्हां बटोटला थांबणारच. तशी ती थांबतेहि. परंतु मुक्कामाला नाहीं. चहा पिण्यापुरती. चक्रधर ( ड्रायव्हर ) सांगतो आपण रात्रीच्या मुक्कामाला बनिहालला ( टनेलच्या पायथ्याजवळचं गांव ) जाऊं. म्हणजे उद्यां सकाळीं सोपं पडेल. श्रीनगरला लवकर पोचूं. सकाळीं एकदां बोगदा झटदिशीं पार केला कीं लष्करी गाड्यांच्या तांड्यांचा त्रास टळेल. उद्यां त्यांचा वार आहे. म्हटलें चला! बनिहालला तर बनिहालला! पण इथें चहा घेतल्याशिवाय तर निघणार नाहीं आहोंत ना आपण? नाहीं. मग कबूल? मग कांहीं हरकत नाहीं.

बटोट ! उंच उतारावर गांव आहे. समोर रस्ता चिनाबला गाठायला भराभर कोसळत जात आहे. आसमंताचे क्षेत्र पहाडामुळें मर्यादित झालेलें आहे. निसर्गाचा हा छायाचित्रांचा स्टूडियो आहे. इथं गाढवाचं जरी छायाचित्र घेतलें तरी तें देखणें येणार आहे. स्टूडियोची मांडणीच तशी नेटकी आहे.



*निसर्गाच्या स्टूडियोंतील गाढवाचे चित्र*

पाय मोकळे करून येऊन ( म्हणजे लघुशंका उरकून ) मंडळी विश्रांतिगृहांत चहा पीत बसली आहेत. मालकानं रेडियो चालू केला आहे. मुंबईस ऑस्ट्रेलिया भारत कसोटी क्रिकेट सामना चालू आहे. वेळ संपत आला आहे. आणि सामनाहि. सामना अडीचकांड्यावर आला आहे. पतौडी उडाला ! चंदू बोर्डे नि इंद्रजित यांच्यावर आतां आशा लोंबकळत आहेत. तिथं असणाऱ्यांना आतां एकच इंद्रिय आहे. कान ! चहा कपांत निवतो आहे. अर्धी मोडलेलीं बिस्किटं आमच्या समोरच्या बशांतून तशींच पडलीं आहेत. आतां फक्त बारा धावा पाहिजे आहेत. यांपैकीं आठ-नऊ तरी चंदूलाच काढाव्या लागणार

आहेत. दुसऱ्या नवख्या गड्याचं तें काम नाहीं. आतां दोनच पाहिजे आहेत. आणि कानठळ्या बसविणारा आवाज रेडिओमधून येऊं लागला आहे. भारताने सामना जिंकला आहे. विजयी टोला चंदूचाच असणार ! मैदानावरील उन्माद रेडियोवरून उतूं जातो आहे. त्याची प्रतिक्रिया हॉटेल मधल्या सगळ्यांवर झाली आहे. पोकळ धोतरवाले नि पुंगळी इजारवाले अक्षरशः नाचत आहेत. हातांतल्या सिगारेटी फेकून टाळ्या पिटीत आहेत. हाताच्या पिपाण्या वाजवीत आहेत. हॉटेल मालक मालक राहिले नाहींत, ग्राहक ग्राहक राहिले नाहींत. कुणी हिंदू नाहीं, कुणी मुसलमान नाहीं. कुणी मरेठा नाहीं, कुणी बंगाली नाहीं. इथं आहेत ते सगळे ब्रॅबोर्न स्टेडियमवरचे बेभान प्रेक्षक. आपण जिंकलों आहोत हा एकच भाव सगळ्यांच्या चेहऱ्यावर विलसत आहे.

चक्रधरानें गाडीचा भोंगा वाजविला. पुन्हा एकदा सगळे स्टेडियममधून बटोटमध्यें उतरले आहेत. गाडींत पाय टाकायच्या आधीं भानावर आलेल्या मालकाने सगळ्यांकडून योग्य ते पैसे घेतले आहेत. कॅमेरावाले अद्याप ‘ क्लिक ’ करीतच दूरदूर आहेत. चक्रधरानं गाडी चालू करून थोड्या अंतरावर पुन्हां उभी केल्यावर सगळे आतां येऊन बसले आहेत. चिनाबला भेटायला रामबनकडे रस्ता कोसळत चालला आहे. अवखळ चिनाबची सागरी गर्जना आतां स्पष्ट ऐकूं येत आहे.

रामबनला चिनाबवर एकेरी वाहतुकीचा पूल आहे. गंगामैय्या, जमुनामैय्या सारखें हिला चिनाबमैय्या म्हणावेसें वाटत नाहीं. अल्लड पोरीला हें भारदस्त नांव शोभणार नाहीं. लामांच्या लडाखमधून ही चिनाब हिमाचल कष्मीर मध्यें नुकताच प्रवेश करते आहे. नाचा-बागडायचंच तिचें वय आहे. आत्तां आपले हात पकडून आपल्याबरोबर धावत येते, तर दुसऱ्या क्षणाला कांहींतरी कारणाने रुसून फुगून द्रुतगतीनं लांब पळते. पुन्हां जवळ येते. पुन्हां पळते कुठच्या कुठें दूर ! आतां ती दृष्टीआड झालेली आहे.

रस्ता दुरुस्तीला आतां ऊत आला आहे. रस्ता धुळीचा आहे. परंतु वाहतूक फारशी नाहीं. निवांतपणीं हेडलाईटस्च्या प्रकाशझोतांत चांगल्या वेगानं रस्ता काटला जातो आहे. चक्रधराचा होरा बरोबर ठरत आहे.

संध्याकाळचे सात वाजले आहेत. परंतु तासभर रात्र झाली आहे आणि गाडी बनिहालच्या ‘ पॅरिस हॉटेल ’ पाशीं उभी आहे. डाव्या बाजूला त्याची

बटोट ! उंच उतारावर गांव आहे. समोर रस्ता चिनाबला गाठायला भराभर कोसळत जात आहे. आसमंताचे क्षेत्र पहाडामुळें मर्यादित झालेलें आहे. निसर्गाचा हा छायाचित्रांचा स्टूडियो आहे. इथं गाढवाचं जरी छायाचित्र घेतलें तरी तें देखणें येणार आहे. स्टूडियोची मांडणीच तशी नेटकी आहे.



*निसर्गाच्या स्टूडियोंतील गाढवाचे चित्र*

पाय मोकळे करून येऊन ( म्हणजे लघुशंका उरकून ) मंडळी विश्रांतिगृहांत चहा पीत बसली आहेत. मालकानं रेडियो चालू केला आहे. मुंबईस ऑस्ट्रेलिया भारत कसोटी क्रिकेट सामना चालू आहे. वेळ संपत आला आहे. आणि सामनाहि. सामना अडीचकांड्यावर आला आहे. पतौडी उडाला ! चंदू बोर्डे नि इंद्रजित यांच्यावर आतां आशा लोंबकळत आहेत. तिथं असणाऱ्यांना आतां एकच इंद्रिय आहे. कान ! चहा कपांत निवतो आहे. अर्धी मोडलेलीं बिस्किटं आमच्या समोरच्या बशांतून तशींच पडलीं आहेत. आतां फक्त बारा धावा पाहिजे आहेत. यांपैकीं आठ-नऊ तरी चंदूलाच काढाव्या लागणार

आहेत. दुसऱ्या नवख्या गड्याचं तें काम नाहीं. आतां दोनच पाहिजे आहेत. आणि कानठळ्या बसविणारा आवाज रेडिओमधून येऊं लागला आहे. भारताने सामना जिंकला आहे. विजयी टोला चंदूचाच असणार ! मैदानावरील उन्माद रेडियोवरून उतूं जातो आहे. त्याची प्रतिक्रिया हॉटेल मधल्या सगळ्यांवर झाली आहे. पोकळ धोतरवाले नि पुंगळी इजारवाले अक्षरशः नाचत आहेत. हातांतल्या सिगारेटी फेकून टाळ्या पिटीत आहेत. हाताच्या पिपाण्या वाजवीत आहेत. हॉटेल मालक मालक राहिले नाहींत, ग्राहक ग्राहक राहिले नाहींत. कुणी हिंदू नाहीं, कुणी मुसलमान नाहीं. कुणी मरेठा नाहीं, कुणी बंगाली नाहीं. इथं आहेत ते सगळे ब्रॅबोर्न स्टेडियमवरचे बेभान प्रेक्षक. आपण जिंकलों आहोत हा एकच भाव सगळ्यांच्या चेहऱ्यावर विलसत आहे.

चक्रधरानं गाडीचा भोंगा वाजविला. पुन्हा एकदा सगळे स्टेडियममधून बटोटमध्यें उतरले आहेत. गाडींत पाय टाकायच्या आधीं भानावर आलेल्या मालकाने सगळ्यांकडून योग्य ते पैसे घेतले आहेत. कॅमेरावाले अद्याप ' क्लिक ' करीतच दूरदूर आहेत. चक्रधरानं गाडी चालू करून थोड्या अंतरावर पुन्हां उभी केल्यावर सगळे आतां येऊन बसले आहेत. चिनाबला भेटायला रामबनकडे रस्ता कोसळत चालला आहे. अवखळ चिनाबची सागरी गर्जना आतां स्पष्ट ऐकूं येत आहे.

रामबनला चिनाबवर एकेरी वाहतुकीचा पूल आहे. गंगामैय्या, जमुनामैय्या सारखें हिला चिनाबमैय्या म्हणावेसें वाटत नाहीं. अल्लड पोरीला हें भारदस्त नांव शोभणार नाहीं. लामांच्या लडाखमधून ही चिनाब हिमाचल कश्मीर मध्यें नुकताच प्रवेश करते आहे. नाचा-बागडायचंच तिचें वय आहे. आत्तां आपले हात पकडून आपल्याबरोबर धावत येते, तर दुसऱ्या क्षणाला कांहींतरी कारणानें रुसून फुगून द्रुतगतीनं लांब पळते. पुन्हां जवळ येते. पुन्हां पळते कुठच्या कुठं दूर ! आतां ती दृष्टीआड झालेली आहे.

रस्ता दुरुस्तीला आतां ऊत आला आहे. रस्ता धुळीचा आहे. परंतु वाहतूक फारशी नाहीं. निवांतपणीं हेडलाईट्स्च्या प्रकाशझोतांत चांगल्या वेगानें रस्ता काटला जातो आहे. चक्रधराचा होरा बरोबर ठरत आहे.

संध्याकाळचे सात वाजले आहेत. परंतु तासभर रात्र झाली आहे आणि गाडी बनिहालच्या ' पॅरिस हॉटेल ' पाशीं उभी आहे. डाव्या बाजूला त्याची

पाटी दिसते. इथें या हॉटेलमध्यें वस्तीला राहाण्याची चक्रधरांची शिफारीश आहे. कुठे काळोखांतून जातां डाक बंगला शोधायला ! म्हणून मी सामान काढायच्याहि आधीं एक खोली ठरवायला जातों. पॅरिस हॉटेलची कळा किंवा अवकळा आडगांवातल्या टावरणाची आहे. त्याचा पश्चिम भाग पाहिला म्हणजे मुंबईच्या झोपडपट्टीचीहि आठवण येत आहे. टावरणांतल्या गैरसोई नि झोपडपट्टींतला गलिच्छपणा अशा दोन्ही शोभा इथें एकवटल्या आहेत.

रात्री झोपण्यापुरता तर प्रश्न ! तीन रुपयाला एक खोली ठरवून सामान आणलें आहे. दोन झोळणा झालेल्या खाटांवर तें पसरून दिलें आहे. जमिनीवर नि भिंतींवर पोपडे निघून सुंदर नक्षीकाम झालेलें आहे !

हात-पाय धुवायला मालक एका पिंपाकडे बोट दाखवितो. त्यांतलं पाणी गरम आहे म्हणून सांगतो. प्रवाश्यांची काळजी वाहणारा मालक बघून आम्हांला दिलेल्या जागेच्या दारिद्र्याबद्दल मीं त्याला क्षमा करतों नि हातावर पाण्याचा नळ सोडतो. कसचें गरम पाणी ! त्या गारठणक पाण्यानें हाताचीं बोटें आणखीच ताठरतात. थंडी चिक्कार पडलेली आहे. पाणी बहुधा सकाळीं गरम केलेलें असावें. आणि चेंडू दुप्पट उसळी मारतो त्या प्रमाणें आतां ते सूडबुद्धीनं आणखीच गार झालं असावें. आमच्या जवळ असलेले सर्व गरम कपडे या नमनालाच पणाला लावावे लागणार आहेत.

मिळालं त्यांतल्या त्यांत निवड करून आम्ही पोटपूजा उरकतों. आण्णा खिशांतली पुडी काढून लवंग-सुपारी माझ्या हातावर ठेवतात. आणि आम्ही खोलींत परत येतां. बघतां तों काय ! तीन वंगीय प्रवासी आमच्या खोलींत जाड ल्व्हाळयांच्या चटयांवर पसरलेले. मालक आमच्या मागूनच खोलींत प्रवेश करतो. तो आम्हांला सांगतो, ते आमचे भागीदार आहेत. वर आणखी बजावतो, " तुम्ही मुंबई कलकत्तावाली शहरीं माणसं. बाहेर ओसरींत तुम्हांला झोपूं दिलं तर या सर्दींत निमोनिया व्हायचा ! शिवाय आपण सगळेच भाई भाई. एकमेकांशीं सहकार्यानं आपण वागायला नको काय ? जरा सांभाळून घ्या एक-मेकांना. " हा नक्की स्थानिक पुढारी असला पाहिजे अशी मी मनाशीं खूण-गांठ बांधतों. त्या तीन बांधवांची सोय लावल्याचें पुण्य आणि तीनच्या ऐवजी दीड रुपयांत खोली पडणार आहे, ह्या सुखद विचारांत ' भागीदारां ' ची कोण,

कुठले, चौकशी करतों. ते बंगलाभाषी असले तरी बंगाल्यांतले नव्हते. ओडिसांतल्या सिंगभूम मधले होते. सिंगभूम म्हणजे बंगालची सरहद्दच.

सगळे शौकिन लोक कानांवरून गरम गळपट्टे बांधून नि गरम पांघरूण ओढून चिडीचिप्प झोपले सुद्धां. मीच तेवढा आंबटशौकी ही रोजनिशी लिहीत बसलों आहे.

दिवा मालवून अंथरुणावर पडल्यावर समोरच्या डोंगरापलीकडलें तें निळें नंदनवन दिसूं लागणार आहे.

♣ ♣

## ‘ श्री न ग र ’

(महालक्ष्मी हॉटेल—बादशा ब्रिज)

....... .. . . .................. ...... ............ .. .. ... . ..

*ऑक्टोबर १६, १९६४*

**सकाळीं** पॅरिस हॉटेलच्या त्या ‘ महालां ’त जाग आली, तेव्हा दाराच्या फटींतून अगर खिडकीवरच्या काचेंतून उजेडसुद्धां दिसत नव्हता, पांघरुणाबाहेर हात काढवेना इतकी थंडी ! कष्मीर खोऱ्यांत तर आम्हाला अद्याप उतरायचेंच आहे ! त्या आधींच इतकी थंडी ! या वर्षी बर्फ लवकर पडायला लागून आमच्या सहलीचा विरस तर होणार नाहीं ना !

काल चक्रधरानें सांगितलें होतें मुद्दाम. बडे फजल आपण निघालों तर ‘ सुबह सुबूमें ’ श्रीनगरास पोहोंचूं. पुढचा रस्ताहि निर्वेध आणि डांबरी होता. पांघरूण बाजूला सारलें. उठलों. आण्णा जागेच होते. एक ‘ भागीदारहि ’ जागा होता. त्याला सुचवितांच त्यानें आपल्या सोबत्यास ‘ बंगालीं ’त जागें केलें.

मी ‘ कराग्रे वसते लक्ष्मी ! करमध्ये सरस्वती...’ अशा थाटांत म्हणूं लागलों कीं जसा काय आम्हा मराठी माणसांचा हा नित्य पाठच आहे. तोंड धुऊन आल्यानंतर ‘ या कुन्देन्दुतुषार हार धवला ’ चालू केलें. मुंबईस नित्यपाठ म्हणजे प्रभातसमयीं उठून रबराची नळी कराग्रांत धरून ‘ आज पाणी पुरें भरून होतेंय कीं नाहीं ’ ही विवंचना करणें हा. तिथें कुठली लक्ष्मी नि सरस्वती ? आण्णा मिशींतल्या मिशींत हंसत होते. ‘ म्हणजे तुम्हांला हें तोंडपाठ येताय तर ! ’ एवढेंच म्हणून माझ्या झाकल्या मुठींत कांहीं नाहीं हें त्यांनीं ओळखलें होतें तर !

टावरणांतील चाय बरी होती. दूध कदाचित् रात्रींचें निरसेंच त्यानें सकाळच्या चहाला ठेवलें असावें, किंवा उशीरा आल्यामुळें निरसेंच राहिलें असावें. या

....१७.४०८८ २५२२१ ४४८ ७१३१७)


अशा थंडीत तें नासण्याचा संभव नाहीं. कांहीं का असेना! चहा झक्क जमला होता. सगळ्यांनीं दोन-दोन 'कोप' घेतला.

हॉटेल मालकाचा हिशोब खोलीच्या पुऱ्या भाड्यासह मी चुकता केला. 'भागीदार' आपल्या बरोबर गाडींत आहेतच. ते आपणहून देतील पैसे. मागायचे कशाला ? बरें नाहीं दिसत पैसे मागणें !

उठल्यापासून अर्ध्या तासांत सर्वांचें सामान टपावर पूर्वस्थितीवर आलें होतें. सूर्योदय व्हायच्या आंत. (कदाचित नुकताच झाला असला तरी तें पहाडांच्या आकाश-भिंतींमुळें आम्हांस समजणें शक्य नव्हते.) रस्ता काटायला सुरुवात झाली. नवीन बोगद्याच्या तोंडाशीं पोचलों. सूर्य चांगला दांडभर वर आला होता. बोलतां बोलतां सहज वंगीय मित्रांच्या तोंडून माहिती बाहेर पडली. हॉटेल मालकानें त्यांच्याकडूनहि खोलीचें भाडें वसूल केलें होतें. म्हणजे आम्ही 'भागीदार' खरे परंतु 'भागी' मात्र मालकाची होती. गेल्या नऊ वर्षांत कष्मीर एवढें बदललें होतें काय ?

पीर पंजालच्या नव्या दोन मैली बोगद्यांतून कष्मीर खोऱ्याच्या बाजूला गाडी बाहेर पडली. आणि पाहातों तों काय ? कष्मीर खरोखरीच बदललें होतें. समोर कष्मीर खोरें सगळेच्या सगळें पसरलें होतें—पण हे रुखें सूखें नि भुंड्या डोंगरांचें- मागील खेपेस पावसाळाच्या अखेरी अखेरीस पाहिलेल्या कष्मीरचे मी वाटभर आण्णांजवळ पवाडे गात आलों आणि आतां हें समोरचें पानगळी लागलेलें कष्मीर पाहून आण्णांनीं मला गाजरपारखी म्हटलें असेल! माझें मन पार खट्टू झालें होतें. नऊ वर्षांपूर्वीच्या माझ्या आठवर्णांतील 'निळें नंदनवन' हें नव्हतें. नऊ वर्षांत तें काय इतकें सुरकुतलें ? म्हातारें झालें ?

क्वचित् दिसणाऱ्या हिम शिखरांचा तेव्हढा विरंगुळा वाटत होता, आपल्या घरीं पाहुणा आलेल्या रसिक मित्राला आपल्या आवडत्या नाट्यप्रयोगाला मोठ्या हौशीने घेऊन जावें आणि त्यांत प्रमुख कलावंतांचें काम त्या दिवशीं एखाद्या सामान्य नटानें करावें, म्हणजे आपला जसा विरस होईल तसा माझा हें समोरचें कष्मीर बघून झाला होता.

पण आश्चर्य असें कीं आण्णांचा तसा कांहींच विरस झाला नव्हता. 'अजायब घर' बघावें तसें ते चहूंकडे कुतूहलानें पाहात होते. माझी टकळी बंद झालेली पाहून त्यांची सुरू झालेली होती. 'हीं हिमशिखरं कोणत्या भागांतली, तीं

कोणत्या भागातलीं ? ' म्हणून ते चौकशी करीत होते. कसें झालें तरी तें कष्मीर होतें ! पावसाळी ओढा नव्हता तो. अगदींच काप जाऊन नुसतीं भोकें राहिली नव्हती. समुद्राला ओहोटी लागली नि त्यांतील पाणी कमी झालें तरी त्याचा अथांगपणा कितीसा कमी व्हायचाय ! प्रथम पाहाणाराला तें भरपूर आकर्षक वाटत होतें. गळायला आलेलीं पानें सुकट पिवळीं झालेलीं नव्हतीं. तांबूस सोनेरी होतीं तीं. निसर्गाचा दैवी बगीचा होता तो. कष्मीर !

खरी गोष्ट अशी होती कीं आम्हांला यायला महिना–दीडमहिना उशीर झाला होता. इकडे यायला उत्तम दिवस म्हणजे ऑगस्ट अखेर पासून ते सप्टेंबर अखेरपर्यंत. पाऊस संपलेला असतो. वनस्पतीचा माज कायम असतो. फळांचा हंगाम बहरांत आलेला, भूमि सुजलां सुफलां झालेली, थंडी पुढं यायची असलेली, मे महिन्याच्या सुटीची गर्दी कांहीं महिन्यापूर्वी टळलेली, दिवाळी–पूजेची सुटी पुढें राहिलेली, आणि परिणामीं सगळीकडे गर्दी कमी असते, सुखसोयी आणि वस्तू माफक दरांत उपलब्ध असतात. अशी ही त्या दिवसांतली सहल ' आखूड शिंगी, बहु दुधी, कमी खाणारी ! ' अशी बहुगुणी असते. ही झाली व्यवहारी दृष्टि. या पलीकडे निरनिराळ्या ऋतूंत कष्मीरचीं निरनिराळीं वैशिष्ट्यें बाकी राहातातच. चेरीब्लॉसम नि फुलांचा बहर मे–जून-मध्ये आल्याशिवाय दिसणार नाहीं. स्कीइंग स्केटिंग सारखे बर्फावरील खेळ डिसेंबर-जानेवारींतच खेळायला मिळायचे.

नऊ वर्षांपूर्वी आम्हांला ऑगस्ट सप्टेंबरचा मोका बरोबर मिळाला होता. आम्ही आज पार केलेल्या या नव्या बोगद्याची ' खुदाई ' तेव्हां चालू होती. तेव्हां हा पीर पंजाल पुरा चढून कास्यावर आलें कीं आपण नऊ हजार फुटांवर येत होतों. कात्रजच्या घाटमाथ्यावर असलेल्या लहानशा बोगद्यासारखा एक बोगदा पार केल्यावर त्या नऊ हजार फूट उंचीवरून समोर सोळाशे मैल क्षेत्र-फळाचा कष्मीर खोऱ्याचा गालिचा उलगडलेला अकस्मात दिसे. चक्रधराला सांगितलें तर तो खुशीनें गाडी उभी करीत असे. मोटार रस्त्याची ही उंची जगांत पहिल्या क्रमांकाची समजली जाई.

गाडी थांबल्याबरोबर कॅमेरावाले, दुर्बिणवाले धडाधड गाडीखालीं उड्या टाकून आपलीं हत्यारें परजीत असत. समोरचें दृश्य विमानांत बसून पाहात असल्यासारखें भासे. इतकें अनोखें ! इतकें वैविध्यानें नटलेलें ! तिथून हलूंच नये असें वाटे.

पायतळींच्या व्हेरिनाग (मूळ नांव व्हर्नाग-झेलमचें तथा वितस्तेचें उगमस्थान) पासून वितस्तेचा मागोवा घेत घेत थेट वुल्लर सरोवरापर्यंत नजर पोंचे. पलीकडे उत्तर सीमेवरचा नंगा पर्वत. २६६२० फूट उंचीचा. या खोऱ्याचा तळ सगळा सपाट. काहिलीसारखा. या प्रचंड काहिलीच्या भिंती खालीं हिरव्या कंच. वर वर निळ्या शार. पहाड कुठें संपले नि आकाशाची निळाई कुठें सुरू झाली हें दुर्बिणीशिवाय लक्षांत येऊ नये इतकी रंगसंगती जमलेली. गहिऱ्या निळाईची. सागर-आकाशापेक्षां गहिरी !

हें दृष्टि-सुख ऑगस्ट अखेर येऊन सुद्धां आतां यापुढें प्रवाशांच्या नशीबांत नाहीं. नऊ हजार फूट उंचीचें सहजासहजीं भेटणारें तें थ्रिल् आतां संपलें आहे. आतां दोन मैलांचा बोगदा पीर पंजालच्या पोटांतून खोदला आहे ना ! लिलिपुटियनांनीं खुपसलेली ही टांचणी त्या गलिव्हरला समजली सुद्धां नसेल.

रस्ता बारमाही चालू राहावा, हिवाळ्यांतहि बर्फानें वाहातूक अडूं नये म्हणून हा बोगदा खोदला आहे. तरीहि क्वचित बर्फ याचें तोंडच बंद करतो. म्हणून आतां त्याचें तोंड बांधीत बांधीत बर्फ रेषेच्या खालपर्यंत आणण्याचें काम चालू



*कष्मीरची गंगोत्री—व्हेरिनाग*

आहे. कांहीं कामें दुसऱ्या पिढीलाहि उरतात. तरी गैरसोयी मात्र सरत नाहींत ! या बोगद्यांतली दीपावली मात्र दिवाळींतली आहे.

इथल्या बस-गाडीवाल्यांचा एक रियाज आहे. पुष्कळ रियाज कायद्यांपेक्षां काटकोरपणें पाळले जातात. Conventions are nobler than laws असें ब्रिटिश मानतात. इथला रिवाज म्हणजे प्रत्येक प्रवाशाकडून पन्नास-साठ पैसे घेऊन वाकडी वाट करून गाडी व्हेरिनागला न्यायची. काश्मीरची ही गंगोत्री पाहण्याचा इतका सोपा मोका कोणता प्रवासी सोडणार ! आणि आमची गाडी अपर मुंडाच्या आधींच व्हेरिनागकडे वळली.

आपल्याला संवय अशी आहे कीं नदीचा उगम कुठे तरी डोंगर चढून गांठायचा. महाबळेश्वर, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वरचें गंगाद्वार आणि उत्तरेसहि अशीच गंगाद्वारें आहेत. इथे मात्र चक्क सपाटीवर एका अष्टकोनी पुष्करणींतून दर सेकंदास एकशे तेहतीस घनफूट पाणी, हिरवी छटा असलेलें स्फटिकवत् स्वच्छ पाणी, जोरांत उसळी मारून वर येत आहे. जहांगीर बादशाहानें १६१२ सालांत ही पुष्करिणी बांधविली. पुष्करिणीपासून फर्लांगभर पाण्याचा पाट बांधून सभोंवतीं बगीचा बनविला आहे.

पाटाच्या जवळ फुलझाडें आणि बागेंत लहान थोर वृक्ष शिस्तींत लावलेले आहेत. कश्मीरची बहुतेक नागरी वनस्पती इथेंच प्रथम एकत्र अशी आणि जवळून पाहायला मिळते. आपल्या पसरलेल्या हातासारख्या आणि हाताएवढ्या फताड्या पानांचा काश्मीरचा राष्ट्रीय वृक्ष, चिनार ! कोणत्याही कलाकुसरीच्या कामांत या पानांची कुसर हमखास असायचीच. या पानांचा रंगमुद्रा उगवत्या सूर्यबिंबासारखा आहे. कांहीं दिवसांतच ही पानें गळणार आहेत. परंतु तीं गलितगात्र मात्र दिसत नाहींत.

सफरचंद, बगूगोषा, बदाम, चेरी (अर्थात् पुष्पहीन) वगैरे झुडुपीं झाडें बागेंतच होतीं. रस्त्यावर सरळ सोट पॉप्लर (सफेदा) वृक्ष शंभर शंभर फूट उंचीचे, आपल्याकडील शाखायुक्त ताड-माड जणू, असे दुतर्फा होते. तर पुष्करिणीच्या मागील टेकडीवर देवळांतल्या घंटेच्या आकाराचीं फुलें (कीं फळें !) लोंबत असलेले देवदार वृक्ष होते. आण्णा आणि इतर मंडळी हें झाड कसलें, तें कसलें म्हणून मला विचारीत. तसा तज्ञपणाचा मुखवटा मी कालपासून धारण केला होता किंवा काय कुणास ठाऊक ! परंतु

खेडेगांवच्या अर्धतज्ञ शाळामास्तरसारखी माझी स्थिति होती. क्वचित् एखाद्या प्रश्नावर उत्तर देतांना माझी अवस्था अवघडल्यासारखी होत होती. अर्धसत्य किंवा थाप यांवर वेळ मारून न्यावी लागत आहे. अहंकार हार कबूल करूं देत नाहीं. तज्ञपणाचा बुरखा टाकवत नव्हता.

काझी-गुंडला चाय-नाश्त्यासाठीं गाडी उभी राहिली. इथें हमखास गिऱ्हाईक गरजू असतें. टावरणवाले भरमसाट आकार घेतात खाद्यवस्तूंचा. यापुढें खानाबल बिजबिहारा, पांपूर (केशराच्या शेतीसाठीं प्रसिद्ध), अवंतीपूरवरून दल गेटा-जवळील प्रवासीकेन्द्रांत गाडी श्रीनगरला येऊन उभी राहिली आणि तिथल्या घड्याळांत अकराचे ठोके पडले. पठाणकोटहून काल सकाळीं निघालेल्या स्पेशल स्टेशन वॅगनूस, काल रात्रींपर्यंत येऊन पोचल्या होत्या. पोहोचायला हरकत नाहीं आम्ही आलो त्या बसगाड्यांनासुद्धां. परंतु फ्रंटीयर मेल आल्यावर निघायलाच त्यांना दहा वाजतात. नाहीं तर मुंबईहून सकाळीं निघालेल्या गाड्या रात्रीला अडीच-तीनशे मैल रस्ता काटतातच. इंदूर गवालियार तीनशे मैल अंतर बस एकाच दिवसात जाते. पठाणकोट-श्रीनगर अंतर दोनशे सदुसष्ट मैल. नव्या बोगद्यानें तें आणखी कमीच केलेंय. परंतु बरोबर किती कमी तें मोजलेंच नसावें. जुने मैलांचे दगड अद्याप तसेच कायम आहेत.

जे. ॲन्ड के. ची ही राजधानी बावनशें फूट उंचीवर आहे. जुनी शहरांतील मुख्य वाहातूक झेलममधून होडीनें सातपुलांखालून होत होती. म्हणून जलमार्ग असलेल्या या शहराला पूर्वेकडील व्हेनिसहि म्हणतात. दुपारींसुद्धां इथें चांगला गारवा वाटला. मागील खेपेस ऑगस्टमध्यें इथें उतरल्यावर मुंबईच्या आणि या हवेंत कांहींच फरक वाटला नव्हता.

आतां आम्ही दोघेच नव्हतों राहिलों. बसमधील दोन वंगीय शिक्षकांनीं कश्मीरपुरती आमची साथ धरायचें ठरविलें होतें. गाडींतल्या माझ्या बडबडीमुळें मी कश्मीरचा माहीतगार अशी त्यांची गैरसमजूत झाली आहे. सामान उतरवून रस्त्यावर आणून मी बादशाब्रिजचा टांगा ठरवूं लागतों. त्याआधीं क्षेत्रस्थ पंड्यांप्रमाणें आमच्या मंडळीना 'एजन्ट' या जमातीनें घेरलें होतें. आणि आमचे बंगाली शिक्षक त्यांच्या जाळ्यांत सांपडत होते. त्या दिवशीं प्रवासी केंद्रावर एकहि खोली रिकामी नव्हती याचें भांडवल प्रत्येकानें केलें होतें.

श्रीनगरला उतरल्याबरोबर प्रत्येकाला कसलें स्वप्न दिसत असेल तर तें म्हणजे

हाऊसबोटीचें–नौकागृहाचें. हें जलमंदिर कसें असेल! त्यांत राह्यला काय मजा येत असेल! प्रवाशांचें हें दौर्बल्य एजन्ट जमातीनें बरोबर हेरलेलें असतें. आणि त्या दिशेनें त्यांतले कांहीं आपले घोडें दामटवीत असतात. आमच्या वंगीय शिक्षकांचा मासा त्या गळाला लागला आहे.

"अरे बाबूशाब ! देखिये तो मेरी हाऊस बोट ! बडी अफलातून है. मिजाज आपकी खूष हो जायगी." एजन्टाचा अनुनय चालला आहे.

"तोमार हाऊस बोट क्या पानी में है ?" बंगाली कलाशिक्षकाची चौकशी. आतां नौकागृहें काय डोंगरावर असतील ? मास्तर या संज्ञेबद्दल नि या अश्राप जमातीबद्दल मला नुसती सहानुभूतीच नव्हे, तर आदरहि आहे. मला कुणी विचारलें तुम्हीं 'अमूक अमूक' नसता तर काय होण्याची तुमची इच्छा होती ? (आतां आमचं 'अमूक अमूक' मुळींच महत्त्वाचे नसल्यामुळें आम्हांला हा प्रश्न कोणी विचारणारच नाहीं, हा भाग निराळा !) तर मी सांगितलें असतें 'मास्तर'. ('गणिताचा प्राध्यापक' म्हणून टिळकांसारखें सांगण्याची पदव्यांच्या अभावीं सोयच नाहीं !) परंतु तरीसुद्धां 'बोट पानी में है क्या ?' हे प्रश्नहि ह्याच मंडळींनीं विचारावे.

"पानीमें याने पानीके ऊपर तेरती है, बाबूशाब !" डॉइंग शिक्षकाला चड्डी वर सारणारा विद्यार्थी समजून हाऊस बोटवाला समजावीत होता.

"तो मॉशॉय हम लोग क्यूं नहीं जाते हाऊसबोट में ?" कला शिक्षकानें मला विचारलें. या नव्या सहकाऱ्यांना एकदम 'नाहीं' म्हणणें कठीण होतें. आण्णांनीं यावर तोड काढली. चिनार वृक्षाखालीं ते स्वतः आणि दुसरे शिक्षक यांनीं सिगरेटी ओढीत सामान संभाळीत चिनारच्या आरामशीर छायेंत बसावें आणि आम्ही दोघांनीं प्रथम ती हाऊस बोट पाहावी. ती पसंत नसली तर दुसरी जागा ठरवून परत यावें नि मगच सगळ्या गठल्या–पोटल्यांसह सगळ्यांनीं मिळून ठरविलेल्या जागेंत जावें, असें ठरलें.

"हां हां ! चलिये !" म्हणून हाऊसबोटवाल्यानें मान डोलविली.

कसली हाऊस बोट नि कसलें नौकागृह ! झेलमच्या चिखलांतील तें एक मचवा–गृह होतें. मोडकीं तोडकीं पार्टिशन्स आणि विटलेलें फर्निचर बघून माझ्या बरोबरचा कलाशिक्षकहि ओशाळला बिचारा. आणि माणशीं अकरा रुपये दर-रोजचा दर ! दोन ठिकाणीं आणखी चौकशी करून आम्हीं नागजीभाईच्या या

महालक्ष्मी हॉटेलांत चार खाटा असलेली खोली राहाण्याच्या फक्त पांच रुपये भाड्यांत ठरविली. बादशा ब्रिजच्या प्रशस्त रस्त्यावरची दुसऱ्या मजल्यावरची ही खोली चांगली हवा-उजेडाची आहे. चहापाणीहि इथेंच मिळतें. फक्त जेवायची सोय मात्र दुसरीकडे पाहावी लागते. तेंहि आम्हाला सोईचें वाटतेंय.

पहिल्यापासून माझा या नौकागृहाबाबत एक ग्रह आहे. नौकागृहांत राह्यचें असेल तर चांगल्या 'अ' वर्गीय नौकागृहांत आणि दल सरोवरांतील स्वच्छ पाण्यांत असलेल्या नौकागृहांत राहावें. मध्यम वर्गांतील माणसांसाठीं हा योग जमून यावा लागतो. तसा आमचा योग नऊ वर्षांपूर्वी जमून आला होता.

पहिला भाडोत्री त्याची सुट्टी संपल्यामुळें निघून गेला होता. नवीन भाडोत्री ठरला होता; परंतु तो यायला आठवड्याभराचा अवकाश होता. आणि मधल्या मुदतींत आम्हांला चार पांच दिवसांची सवड होती. त्याच मुदतींत तें आम्हांला मिळालें होतें. नक्षीदार वेलपत्ती काढलेल्या बैठका अंथरलेल्या होत्या. चकचकीत फर्निचर होतें. उंची क्रॉकरी, कटलरी कपाटांत व्यवस्थित लावून ठेवलेली होती. निरनिराळ्या बेडरूम्स बाथरूम्स होत्या. दिवाणखाना होता. निराळें जेवणघर होतें. तिथें आमच्या बायका मंडळींनीं मराठी जेवण चार पांच वेळीं तरी स्वतःच रांधलें होतें. आणि या सर्वांवर ताण म्हणजे गच्चीवर खऱ्या फुलझाडांची बाग असलेली एक छोटीशी मंडपी होती. आणि हें सर्व आमच्या खिशाला परवडणाऱ्या भाड्यांत! दिवसभराची सहल संपवून आणि जेवणें उरकून रात्रीं त्या पारदर्शक रुपेरी चांदण्यांत शाल पांघरून इथें बसलें कीं ती मंडपी आमच्या गप्पा मधांत बुडवून जिभेवर ठेवायची!

कुठें तें नौकागृह आणि कुठें सकाळीं पाहिलेला मचवा. कोंकणांतल्या आगबोटींवर लागणारे खपाटे असतात ना, तसा. बोटीवर जातांना त्यांत बसल्यावर वाटतें तसेंच वाटलें असतें तिथें उतरलों असतों तर. इथें या बादशा ब्रिजवरच्या खोलींत बसूनसुद्धां आतां त्या सुखद आठवणी चाळविण्यांत किती रमून जातोय मी! नऊ वर्षांपूर्वीच्या आठवणींत!

आज आमची कांहीं फारशी दमणूक झाली नव्हती. म्हणून दुपारीं विश्रांतीनंतरचा वेळ सार्थकीं लावायचें ठरविलें आणि शंकराचार्य टेकडीकडे कूच केलें. इथें श्रीनगरला आल्यावर एकाद्याला फक्त एकच वेळेची सवड असेल तर मी त्याला सांगेन, "तर मग फक्त शंकराचार्य टेकडीवर जाऊन ये" वर जायचें

म्हणजे एक हजार फूट चढावें लागतें. दल गेटकडील चढ जरा उभा आहे. नेहरूपार्ककडील रस्ता सोपा, परंतु लांबवरचा आहे.



*शंकराचार्य टेकडीवरील शिवालय.*

वर गेल्यावर कमरभर उंचीची शाळुंका असलेल्या जगदीश्वराचें दर्शन घ्यावें नि चौथऱ्यावर बसून दुर्बिण नाकाला लावावी. समोवतालचा पंचवीस मैलांचा परिसर तपशीलवार टिप्पून घ्यावा.

शहराच्या मधोमध वितस्तेचा राजधानीचा कमरपट्टा चकाकत असतो. पायाजवळ अफाट पोलोग्राऊंडचा लहानसा चौकोन रांगोळी काढलेल्या छोट्याशा अंगणासारखा दिसत असतो. मग थेट लांबवर विमानतळ, त्याच्या खाली झेलममधील झाडींतून नौकागृहें डोकावत असतात. नदीकांठचें पांढरें जुनें सचिवालय (जिथें आतां अजायब घर आहे.) आहे. त्याच्याच बाजूला

रघुनाथजी मंदिराचा सुवर्ण कलश दिसतो. मग वितस्तेवरचे अमीराकदल्पासून सात पूल मोजून घ्यावे. मोजतां मोजतां जामा मशीद–पथ्थर मशिदीवरून टेकडीवरच्या राणीच्या किल्ल्यावर नजर स्थिर होते. तिथें आतां तुरुंग आहे वाटतें. इथून दल सरोवराच्या पाण्याच्या मैदानावरील नौकागृहें दिसतात. पलीकडे नगीन लेक. हा दलचाच एक भाग. इथेंच कुठें तरी हजरतबाल मशीद आहे. ती स्पष्ट दिसली नाहीं. दलच्या पार टोंकाला शालिमार बगीचा, त्याच्या अलिकडे निषाद उद्यान, त्याच्याहि अलिकडे टेकडीच्या पायथ्याशीं असलेली चष्मशाही नि टेकडीवरील परीमहाल (परिकथांऐवजीं यांच्या कथा भुताटकीच्या आहेत.) आणि मग दलमधल्या जलमंदिर राजवाड्यावरून नि चार-चिनारवरून नजर स्थिरावते ती आपल्या पायथ्याशीं असलेल्या छोट्या नेहरू बागेवर आणि सदर-इ-रियासतच्या राजवाड्यावर.

सरते शेवटीं आम्हांला जाणीव झाली ती दिनराजाची. सुवर्णकण उधळीत वस्तुजात सुवर्णमय करून टाकणाऱ्या त्या हिरण्यगर्भाची! आतां दुर्बिणीची गरज संपली होती.

शिक्षकद्वय सर्व माहिती आपल्या वहींत टिपून घेत होते. मधूनच एखादें छायाचित्र खेचीत होते. त्यांना बहुधा ती माहिती सचित्र करून आपल्या विद्यार्थ्यांस सांगायची असावी. आण्णा तत्त्वचिंतकासारखे निर्गुण निराकारांत दृष्टि लावून बसले होते. बोलत नव्हते. बोलायचं कामच नव्हतं. मी एकटाच मास्तरासारखा बडबडत होतों. सगळा देखावा मंत्रमुग्ध करणारा होता. तो पाहून फक्त मनाच्या एका कप्प्यांत सांठवून व्यवस्थित ठेवून द्यायचा होता.

पाहायचें तें दुर्बिणींतूनहि दिसत नाहींसे झाल्यावर आमचे पाय जमिनीला लागले. परतायचा विचार करून उठलों. उतार कंकरमय होता, जपून उतरावें लागत होतें. उजव्या हाताला पाणी चमकूं लागलें दल सरोवराचें, तेव्हां चंद्र प्रकाशाची जाणीव झाली. नाकासमोर एकादशीचा सोमनाथ सस्मित एकटक आमच्याकडे आरपार पाहात होता. त्या टेकडीच्या पार्श्वभूमीवर उतरणारे आम्ही चार जीव त्याला कीड-मुंगीसारखे तरी भासले असूं का? आमच्या मीपणालाच तो हंसला असावा! आपल्या क्षुद्रपणाची जाणीव ठेवून नम्रपणें आम्ही एकेक फूट उतार काटीत होतों.

"एक एक सिगरेट मारूं या का?"– आण्णांची सूचना. कुणी तरी सूचना

करायचाच अवकाश होता. कंकरमय पाय वाटेनें, अंधुक उजेडांत उतरतां उतरतां पाय हुळहुळे झालेले असतात. खेटरें आमच्या हातांत होतीं. आम्ही दलकडे तोंड करून एका डगरीवर टेकलों.

दलमधील नौकागृहें धूसर दिसत होतीं. त्यांच्या मागला, भाजीपाल्यांच्या तरत्या बागांचा पट्टा जमीनीसारखा भासत होता. मूळ स्वरूपांत वस्तू कशा आहेत हें माहीत असलें तर त्यांच्या अस्पष्ट दर्शनांत सौंदर्य जास्त प्रतीत होतें किंवा कसें कुणास ठाऊक! कदाचित चांदण्याच्या मौक्तिक रंगाचा तो प्रभाव असूं शकेल.

बागांजवळ उभ्या असलेल्या शिकाऱ्यांतून भाज्या, पालेभाज्या व फळभाज्या लावून ठेवल्या असाव्यात. दुकानांतील मांडण्यावर असतात तशा. त्यांची रंग-संगती इतरांना नसली तरी मला दिसते आहे. पूर्वपरिचयामुळें. उद्यां सकाळीं फुलांनीं भरलेले शिकारे आणि भाज्यांचे शिकारे ग्राहक शोधीत नौकागृहांच्या बाजूबाजूनें फिरणार आहेत. नौकागृहांतल्या प्रवाशांना मग प्रश्न पडणार आहे कीं कोणता शिकारा आकर्षक म्हणायचा? रंगीबेरंगी फळभाज्या-पालेभाज्यांचा का विविध रंगी फुलांचा.

♣ ♣

'श्री न ग र'

(महालक्ष्मी हॉटेल–बादशाहाब्रिज)

*ऑक्टोबर, १९, १९६४*

**आज तीन** दिवसांची रोजनिशी लिहायची आहे. तीन दिवसांची आणि रोजनिशी! हें वदतो व्याघाताचें उत्तम उदाहरण होईल. परंतु ही वस्तुस्थिति आहे. कां लिहिली नाहीं याला कारणें पुष्कळ सांगतां येतील. माहेरीं गेलेल्या बायकोला आपण उशीरा पत्र लिहितों. झालेल्या उशीराची कारणेंहि आपण लिहितो. परंतु तिला तीं पटतात कधीं? तशींच माझीं कारणंहि पटायचीं नाहींत. माझीं मलासुद्धां!

कश्मीर हा तीन 'प' कारांचा मुलूख आहे असें म्हणतात. पहाड, पानी आणि परी! कांहीं मंडळी जी बापकमाईवाली असतात तीं, सर्वच नव्हे पण त्यांपैकीं कांहीं, केवळ तिसऱ्या 'प' काराचा शौक करण्यासाठींच इथें येतात. कांहीं खरी रसिक असतात, तर कांहीं 'आपणहि कांहीं कमी नाहीं आहोंत' हें रेकॉर्डला लावण्यापुरतीं येतात.

खऱ्या शौकिनांपकीं एक वल्ली आज जेवायला गेलों होतों त्या खानावळींत भेटली. या माणसानें शौक केला असला तरी त्याचा शौक फार फार सोज्वळ प्रकारचा होता. याची 'परी' याची नवपरिणीत वधूच होती. ओळखीवरून ओळख निघाली. माझ्या एका स्नेह्याच्या स्नेह्याचा हा मुलगा. ओळख निघाल्यावर पोरगा रंगांत आला. चांगला तास-दीड-तास गप्पांत गेला आणि आम्ही मुक्कामावर परतलो.

"कांहीं म्हणा आण्णा! या पोराची जिद्द मला आवडली." माझ्या मनांतून त्याची हकीकत कांहीं केल्या जाईना. म्हणून मी आण्णांजवळ तो विषय उकरून काढला.

" मरळीहळ्ळी म्हणतां होय ? तो सांगतोय त्याच्यांतला खरा भाग किती नि खोटा किती कुणास ठाऊक ! काय तर म्हणे यानं नवस केला होता, अमरनाथाचं दर्शन घेतल्याशिवाय मधुचंद्र साजरा करणार नाहीं म्हणून. हा कसला नवस ? चांगला पदवीधर हा ! "

" नवस वगैरेचं राहूं द्या हो ! आई वडिलांच्या धार्मिक भावनेला कौल लावून कश्मीर ट्रिप पदरांत पाडून घेण्यासाठीं त्यानं ती एक युक्तिसुद्धां केली असेल. परंतु तीन आठवड्यांपूर्वी अमरनाथाचं दर्शन घेतल्यावर त्यानं आपल्या नवसाचं पारणं फेडलं यांत मला शंका नाहीं. आणि ती मुलगी मधूनच त्याला कानडींतून काय सांगत होती हो ? "

" ती त्याला म्हणत होती कीं या असल्या गोष्टी परक्या माणसांजवळ कसल्या सांगतां ! "

" पण त्यानं कांहीं ऐकलं नाहीं तिचं."

" अहो, हा तिला सांगत होता कीं ही समानधर्मी माणसं परकी नव्हेतच."

" हां ! तरीच ती त्याला एवढी काकुळतीला येऊन विनवीत होती. बाकी मुलगी मोठी गोड होती नाहीं ? आणि त्यांची इकडे येण्याची उत्सुकता, कळकळ वगैरे बघून त्याच्या म्हणण्यावर माझा तरी विश्वास बसतो बुवा ! "

" असेल असेल ! निदान मधुचंद्राची अभिनव पद्धत अनुसरून यानं कांहीं तरी निराळ केलं खरं."

" आण्णा, अमरनाथ म्हणजे सहज साध्य नाहीं आहे गोष्ट ! पहलगांवच्या पुढं अठ्ठावीस मैल पायीं अगर घोड्यावरून डोंगर तुडवायचाय ! मस्करी नाहीं ! म्हणून यांच्या जिद्दीचं मला कौतुक वाटतं. हा सांगत असतांना लाजेनं चूर झालेली त्या नववधूची मुद्रा अजून माझ्या डोळ्यांपुढं दिसते. "

आमच्याबरोबर असलेल्या दोघा बंगाली पोरांना मी ही हकीगत समजावून सांगितली. त्या दोघांचीं अद्याप लग्नं व्हायचीं आहेत. लग्नानंतर त्यांनीं सुद्धां हा पुरुषार्थ करण्यासारखा असल्याचें आण्णा त्यांना वडिलकीच्या नात्यानें सांगतात.

" आन्नासाब ! आप गाईड करोंगे तो मैं शादीके बाद जुरूर आयेंगा. " कला-शिक्षकाच्या डोक्यांत या हकीगतीनें चांगलेंच घर केलें होतें.

शंकर टेकडीवरून आसमंताचें दर्शन कितीहि मनोहर वडत असलें तरी या

दिवसांत मुंवल बगिच्याशिवाय कोणत्याच स्थळाचें दर्शन फारसें आकर्षक नसल्याचें प्रत्ययाला येतें. दुरूनच डोंगर साजिरे, गोजिरे ! परवां सकाळीं उठून मात पुलांची सफर टॅक्सी शिकाऱ्यांतून केली. झेलमचें या दिवसांतलें पाणी म्हणजे नुसता पातळ चिखल ! पावसाळ्यांत अर्थात् असें नसतें. रघुनाथजींचें मंदिर नि मशिदी हीं भगवंताचीं निवासस्थानें तरी प्रसन्न असायला पाहिजे होतीं ! परततांना शिकारावाल्यानें आम्हांला गरीबांची वस्ती दाखविण्यासाठीं मुद्दाम सांगूनच एका गलिच्छ नाल्यांतून आणलें. त्यानें हेरलें होतें कीं आम्हीं गरिबांचे कैवारी आहोंत म्हणून. चेहरा पाहून होरा जाणण्याची कला त्याला बहुधा अवगत असावी.

या सफरींतला आकर्षक प्रवास फक्त एकच. तो म्हणजे आम्ही बसलों होतों तो खुद्द टॅक्सी शिकारा. टॅक्सी शिकारा हा होडीचा प्रकार. ही टॅक्सी पाण्यांतून सरकत असते. वल्ह्यांच्या चुळूक फुळूक तालांत स्थानिक कलाकुसरीनें मढविलेल्या अलिशान बैठकीवर लेटून बसायचें ! मोठा मजा येतो ! रात्रीच्या चांदण्यांत तर हा प्रवास संपूच नये असें वाटतें. सगळा गढूळपणा नि लता-वेली पाण्याखालीं झाकलेल्या राहातात. वास्तवापेक्षां स्वप्नांतच माणूस जास्त रमतो.

दुपारचा सगळा वेळ विश्रांती नंतरचा, खरेदींतच गेला. बायका मंडळी बरोबर नसतांना ! माणसाला कांहीं कर्तव्यें असतातच ना ? एवढें काश्मीरला यायचें ! आपल्या बायकोला ( म्हणजे आपल्या मुलीच्या नावानें तिनें सांगितलेल्या साड्या वगैरे– तिला स्वतःला आतां कांहींच नको असतें ! ) वस्तू न्यायला नकोत का ? ( खरें म्हणजे आपण या नेतों त्यांना खूष करण्याकरतां किंवा निदान कटकट चुकविण्याकरतां. पण ती चुकते का ? आपण नेलेलें कांहीं तरी कोणत्या कुलवधूला निर्विवाद पसंत पडते ? तरी पण न्यावें लागतें. म्हणूनच त्याला कर्तव्य म्हणायचें ! )

अण्णांसह तिघेहि मला या खरेदींतला तज्ञ समजतात. हा खरें म्हणजे मोठा विनोद आहे. प्रत्यक्ष प्रवासापेक्षां बहुतेकांचा या खरेदींत खर्च जास्त होतो. आपल्याकडे दुर्मिळ असणाऱ्या वस्तू आणि मिळत असलेल्या फार स्वस्त भावांत ( निदान तशी समजूत तरी असते ) प्रत्येक जण ट्रंका भरभरून घेऊन जाणार आहे. यांत स्वतःच्या कुटुंबापेक्षां इतरांनीं सांगितलेल्या वस्तूच जास्त आहेत.

माझे सहप्रवासी मला तज्ञ समजत आहेत. परंतु मुंबईहून निघायच्या आधीं मला मिळालेलें शिफारस पत्र अगदीं निराळेंच होतें. आणि तसें तें माझ्या सारख्या भिडस्त (घरच्या भाषेत याला पर्यायी शद्ब 'अगदी हे') स्वभावाच्या असंख्य सद्‌गृहस्थांस मिळतेंच म्हणा! मला खास बजावण्यांत आले होतें—

"फारशा कांहीं वस्तू आणूं नका हो! भाराभर आणाल नाहीं तर, आणि देऊन टाकाल कुणाला तरी. नि मला सांगाल विकत दिल्या म्हणून. मग पैसे येण्याचं मात्र नांव नाहीं."

"बरं बरं! कांऽहीं आणणार नाहीं. मग तर झालं?"

"तशा दोन वस्तू आणायलाच हव्यात! जातांच आहांत तर! मला नको हो! अगदीं कांऽऽहीं सुद्धां. पण जिजीला नको का कांहींतरी? एकाद दुसरी रेशमी साडी. म्हणजे ते स्टेपल् सिल्क नको हो! प्युअर सिल्कच्या दोन साड्या. आणि एक चेक सिल्कची. क्रीम कलरची. मागं आपण आणल्यौती तशी. प्युअर सिल्क मात्र चांगलं बघून आणा. तो पंडतजी आहे ना सेन्ट्रल मार्केटांत, त्याच्याकडून. तुमच्या मुलीकरतां हो हे! (या नेसणारच या साड्या. पण आणायच्या मात्र मुलीच्या नांवानं!) आणि हो, बरी आठवण झाली! केशर!"

नऊ वर्षांपूर्वी या बाईसाहेब बरोबर होत्या तेव्हां 'काय काय नि किती किती घेऊं!' असें यांना झालें होतें. माझें मध्यम वर्गीयाचें (मध्यम हा शब्दसुद्धां फसवा आहे.) अंदाजपत्रक घाईला आलें होतें.


इथले दुकानदार आणि सिल्क फॅक्टरीवाले परंपरेनें धंदा करीत आले आहेत. अनुभवी विक्रेत्याच्या बोलण्याला वजन असतं. तत्परतेनें तो सगळें सांगत असतो, समजावीत असतो आणि विश्वास निर्माण होतो. आज सकाळीं सिल्क फॅक्टरीवाल्यानें मुंबईच्या आपल्या ग्राहकांची यादी सांगितली. त्यांत आमदार-खासदार होते. व्यापारी होते. गिरगांवांतल्या एका वस्ताद व्यापाऱ्याचें नांव ऐकलें आणि त्यानें किती माल घेतला म्हणून सहज विचारलें. एक वर्षा पूर्वीचें त्याचें बिलच काढून दाखविलें त्यानें. सुमारें बाराशें रुपयांचें. तेव्हां मी खूण गांठ मनाशीं बांधली कीं इथें माल घ्यायला हरकत नाहीं.

आपोआप माणसाचे कांहीं अडाखे बसलेले असतात. आमचा एक स्नेही होता. त्याला जी चालेल ती स्वच्छता आम्ही डोळे मिटून स्वीकारीत असूं. तसा तो गिरगांवांतला व्यापारी. त्याला चाललं म्हणजे आपल्यापदरीं 'चांगल्या

खरेदी'चें यश पाडणारच असें मीं गृहीत धरलें. पुष्कळशी खरेदी इथेंच झाली. सेन्ट्रल मार्केटमध्यें केशर वगैरेसारख्या वस्तूहि घेतल्या. आमच्याकरतां घेतल्या. आप्तेष्टमित्रांनीं सांगितलेल्या सुद्धां घेतल्या. आणि आमच्या सामानांत मोठी जागा अडविणाऱ्या वस्तूंचा (अण्णांच्या नि माझ्या) एक डाग रेल्वे औट एजन्सीनें मुंबईला रवानासुद्धां करून टाकला. बरोबर बाळगायला नको. आम्हांला पुढें कूलूला जायचें होतें. अंदाजापेक्षां नेहमींप्रमाणें खरेदी जास्तच झाली होती. एकूण खरेदी छान जमली होती. ( मला नेहमीच तसं वाटत असतं ! )

काल रविवार नसतांनासुद्धां आम्ही मुंगल बगीचे पाहायला जायचं ठरविलें. रविवारींच पाणी सोडलेलें आणि रोषणाई केलेली असते. परंतु काल शनिवार असूनसुद्धां आम्हांला कारंजीं उडत असलेली बघायला मिळणार होतीं. चित्री-करणासाठीं आलेल्या एका सिनेमा कंपनीमुळें.

हे बगीचे म्हणजे शहरांतील गार्डन्स आणि पार्क्स नव्हेत. वरा किंवा वाईट



उल्हासोद्यान — निषाद् बाग

सबकुछ माणसानें बनविलेला प्रकार हा नव्हे. यांच्या आकर्षणाचें पुष्कळसें श्रेय तेथील नैसर्गिक साधनांना आहे. प्रत्येक बगीच्यासाठीं सजल अशी दल सरोवरा-कांठची ल्हानशी टेकडी निवडली आहे. टेकडीला एकावर एक विस्तीर्ण ओटे पाडलेले आहेत. टेकडीवरच्या झऱ्यांचें पाणी मधोमध नाला बांधून थेट दल सरोवरांत सोडलें आहे. नाल्याच्या दुतर्फा लागूनच फर व फुलझाडें, थोडीं दूर झुडपी फळझाडें आणि शेवटीं लांववर अक्रोड-चिनारासारख्या वृक्षांच्या दोन तीन रांगा. नाल्यांवर मध्येंच एकाद् दोन ओळ्यांवर सुबक मंडपी बांधलेल्या आहेत. त्यांच्या दोन्ही बाजूंस कारंजांकरतां विस्तीर्ण टाकीं असून नाल्यांमधून शिवाय कारंजीं आहेत. रविवारीं अगर इतर खास प्रसंगीं सर्व कारंजीं थुई-थुई नाचत असतात.

शालिमार बागेमधून आल्यावर निषात बागेंत गेलों. तिथें हें सर्व वैभव पाहायला मिळालें. सिनेमा कंपनीच्या कृपेनें. भर दुपारीं बारावर एक वाजतां डोळ्यांना त्रास होण्याऐवजीं थंडगार तृप्ती लाभत होती. पहिला ओटा चढल्यावर समोरचें दृश्य पाहून कलासक्त फारसी कवीच्या सुप्रसिद्ध ओळी आठवल्या.

**“ हर सोक्त जान-ए कि बा कश्मीर दर आयाद् ।**
**गर मुरघी कबाब अस्त बा बाल ओ पेर आयाद् ॥ ”**

शहरांतील गलिच्छपणाचा इथें मागमूस नाहीं. म्हणजे पाहायला आलेल्यांनीं खाऊन झाल्यावर कागद-पानें तिथेंच टाकलेलीं नव्हतीं असें नाहीं; परंतु हें रानच इतकें विस्तीर्ण असतें कीं त्या कचऱ्याचा मागमूसहि लागत नाहीं. वृक्षांच्या नि झुडुपांच्या रांगा शिस्तींत असतात. या शिस्तीला उताराची जोड. कारंजीं सुटून सूर्य किरणांत तुषार सप्तरंगांत चमकूं लागले कीं त्यांच्या विविध छटांशीं स्पर्धा करतील अशा रंगांचे पक्षी कारंजांचे तुषार टिपीत भराऱ्या मारूं लागतात. नाल्यांमधल्या ओट्यांच्या दगडी भिंतींत असलेल्या डझनावरी कोना-ड्यांतून भडक रंगांचीं फुलें लावून ठेवलेलीं असतात. वरून पडणाऱ्या सहस्त्र-धारांचा पारदर्शक पडदा वरून सरकूं लागला कीं या फुलांची दिवाळींतील रंगा-वली होते. अमरावतींत इंद्राच्या उद्यानांत तरी यापेक्षां अधिक शोभा काय असणार आहे !

अशा या बागा ! मोठी शालीमार ( प्रेम गेह ) मधली निषात् ( उल्हासोद्यान)

आणि सुबक लहानशी शहराच्या जवळची चष्मशाही ( शाही झरा—याचें पथ्य-कर मधुर पाणी खास राजवाड्याकरतां असे. )

आम्ही निषात बागेंत हिंडत असतांना आमच्या बरोबरचे बंगाली मुलगे कुठं तरी हरवले. त्यांना शोधण्यासाठीं म्हणून मी उठणार इतक्यांत अण्णा म्हणाले—

" बसा तुम्ही ! मला माहीत आहेत ते पोरगे कुठं गेले आहेत तें ! "

" माहीत आहेत ? कुठं ? "

" त्यांना बघायला जायची जरूरी नाहीं. त्या सिनेमा कंपनींत ते नक्की मिळतील. जातांना त्यांना त्या गर्दीतून खेंचून आणा म्हणजे झालं."

खरं तर आम्ही बसलों होतों तिथून सेटवर काय चाललें आहे तें स्वच्छ दिसत होतें. पुंगळी इजार घातलेला गोरा गोमटा तरुण नायक उडत्या कारंज्याच्या पार्श्वभूमीवर एका पायरीवर बसला होता. तशीच एक गोरी गोमटी तंग इजार घातलेली तरुणी त्याच्या मांडीवर डोकें टेकून आडवी झाल्यावर तो तिच्या केसांतून हात फिरवायचा. तो तिला ' प्यार ' करीत असावा ! कारण तशा अर्थाचें गाणं आम्हांला ऐकूं येत होतें. पुन्हां पुन्हां हें नि हेंच चालू होतें. यालाच ' रीटेक ' का कायसें म्हणतात मला वाटतें.

सबंध बागेंत आठ-दहा माणसें ( प्रवासी नि दोन पोलिस मिळून ) होतीं. बाकी सर्वच प्रवासी ' सिनेमा कंपनीं 'त चित्रीकरणाला गेले होते. प्रवासी त्या दिवशीं इतर बागा पाह्यला नक्कीच गेले नसतील. तिथें असलेली प्रवासी मंडळी घरीं परतली असतील तेव्हां बायका आपल्या नवऱ्यांना म्हणाल्या असतील—

—" तुम्ही आतां गडे, तसली पुंगळी पॅंटच शिवा. किती छान दिसते ! " यावर नवरे आपल्या बायकांना म्हणाले असतील, " तुलासुद्धां तसली तंग स्लॅक किती शोभून दिसेल ! नाहीं ? "

या वेळीं मी कष्मीरला दुसऱ्यांदा येत होतों. साहजिकच माझें मन मागील भेटीच्या वेळचें कष्मीर नि आतां पाहातों आहे हें कष्मीर अशी या सीमा-प्रदेशाची तुलना करीत होतें. कष्मीर बदललें आहे असें राहून राहून मनांत येत होतें. तसें तर सारें जग बदलत आहे. बदलण्याची ही प्रक्रिया जगाच्या अंतापर्यंत चालणार आहे. तसें कष्मीर तेंच आहे. माणसें तींच आहेत. म्हणजे आमच्या मानानें किती तरी देखणीं, लाल-गोरीं, मध्यम चणीचीं नि चपळ, उर्दू भाषाहि तीच आहे. परंतु तिच्यांतील अदब आर्जवीपणा नाहींसा झाला

आहे. बनिहालपासून मी पाहातों आहे. प्रवाशांशीं संबंध येणारे हॉटेलवाले, डाक बंगलेवाले, टांगावाले, शिकारावाले, मुंबई-कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरांतील व्यवसाय बंधूंप्रमाणे 'शहाणे' झाले आहेत. व्यवहारांत आणि राजकारणांत सुद्धां ! सगळ्यांना जणूं कुणीतरी पढविलें आहे. सायंशाखा नि प्रभातशाखांत बौद्धिकें दिल्यासारखें.

प्रत्येकजण शेवटीं एकच तात्पर्य सांगतो. काश्मीर जसें भारताला खुलें आहे तसें तें सगळ्या दुनियेला— पाकिस्तानला सुद्धां (हें नांव मुद्दाम घेऊन) खुलें हवें, म्हणजे सगळ्या दुनियेचे प्रवासी इथें येतील नि काश्मीरची तरक्की होईल. यांतील व्यंजना कोणाच्याहि लक्षांत यावी. ही मंडळी काश्मीरच्याच केवळ उत्कर्षाबाबत विचार करतात. काश्मीर भारताचा एक अविभाज्य भाग आहे या संदर्भांत नव्हे !

देवळांवर भगवा ध्वज, मशिदीवर हिरवें निशाण दिसावें हें साहजिक होतें. परंतु एका पक्ष-कचेरीवर चांद-ताऱ्यासह हिरवें निशाण दिसलें. पाकिस्तानचें निशाण नि हें निशाण यांत मला न समजण्याइतका फरक असूंहि शकेल !

मागील खेपेस मी आलों होतों तेव्हां येथील सामान्य माणूस भारताशीं समरस झालेला आढळला होता. प्रवेश-परवाना असूनसुद्धां ती भावना होती. आतां प्रवेश परवाना रद्द झाला आहे. वास्तविक ती वाढलेली दिसायला पाहिजे होती. परंतु दुर्दैवानें तसे नव्हते. मागील खेपेस जें दिसलें त्याला तसें कारणहि होतें. १९४७ सालीं टोळीवाल्यांनीं पाकिस्तानच्या मार्ग-दर्शनाखालीं जे हल्ले काश्मीरवर केले त्यांत सध्यांच्या हंगामी सीमारेषेच्या अलि-कडील झियारतीहि (पूजास्थानें) त्यांनीं लुटल्या होत्या. या धर्मबुडव्या कबाली टोळीवाल्यांपासून भारतानें काश्मीरचें रक्षण केलें. आणि म्हणून तेथील बहुजन समाजाला भारताबद्दल कृतज्ञता वाटत होती. ती त्यांच्या बोलण्यांतून व्यक्त होत होती. तेव्हांपासून आतांपर्यंत सतरा वर्षे भारत दरसाल कोट्यावधी रुपये काश्मीरच्या विकासासाठीं ओतीत आहे. नव्या भावनेच्या जोषांत याची जाणीव मात्र सध्यां कुठेंच दिसत नाहीं.

शेख अबदुल्ला हे जनमानसावर जबरदस्त पकड असलेले एक पुढारी आहेत. त्यांच्या स्वतंत्र काश्मीरच्या प्रचाराचेंच तर हें फळ नव्हे ! नऊ वर्षांपूर्वी मी आलों होतों तेव्हां शेख साहेब हे पदच्युत् पंतप्रधान होते. शिवाय तुरुंगांत होते.

तरी सुद्धां त्यांच्याबद्दल अनुदार उद्‌गार ऐकूं येत नसत. त्या वेळीं पंतप्रधान असलेले आतां पदच्युत झालेले आहेत. यांच्या बाबत मात्र परिस्थिति उलट आहे. सामान्य टांगेवाला आपल्या ग्राहकांस त्यांची अगर त्यांच्या नातेवाईकांची लोक क्षोभानें जळून उध्वस्त झालेली जायदाद् आपणहून दाखवितो. त्यांच्या-बद्दल कडवट उद्‌गार काढतो.

लोकशाहीच्या बाल्यावस्थेंत विचारपूर्वक मत बनविण्याची सामान्य माण-साची कुवतच नसते. त्याच्या पुढाऱ्याचीं मतं तींच त्याचीं मतें. म्हणून चारित्र्यवान् पुढारी हवेत. नाहींतर समाजांत निर्नायकी उत्पन्न होण्यास वेळ लागणार नाहीं.

सध्यां इथें दिसत असलेला बदल किती खोल आहे हें जाणून घेण्यास मी उत्सुक होतों. काल सेंट्रल मार्केटांत एका दुकानांत गप्पा रंगल्या. गप्पांत एक शेख साहेब भाग घेत होते. मी चांचपून पाहाण्याचा प्रयत्न करीत होतों.

"आच्छा शेखसाब स्यांसी मामल्यांत बडी दिलचस्पी आपणांस आहे असं दिसतं. तर या स्वतंत्र कष्मीराचं हें काय प्रकरण आहे हें मला समजावून सांगाल काय ?"

"स्यांसी मामल्यापासून कोणी अलग थोडाच राहूं शकतो ! आणि या प्रकरणाबद्दल म्हणायचं झालं तर आम्ही थोडेंच पाकिस्तानी बनूं इच्छितों !"

"आखीर आपण काय बनूं इच्छितां तेंच तर मी विचारून राहिलों आहे."

"आझाद स्वित्झरलंडसारखा आझाद कष्मीर म्हणून आमचा मुल्ख राहावा. बस्स, इतकंच !"

"परंतु तसा कष्मीर राहूं शकतो का ?"

"आम्ही सगळ्यांशीं दोस्ती ठेवूं ना ?"

"हे 'फिफ्टी परसेंट लव्ह' झालं. भोवतालचीं राष्ट्रं तर कष्मीर गिळंकृत करायला टपलेलीं आहेत. त्यांच्यासमोर कष्मीर टिकूं शकेल काय ?"

"मदत करायला आपण म्हणजे भारत आहेच ना ? आमचा बडा भाई !"

"आच्छा आच्छा ! म्हणजे 'खानेको हम और लढनेको हमेरा बडा भाई' असंच कीं नाहीं ?"

यावर तोहि माझ्या हास्यांत सामील झाला. त्याच्या समर्थनाचें वैयर्थ्य त्याला पटलें असावें. तो पुढें म्हणाला,

" हे बघा पंडतजी ! भारताची दोस्ती गमावून आम्ही कांहींहि होऊं इच्छित नाहीं. भारतानं करोडो रुपये कष्मीरच्या उत्कर्षाकरतां हरसाल खर्च केले आहेत नि करत आहे. भारताचें हे ऋण आम्ही विसरणार नाहीं. "

" अरे मग भारताचा उत्कर्ष नि कष्मीरचा उत्कर्ष निरनिराळा कां मानतां ?"

" पंडतजी ! माझी स्वतःची राय सांगतों. भारतासारखा दोस्त आम्हांला मिळणार नाहीं. नियतीनं आमचं दोघांचं नशीब एकत्रच बांधलेलं आहे. लीजिये ! चाय ठंडा होतो आहे. "

हें झालें याचें स्वतःचें मत. जनसामान्यांचें असेंच असेल काय ? बुद्धिभेद करून गोंधळ उडवून देण्यांत तरी शेखअबदुल्ला यशस्वी झाले आहेत. त्यांच्या नंतर तुल्यबल पुढारी कष्मीरला अद्याप लाभला नाहीं असाच निष्कर्ष काढायला पाहिजे. सध्यांच्या नवीन मंडळींतून असा कुणीतरी निघेल अशी आशा करूं या !

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सुद्धां धर्मांच्या नांवाखालीं परंतु धर्माचें नांव न घेतां इतका बुद्धिभेद नि गोंधळ निर्माण होऊं शकतो ! कष्मीरांत बिगर काष्मीरीला झोपडी बांधायलाहि जमीन विकत घेतां येत नाहीं. नागभूमींत सुद्धां हाच प्रकार नाहीं का चालू आहे ? या दोन्ही ठिकाणीं बुद्ध किंवा हिंदू बहुसंख्य असते तर हा चावटपणा होऊं शकला असता का ? एवढें मोठें हैदराबाद संस्थान. त्यांतल्या प्रजेचें भारताशीं सामरस्य उत्पन्न व्हायला कुठें वेळ लागला ?

खरें कष्मीर, तें दैवी निळें नंदनवन पाहायचें, अनुभवायचें असेल तर पहाडांतच जायला पाहिजे. तिथल्या श्रमजीवी शेतकऱ्यांनीं नि घोडेवाल्यांनीं कधीं श्रीनगर सुद्धां पाहिलेलें नसतें. नागरी अगर औद्योगीकरणानें होणारे संस्कार न झालेल्या त्या हिमप्रदेशांत निसर्ग जसा विकृत झालेला नसतो तशींच तिथल्या माणसांची मनेंहि. नेकदार आणि प्रामाणिक असतात बिचारे ! अभुक्त सृष्टिवैभवाचा हा शौक–कांहींच्या मतें आंबटशौक–पांच सात टक्के प्रवासीच करतात. नऊ वर्षांपूर्वी आमचा हा योग बराचसा जमला होता. तीन चार दिवसांच्या पहाडी सहली, कांहीं घोड्यांवर, कांहीं पायीं आम्ही केल्या होत्या. बरोबरच्या बायका मंडळींचींहि जिद्द टिकून होती. कैक वर्षें त्यांना या आठवणी रवंथ करायला पुरून उरल्या आहेत.

या पहाडी माणसांची एक आठवण जतन करून ठेवण्यासारखी आहे. अमरनाथला जायला निघालेले आम्ही पावणे तेरा हजार फुटांवर शिशनाग–बावजनच्या लाकडी आराम–घरांत रात्रीच्या मुक्कामासाठीं राहिलों होतों. आणि अमरनाथला जाऊन आलेली कांहीं खेडा जिल्ह्यांतील पाटीदार मण्डळी परततांना तिथेच मुक्कामाला आली होती. त्यांना दुसरे दिवशीं पहलगांवला उतरायचें होतें आणि आम्हाला पुढें चढायचें होतें. पुढचे रस्ते पावसानें ढांसळल्यामुळें आम्ही तिथेंच मुक्काम ठेवला होता. ती मंडळी सकाळींच खालीं उतरली.

परंतु जातांना पश्मिन्याची एक शाल ते विसरून गेले. ती एका चंबूत घातलेली त्या चंबूसह एक तट्ट्याआड राहून गेली. पश्मिन्याची शाल म्हणजे केवढी मौल्यवान् वस्तू ! सर्वांत उबदार कपडा तो. मुठींत राहण्याइतका लहान मुटका त्याचा होतो. अंगठींतून ओढून काढण्याइतकी ती तलम असू शकते. आतां ते पाटीदार प्रवासी, त्यांचे घोडेवाले सर्वच मंडळी निघून गेली होती. ज्याला ती मिळेल तो ती आपली करू शकला असता. आमच्या घोडेवाल्याला ती दिसली. कुणाची ती त्यानें ओळखली होती. पांच सहा मैल दौडून त्यानें ती पाटीदार मंडळींना परत केली. आश्चर्य म्हणजे एक पैसाहि बक्षिस म्हणून त्यानें स्वीकारला नव्हता, धर्म म्हणून तेही नेकी पाळतात. धर्म म्हणजे सामाजिक नीतिनियम. स्वतःवर निष्ठापूर्वक लादून घेतलेला कायदा.

घोडा हा जितका उमदा तितका इमानी प्राणी हें आपणांला माहीत असतें. परंतु त्यांचे मालक सुद्धां आपल्या अन्नदात्यांशीं ( ग्राहकांशीं ) तसेंच असतात, हा अनुभव सगळ्याच हिमप्रदेशांत येतो म्हणतात. केवळ कश्मीरांतच नव्हे. ज्यांना फारसा विचार करण्याची सवय नाहीं नि जरूरहि नाहीं अशा या कष्टकरी माणसांचा, समाजस्वास्थ्याला अत्यावश्यक असलेला ‘ धर्म ’ किंवा कायदा शहरी वातावरणांतून आलेल्या प्रवाशांना स्तिमीत करतो. शहरांत प्रस्थापित कायद्यांना धाब्यावर बसविण्याचा अगर त्यांतून पळवाटा काढण्याचा ‘ धर्म ’ पहायची संवय त्यांच्या अंगवळणीं पडलेली असते म्हणून.

घोडेवाला आणि घोडा हे तर इतके एकजीव झालेले असतात कीं वर बसलेला स्वार कांहीं इषारा करो किंवा कुणीकडेहि लगाम खेचो, पण घोडा चालत असतो, धांवत असतो अगर थांबत असतो तो मालकाच्या लहानशा इशाऱ्यावर. घोडेवाल्यांना काम नसलें म्हणजे पहलगांवच्या रस्त्यांतून त्यांची

जी सकीस चाललेली असते ती सुद्धां बाजूला उभे राहून आपण नुसती पाहाण्यासारखी असते. स्वारांच्या आणि घोड्यांच्या काय एक एक पोझेस् ! लहानसरच तट्टें असतात. स्वारहि फाटक्या तुटक्या कपड्यांतला. पण ऐट काय डौल कोण !

मागच्या माझ्या सहलींतून माझ्या मनांत एक सल राहिला होता. अमरनाथला आम्ही पोहोचूं शकलों नव्हतों. पावणेतेरा हजार फुटांवरील बर्फानें वेढलेल्या पहाडांच्या त्या बावजनच्या विजनवासांत एक दिवस मुक्काम वाढवून सुद्धां रस्ते मोकळे झाले नव्हते. हवामानाचा कौलहि मिळाला नव्हता आणि आम्हांला परतावें लागलें होतें. म्हणून या वेळीं मुंबईहून निघायच्या आधींपासून निश्चय केला होता कीं अमरनाथ या वेळीं तरी गांठायचाच. पण कसचें काय ! श्रीनगरला आल्याबरोबरच डायरेक्टर टूरिझमननें सांगितलें कीं आठवड्यापूर्वींच बर्फ पडून अमरनाथचा रस्ता बंद झाला आहे. पहल्गांवपासून सात मैलांवरची चंदनवाडीहि गाठणें मुष्कील आहे. अठ्ठावीस मैलांवरच्या अमरनाथाची तर गोष्टच सोडा. हंऽ ! अमरनाथाच्या नशिबीं आमचे दर्शन नाहीं. दुसरें काय !

ऑगस्ट-सप्टेंबरमध्यें पहलगांव म्हणजे केवळ गंधर्वनगरी ! गुलमर्ग सुद्धां छान प्रवासी तळ आहे. आदर्श अशी गोल्फ नि पोलोची मैदानें आहेत. गुलमर्ग हेंच एक विस्तीर्ण मैदान आहे. साहेबाच्या काळीं सहा सात हजार तंबू उन्हाळ्यांत इथें लागलेला असायचा. इथल्या शिखरावरील साडे चौदा हजार फुटांवर अल्पथर आणि गोठलेलें तळें-विशेषतः त्यातलें हिमखंड-पाहण्यासारखें आहेत. आणखीहि पांचसहा ठिकाणीं पहाडांतले दोनतीन दिवसांचे प्रवास याच तळावरून करायला मिळतात. तसा गुलमर्ग हा एक आकर्षक प्रवासी तळ आहे. तरीसुद्धां मला आपलें वाटतें कीं पहलगांव तें पहलगांवच ! तसें पाहिलें तर पहलगांव ही एक दरी आहे. जागेचा संकोच आहे. पण अमरनाथाच्या या उपत्यकेंत पाऊल ठेवायच्या आधीं पासूनच मन भारून जातें, त्या संकोचांत सुद्धां.

पावसाळा संपल्यानंतर सुद्धां गांवांत ( गांव कसला, पांच दहा हॉटेलें आणि तितकींच दुकानें असलेला केवळ प्रवासी तळ. ) यायच्या आधींच लिद्दर-नदीची घनगंभीर गर्जना ऐकूं येऊं लागते. या बासष्ठशें फूट उंचीवर भरदुपारीं सुद्धां

गरम कपड्यांची आवश्यकता भासते, नि रात्रीच्या थंडीची चिंता वाटूं लागते. बाजूच्या दोन्ही पहाडांच्या भिंतींवर पाइन्सची झाडी इतकी गर्द आहे कीं ती हिरव्या ऐवजीं जांभळी दिसूं लागते. डोंगराच्या कड्यावर जर आकाशां-



*गंधर्व नगरीपासून सात मैलांवरील चंदनवाडीचा सनातन बर्फाचा पूल*

तून एकादी वस्तू पडली तर ती कांहीं जमिनीवर पडणार नाहीं. झाडांच्या शेंड्यांवरून घसरत घसरत थेट लिद्दरमध्यें येऊन पडेल. इतकी गर्द निबिड रानें ! मधूनच वाहाणाऱ्या दुधाळ झऱ्याच्या विद्युत् रेषेमुळें दाट रंग विशेषच उठून दिसतो. आतां हिवाळ्याच्या चाहुलीमुळें हा दाट रंग किंचित मंद दिसूं लागला आहे. परंतु किती पण ! चित्राला लावलेल्या पारदर्शक जिले-टाईन कागदामुळें तें चित्र दिसेल तितकाच.

‘ पहलगांव ते पहलगांव ! ’ या माझ्या निष्ठेला केवळ पहलगांवची उपत्यका एवढाच अर्थ नाहीं. चंदनवाडी, पिसूघाटी, महागुणा घाटी, अमरनाथ, आरू, ल्दिरवत, कोलाहोई ( ग्लेशर्स ) वगैरे नांवांची जादू त्याच्यांत आहे. अमरनाथच्या आसमंतांत माणूस स्वतःला हरवून निसर्गाशीं एकरूप होतो. अहंकार तुटतो. तो नम्र होतो. बुद्धिमान, धीमान, श्रीमान् हे सगळे ‘मान्’ गळून पडतात. उरतो एक यःकश्चित् जीव. इतर जीवसृष्टींत तग धरून राहाण्याकरतां धडपडणारा ईश्वर मानणारा !

माझ्या या भावनेशीं समरस होणारा एक अमेरिकन जगप्रवासी गेल्या खेपेस बावजनच्या झोपडींत मला भेटला होता. धांपा टाकीतच अमरनाथहून तिथें आला होता. चहा घेतल्यावर गड्याला गप्पा मारण्याइतकी तरतरी आली. खरा हौशी प्रवासी होता. याचें नांव रेमंड. हा अमेरिकन इंजिनियर चीनमधील आपली मुदतीची नोकरी संपवून कॅलिफोर्नियाला आपल्या गांवीं परतत होता. त्यानें आंखलेला कार्यक्रम बराच महत्वाकांक्षी ! त्या मानानें साठलेली पुंजी बेताची म्हणून बिचारा गरिबीची राहाणी पत्करून आपली हौस पुरवून घेत होता. रंगूनवरून तो भारतांत आला होता. आणि त्या वेळीं कष्मीरमध्यें



*अमरनाथाची ही केवळ बर्फाची शाळुंका शुक्ल पक्षांत वाढते व कृष्ण पक्षांत कमी होते असें म्हणतात. अमरनाथाचें मंदिर बांधलेलें नाहीं. ती एक गुहा आहे.*

*बर्फाचा अमरनाथ*

आमच्या सारखाच त्या भागांत भटकत होता. स्वतः उंच धिप्पाड. परंतु त्याची पत्नी जॉयसी, ल्हानसर. तिच्याकरतां एक तट्टू आणि सामानाकरतां एक खेचर भाड्यानें घेतलें होतें त्यानें. स्वतः मात्र पायीं चढत-उतरत होता.

'खरा भारत म्हणजे भारतांतील खेडीं' विनोबांची पद्यात्रा, भारताची अध्यात्मांतील 'स्पेशालिटी,' वगैरे वगैरे, परदेशी माणसाशीं बोलायचे विषय संपल्यावर आम्ही कष्मीरवर आलों होतों.

"सबंध पृथ्वी पाह्यल्याचा कांहीं मी दावा करत नाहीं, मिस्टर दामोदर (त्यानें उच्चार केला होता धामॉधार) स्वित्सर्लंड पहिला आहे. आफ्रिकेंतला किलिमांजारो पाहिला आहे. परंतु 'कष्मीर तें कष्मीर!' आणि त्यांतलें 'पहिलगांव तें पहिलगांव!" त्याचे हे उद्‌गार ऐकल्याबरोबर मी टाळी देण्याकरतां हात उंच केला. पण त्यांच्यात टाळी देत नाहींत वाटतें. 'अगदीं बरोबर'ची टाळी हुकली. तरी त्यानें हातमिळवणी केली होती. (खोटें नाहीं!)

"गुल्मर्ग तुम्ही पाह्यलं ना? तें नाहीं आवडलं?"

"आवडलं ना! पण याच्याइतकं नाहीं. युरोपियन माणसाला तें आवडणं सहाजिक आहे. कारण तें अल्पाईन वातावरण आहे. माझ्या आवडीनिवडी जरा निराळ्या झाल्या आहेत. तुम्हांला कदाचित माझा गोरा रंग बरा वाटत असेल; परंतु मला तुमचा नितळ गहूं वर्ण आवडतो. (माझा गहू वर्ण! मला दुखवायचं नाहीं म्हणून त्यानं ही सौम्य संज्ञा वापरली असावी!) नुसतं सपाट मैदान तितकसं आकर्षक वाटत नाहीं."

"कोलाहोई ग्लेशर्स?"

"वाः! केवढी प्रचंड हिमनदी! तिचंहि कौतुक आहेच. परंतु खरं सांगू का, फार उंचीवर नुसती उंची नि बर्फ यांत पाह्यचं काय? त्यापेक्षां या पिसू घाटींतून जें लॅन्डस्केप दिसतं ना, तें केवळ अप्रतिम! तुम्ही दहा हजार फुटांवर प्रचंड वृक्षतळीं बसलेले असतां, वाहात गर्जत चाललेला ओढा तुमची नजर ओढून नेत असतो आणि खालच्या हजारों फूट खोल दरींत आ॰ण अदृश्य होतों. जांभळ्या रंगाच्या साम्राज्यांतून मग तुम्हीं पलीकडल्या आकाशाला भिडलेल्या पहाडांतले सनातन बर्फाचे थप्पे पाहतां, बर्फाच्या पलीकडे पाण्याचा ओहोळ बर्फांत गुप्त होतो आणि फर्लांगभर खाली (प्रत्यक्ष मैलभर सुद्धां असेल) तो दुग्धस्त्रोत पुन्हां प्रगट होतो. हें रौद्रभीषण स्वरूप असलं तरी

तितकंच संतुलित आहे. यांतलीं वैविध्यं उत्कट आहेत. म्हणून याच्यासारखं हेंच, म्हणावंसं वाटतं. ”

“ तुम्ही कविता करतां का हो रेमंड साहेब ? ”

“ कां हो ? लग्नापूर्वी करीत असे. आतां साधा इंजिनियर आहे. ”

“ बरोबर ! सृष्टीचं हें प्रचंड यंत्र पाहायला निघालेल्या कवि-इंजिनियरा-सारखेच वाटताय तुम्ही ! ”

“ खरं म्हणजे काय कशापेक्षां श्रेष्ठ आहे हें ठरविणं कठीण आहे ! ”

“ श्रेष्ठ–कनिष्ठ वादांत आपण पडाच कशाला ! आपण कोण मोठे लागून गेलां आहांत टिक्कोजीराव ! ”

“ राईट यू आर ! त्याच्यांत मग अभिनिवेश येतो. आणि रसिकाची भूमिका सुटते. ” आतां मात्र त्यानं टाळी दिली होती माझ्या हातावर.

म्हणजे आम्ही सुरुवात केली ‘ पहलगांव श्रेष्ठ ’ या अभिनिवेशानें आणि शेवटीं या अध्यात्मावर येऊन संपविलें. नऊ वर्षांपूर्वीचं हें सगळं !



*शिशनाग तलावावरची हिमनदी*

१५८०



पहलगांवची तिकिटें आम्हीं कालच काढलीं होतीं म्हणून बरें नाहींतर आज कांहीं जागा मिळाली नसती. आमची बस होती टुरिस्ट बस. जागोजाग थांबणारी नि कांहीं ठिकाणीं तर वाकडी वाट करून जवळपासच्या सुद्धां पाहाण्यासारख्या ठिकाणीं जाऊन येणारी. शाळेच्या मुलांसारखी किंवा प्रवासी कंपनीच्या ट्रिप सारखी ही सहल होणार आहे. ' आमचा पहलगांवचा प्रवास ' म्हणून शाळेच्या षण्मासिकांत लिहितां येणासारखी. बसमध्यें इंदूरच्या कॉलेजमधलीं ट्रान्झिस्टरवालीं मुलें आहेतच. सपिंडी श्राद्धऐवजीं चटश्रद्धावर आम्ही भागविणार आहोंत. ऋतूहि असा आहे कीं फुरसत असती तरी आम्ही यापेक्षां फारसा मोठा पराक्रम करूं शकत नाहीं. पहाडी सहलींचा हंगाम जवळ जवळ संपला आहे. एकाद्या सात-आठ मैलांवरच्या ठिकाणीं जातांना सुरक्षित गेलांत तरी येतांना हिमवादळ होणारच नाहीं अशी खात्री कुणी देत नाहीं. इतके मार्ग दुर्गम झाले आहेत.

आजच्या दिवसांत पांच-सहा ठिकाणें आमच्या रेकॉर्डला लागणार आहेत. कुकर नाग (हत्तीच्या सोंडेएवढे अनेक डोंगरी झरे ) अच्छाबल ( झरा + मुंगल बगीचा, ) अनंत नाग ( झऱ्यांची पुष्करिणी ) आणि मार्तंड (तीर्थ ) हीं चार ठिकाणें पाहूनच आम्हीं दुपारीं पहलगांवला पोहोंचलों. गांवांत शिरायच्या आधींच गेल्या वर्षी डोंगरावरचा जलशय फुटून त्या पाणलोटानें जो हाहाःकार उडविला होता त्याच्या खुणा उजव्या हाताच्या डोंगरांत दिसल्या. डोंगर कड्यावरून सुटलेल्या पाणलोटानें थेट नदीपर्यंत एक चांगली दगड-गोट्यांनीं भरलेली एक घळच तयार झालेली दिसली. या क्लाउडबर्स्टचें वर्तमानपत्रांतून आलेलें शब्दचित्र माझ्या नजरेसमोर उभें राहिलें. एक हॉटेल या प्रवाहांत सांपडलें. आणि त्याचा वरचा मजलाच्या मजला त्यानें लिद्दर नदींत नेऊन सोडला. दिव्याच्या राक्षसानें सोडावा तसा. या हॉटेलची धडगत नाहीं असें पाहिल्यावर एका जोडप्यानें खिडकींतून उड्या टाकल्या. कशीबशीं तीं वाचलीं. बाकीचीं तीस माणसें खलास ! हा सरकारी आंकडा आहे. तोच विश्वसनीय असावा. कारण इथले स्थानिक घोडेवाले चाळीसपासून शंभरापर्यंत अनेक आकडे आतां सांगतात.

एक प्रवासी, सामान त्या हॉटेलांत ठेवून नुकताच बाहेर पडला होता तो सुदैवानें वाचला होता. असे सुदैवी फारच थोडे होते. दुर्दैवीच जास्त. आतां त्या प्रसंगावर सुरस आणि चमत्कारिक दंतकथा पहलगांवांत आकार घेत आहेत. पाण्याच्या प्रचंड वेगानें [illegible]च [illegible]ंत [illegible]ती. [illegible] आलेली प्रत्येक

क्रमांक ७४०८८ दि. १५ मार्च

वस्तू होती का नव्हती करून टाकली होती.

पहल्गांवला आलों तो उशीर झाला होता. तरीहि 'पूर्णिमे'त अनपेक्षित गरमागरम जेवण मिळालें. गाडी सुटायला संध्याकाळीं सहा वाजणार होते. म्हणून एक लहानसा फेरफटका घोड्यावरून करून यायचें ठरविलें.

" तुमची का घुडस्वारी जमते हो? कांहीं कठीण नाहीं त्यांत!" अण्णा महादेवाचें दर्शन घेऊन बाहेर आल्यावर पुन्हां स्वार होण्याआधीं मला सांगत होते.

" तशी सोपीच आहे हो! म्हातारीं कोतारीं नि दुर्बळ माणसं सुद्धां जातातच तट्टांवरून. चालत चढण्यापेक्षां पुष्कळ सोपं."

" जन्मांत पहिल्यांदा बसलों घोड्यावर. पण मला सरावच आहे अशासारखं वाटतं."

" असं! पण रात्रीं बघा कशी मजा होईल."

" मजा?"


" तर हो! बैठकीची चामडी हुळहुळी होते."

" तासाभरांत?"

" बघालच आज रात्रीं!"

अण्णांच्या वयोमानाप्रमाणें आणि माझ्या अपेक्षेच्या मानानें त्यांना स्वारी चांगली जमली होती. पंधरावीस दिवस आधीं आलों असतों. तर पांच-सात मैलांतल्या सहली त्यांना त्रास न होतां जमल्या असत्या.

पहल्गांवच्या आमच्या जुन्या घोडेवाल्या मित्राची, खलीकूची मला आठवण झाली. त्याला मुद्दाम बोलावून घेतला. माझ्या प्रमाणेंच आमच्या पुनर्भेटीची त्यालाहि मजा वाटली. वाटेंत भेटला असता तर मी त्याला ओळखलें नसतें. मागील वेळीं, तोच आमचा मार्गदर्शक होता. या वर्षी आतां अमरनाथची गोष्टच बोलायला नको होती. म्हणून त्यानें निरोप घेतांना मला बजावलें होतें, " ऑगष्ट-मध्यें बाईसाहेबांना ( आमच्या ) घेऊन या. आपण जरूर दर्शन घेऊं." त्याच्या मुलांना खाऊला दिलेले पैसे मला त्याच्या खिशांत जबरदस्तीनें कोंबावे लागले. माझ्या 'भावीला'ला त्याच्या 'भाबी'चा नमस्कार प्रविष्ट करण्यास सांगून मी त्याचा निरोप घेऊन गाडींत येऊन बसलों.



शेतकरी-घोडेवाल्याचे कुंटुंब

परवांची पठाणकोटची परतायचीं तिकिटें नोंदवून झालीं आहेत. कुणाच्यातरी कृपेनें ! हीं मात्र पहिल्या बाकाची आहेत.

उद्यां जमल्यास गुलमर्गला जाऊन येण्याचा विचार आहे. गुलमर्ग झाल्यावर आण्णांची ही प्रवासी डब्यांतल्याप्रमाणें होणारी कश्मीर यात्रा सुफल-संपूर्ण होणार आहे. आण्णांच्या वयाच्या मानानें आण्णा चांगले टिकले आहेत. इथल्या मर्यादित भटकण्याचा वचपा कुलूला भरून निघायचा आहे.

♣♣

पठाणकोट, (रिटायरिंग रूम)

*ऑक्टोबर २२, १९६४*

**पुन्हा** तीन दिवसांची रोजनिशी लिहीत आहे. पण इलाज नाहीं. काल पहाटे पंच पंच उषःकालीं उठून सहा वाजतां प्रवासी केंद्रावर हजर झालों. साडेसहा वाजतां बस सुटायची होती म्हणून तशी सूचना होती. प्रत्यक्ष सुटली मात्र सात पन्नासला.

कश्मीर आम्ही सोडत होतों. येतांना वाटलें होतें तितकें कश्मीर रुक्ष नव्हतें. पाण्याच्या सुकाळामुळें तें पार सुकून केव्हांच जात नसावें. बर्फकाल अर्थातच याला अपवाद.

येतांना आमच्या जागा शेवटच्या क्रमांकाच्या होत्या. तरी गाडी पहिली होती. त्यामुळें सर्व ठिकाणीं वेळेवर पोहोचून प्रवास झक्क झाला होता. आतां जागा पहिल्या क्रमांकाच्या असल्या तरी बाकी सर्वच हाल झाले. लष्करी गाड्यांचे तांडे नि रस्तादुरुस्तीची धूळ यांनीं हैराण केलें. बरें, असें जेवण कुठेंच मिळालें नाहीं. वेळेवारीं असें कुठेंच कांहीं होऊं शकलें नाहीं.

रात्रीं जम्मूला पोचायला अर्थातच उशीर झाला. झोपण्यापुरतीच तिथें वस्ती करायची होती. धड जागा कुठें मिळेना. अखेर गोठ्यासारखी एक खोली मिळाली. या गोठ्यांत गुरें नव्हतीं आणि गोठ्याचें नांव 'जयमहाल' होतें. संडास वर धाब्यावर. भाडें रुपये तीन. आम्हाला केवळ आठ तासच जागा पाहिजे होती. पहाटे साडेपांचला गाडी निघायची होती. कारण त्याच गाडीला पुन्हा लगोलग श्रीनगरला परतायचें होतें.

पुन्हां पहाटे उठून सामान बांधलें. आणि दिसायला लागायच्या आधीं आम्ही टवी नदी ओलांडली. पुढच्या सीटचा आज मात्र छान लाभ झाला.

सूर्योदयापूर्वीची उषा आणि अरूण यांची जादू आम्ही अनुभविली. तसा तर कैक वेळा निरनिराळ्या ठिकाणाहून हा प्रकार अनुभवला आहे; पण म्हणून काय त्यांतली जादू संपते थोडीच !

साडेआठ वाजतां आम्ही पठाणकोटला पोहोचलों सुद्धां. कुलूची बस आधींच सहा वाजतां सुटून गेली होती. एक आख्खा दिवस इथें थांबायला पाहिजे होतें. म्हणून ही रिटायरिंग रूम गांठली.

ही मात्र झक्क आहे. मुख्य म्हणजे अतिशय स्वच्छ आहे. इतकी कीं घाणेरड्या माणसासहि घाण करायला इथें शरम वाटावी. प्रथम टोपलेंभर कपडे धुतले. गरम पाण्यानें अगदीं अभ्यंग स्नान केलें. सगळ्या आठवड्याचा शीण नाहींसा झाला. प्रवासांत सुद्धां आठवड्यानें एकाद् दिवस विश्रांती पाहिजेच. शिवाय मुंबईला परतायची एकतीस अगर एक तारखेची रेल्वेची जागा राखून ठेवायची होती.

दहा वाजतां कुलू प्रवासी-केंद्रांत गेलों. आम्ही ठरविलेल्या कार्यक्रमांत कांहीं इष्ट सुधारणा करतां येतात का त्या पाह्यच्या होत्या. कुलूला पोहोंचल्यावर एकादी जीप मिळाली असती तर आम्हाला पाहिजे होती. भाड्यानें. तिथं मग पायाशिवाय दुसरें कांहीं साधन नव्हतें. ती मिळावी म्हणून चांगली शिफारस-पत्रें आम्ही घेऊन ठेविली होती. परंतु तिथें जाऊन कांहीं एक वळलें नाहीं. आणि आमच्या पुस्तकी नि ऐकीव कुलू-खोऱ्याच्या ज्ञानांत कांहीं भर पडली नाहीं.

संध्याकाळीं मुंबईला परतायचीं तिकिटें नोंदलीं आणि निश्चित झालों. आतां कुलूची हुरहुर मनाला लागून राहिली आहे. कसली तरी हुरहूर, कसली तरी काळजी, फिकीर, मागें लावून घ्यायची मला संवयच आहे. डोक्यावर कसला तरी बोजा असला पाहिजे. त्या शिवाय मी ताठ राहूं शकत नाहीं कीं काय कुणास ठाऊक !

उद्यां पुन्हा पहाटे उठायला हवंय !

## कुलू ( टूरिस्ट बंगला II )

*ऑक्टोबर २३, १९६१*

**नव्या** मुलुखाच्या सहलीला अशी माझी आज सुरुवात झाली. कुलू खोऱ्याला देवाचें खोरें म्हणतात. या खोऱ्याविषयीं माझें कुतूहल बऱ्याच वर्षांचें आहे. मुग्ध सृष्टिवैभवानें नटलेला, माणसानें न बिघडविलेला असा हा भारताचा पश्चिमोत्तर भाग तसा दुर्लक्षितच आहे. परंतु सृष्टिकर्त्यानें उत्पन्न केलेल्या मूळ स्वरूपांत आहे.

गिरिशिखरें मला बोलावतात म्हणून मीं म्हटलें तर तें कवीसारखें दिसेल. कवीसारखें दिसलें म्हणून मोठेंसें कांहीं बिघडत नाहीं. परंतु त्या नसत्या गुणवत्तेचा आरोप आपल्यावर हवा कशाला ? सांगायचा मुद्दा एवढा कीं डोंगरांत भटकणें लहानपणापासून आपल्याला बुवा आवडतें ! त्यांत आतां पंधरा वर्षांपूर्वी हिमालयाचें किंचिद्दर्शन झाल्यापासून दरवर्षीं त्या शुभ्र धवल हिममुकुटांचें आकर्षण वाढतच चाललेंय.

उषा, अरुण नि प्रभाकर यांचा आजचा रंगविलास विशेष उत्कट असतो. ऋग्वेदांतील उषेचें वर्णन मला आठवतें. त्या बाबतींतला वाद आठवतो. ऋग्वेदांत उषेचीं अनेकवचनें आलेलीं आहेत. म्हणून एका पाठोपाठ येणाऱ्या या उषा, दिर्घकाल टिकणाऱ्या उषा, या आर्टिक क्षेत्रांतीलच असल्या पाहिजेत. त्या अपौरुषेय साहित्यांतील, बाकीचें अध्यात्म सोडलें तरी केवळ त्या प्रदीर्घ उषामहात्म्यासाठींच तें साहित्य वाचावें, अशा योग्यतेचीं तीं वर्णनें क्षणकाल टिकणाऱ्या उषेचीं खास नाहींत. हा लोकमान्यांचा मुद्दा.

यावर शंकाखोरांचा उत्तरपक्ष असा कीं त्या अनेक उषा–आजची उषा, कालची उषा, परवांची उषा अशा अर्थी–अनेक असूं शकतील.

कालची उषा मी पाहिली होती. आजची पाहिली. मी कवि नाहीं. प्रतिभावान नाहीं. कुठल्याहि पक्षाचें समर्थन करण्याइतपत विद्वान नाहीं. तरीहि एक सामान्य वाचक म्हणून मला आपलें वाटतें कीं ऋग्वेदांत जीं प्रदीर्घ वर्णनें उषा सौंदर्याचीं आहेत त्यांची प्रचीति यायला ही क्षणैक टिकणारी, मी दोन दिवस पाहिलेली उषा पुरेशी नाहीं.

विचारतो कोण माझ्या या मताला ! तरी सुद्धां वाटायचें तें वाटतेंच ना ! तें आपल्याच रोजनिशींत नमूद करायला कोणती हरकत आहे ?

"प्रतिक्षणं यन्नवतामुपैति । तदेवरूपं रमणीयतायाम् ॥" या कोटींतील रमणीयता आम्ही दोन्ही दिवस पाहतों आहोंत. यावर छत्तीस वेळा 'स्वयंवर' नाटक पाहिलेल्या नाटकवेड्याची गोष्ट आण्णांना आठवते. त्यावर चौदा वर्षें दरवर्षी बद्रीकेदारची यात्रा करणाऱ्या, हिमगिरीचे वेड असणाऱ्या यात्रीची गोष्ट मी त्यांस सांगतों.

उषा, अरुण नि प्रभाकर या तिन्ही भावंडांच्या पराक्रमाचें क्षेत्र आज थेट आमच्या नाकासमोरच आहे. कालच्यासारखी जरासुद्धां मान तिरकी करायला आज लागत नाहीं."घनःशाम सुंदरा, श्रीधरा, अरुणोदय झाला..." ही भूपाळी आमच्या मनांत आपोआप घुमूं लागते. "करिती सडा संमार्जन..." इथपर्यंत ती उलगडते. आणि काय योगायोग पाहा ! बाहेर पाहातों तों नूरपूर हें जुन्या राजधानीचें गांव ('काप गेले नि भोकें राहिली' अशी दशा प्राप्त झालेलें) आलेलं असतें. या नगरींतील पुरंध्री सडा संमार्जनाचें प्रात्यक्षिक करतांना दिसतात. कडेवर घंड घेऊन पाणी आणीत असतात. शारदा, सौभद्र हीं नाटकें जशीं अजून ताजींच, तशींच ही अमर भूपाळी ! तें प्रसन्न काव्य अंतर्बाह्य अनुभवाला मिळत असतें. मनांत मी ती भूपाळी आळवून आळवून म्हणत असतों. (मोठ्यानें म्हणायची आमच्या सारख्याला काय सोय आहे ! )

गाडी नूरपूरच्या थांब्यावर थांबते. एका उत्पाताच्या वेळीं काश्मीरमधले कारागीर परागंदा होऊन इथें स्थाईक झालेले असतात. परंतु प्रभातकाळ असल्यामुळें त्यांची कारागिरी एकाद्या दुकानांत जाऊन पाहाण्याची सोय नसते. उबदार किरणें पडायला सुरुवात होते न होते तोंच गाडी हलते. गाडींतल्या जागा आतां फारशा रिकाम्या राहिलेल्या नसतात.

रस्ता थोडा चढ-उताराचा आलेला असतो. लहानसा घाट पार करून गाडी

पुढें सरकते. वाटेंत एक चौकी लागते. चौकींत चौकीदार तर नसतो. आमच्या गाडीची नोंद तर व्हायला पाहिजे असते. म्हणजे आली आतां चांगलाच खोळंबा व्हायची वेळ ? पण नाहीं. खोळंबा होत नाहीं. आमच्या सारखी बसच्या चालकापुढें कांहीं समस्या नसते. तो खालीं उतरतो. आणि सरळ सरळ चौकींत जातो. टेबलाच्या खणांतून नोंदवही काढतो. जी काय नोंद करायची ती करतो. नि वही होती तिथें ठेवून दुसऱ्या मिनिटाला गाडींत चढतो. चढतां चढतां तो 'टणटण' करतो. नि बस चालू सुद्धां होते. चौकीदाराची सही मात्र त्यानें केली नसावी. फुरसतीनें तो ती स्वतःच करणार असेल. 'एकमेका सहाय्य करूं अवघे धरूं सुपंथ' अशा प्रकारची या पंजाबांत सहकाराची भावना बरीच रुजलेली दिसते. नाहीं तर बऱ्या कारभाराबद्दल प्रसिद्ध असलेल्या आमच्या महाराष्ट्रांत आहे का अशी सहजीवनाची नि सहकाराची भावना ?

भूपाळीचा प्रहर आतां संपलेला आहे. कारण दुतर्फा शेतांतून किसान नरनारी आपल्या न्याहाऱ्या आटोपून (हें गृहीत धरलेलें आहे) कामाला लागलेल्या आहेत. त्यांची सुगी आतां नसून पुढें असावी. गव्हाची. काश्मीर खोऱ्यांत उतरल्याबरोबर दुतर्फा असलेली सफेदाची वृक्षराजी जशी प्रवाशाला मानवंदना देते तशीच खडी ताजीम, शिसमची वृक्षराजी या पंजाबी रस्त्यावर देते. इथल्या डोंगरावर हिरव्याची निळाई झालेली नाहीं. ती होते हिमाच्या सान्निध्यांत. आजच्या प्रवासांत तोहि भाग येतो. पुढें गेल्यावर. निदान कुलू खोऱ्यांत तरी !

आज पहाटे पठाणकोटच्या फलाटावरच चहा झाला होता. अगदीं वैचत्र ! पुळकवणी ! आमच्या आजीच्या शब्दांत म्हणजे 'मांजर-मुतवणी.' (तें कुणीं चाखलेलें असतें कुणास ठाऊक ?) परंतु याचा वचपा आम्हीं आतां आठच्या सुमारास त्रिलोकपूरच्या टावरणांत काढतों. इथें 'चाय' झक्क आहे. ताज्या खऱ्या दुधाचा. (नाहीं तर जिथें पाहावें तिथें आपलें डब्याचें दूध ! प्रवासी म्हणजे काय लहान मुलें असतात ? डब्याचें दूध कशाला ?) ह्या टावरणाच्या शेजारीं एक स्वच्छ पाण्याचा चश्मा आहे. म्हणूनच कीं काय, इथें स्वच्छता सुद्धां बरी आहे.

शिवाय देशी तुपांतली मिठाई ! (अलिकडे हा फक्त शब्दप्रयोग राहिला आहे. इथें त्याचा प्रत्यक्ष प्रयोग झाला आहे.) तोंडांत टाकल्याबरोबर विरघळणारी.

चावण्याचे श्रम न पडतां. माशा अर्थात् होत्याच. तो इकडे मिठाईचाच भाग समजला जातो. हें आरोग्यशास्त्र आपल्या गळयाखालीं कांहीं उतरत नाहीं. यावर आण्णा एक तोड सुचवितात. कढईत प्रत्यक्ष जो पदार्थ आमच्या समोर चालू असतो (हा परवांच्या शिळ्या भाजीचा, काल केलेला बटाटेवडा आज पुन्हा तळणींत टाकलेला नव्हे !) तेव्हढाच ताजा आम्हीं घेतों. माशा त्याचा एक भाग व्हायच्या आधीं. फार दिवसांत इतका उत्तम नाष्ता जमला नव्हता.

साडे नऊच्या सुमारास पालमपूर येतें. (हें मुंबईच्या व्हिक्टोरियावाल्याचें पालनपूर नव्हे ). गाडी इथें अर्धा-पाऊण तास उभी राहाणार आहे. आम्हीं पाय मोकळे करून येतो. ही नगाधिराजाची एका उपत्यका आहे. उंची एके-चाळीसशें फूट. कश्मीर, कांगडा नि कुलू या तीन 'क' कारांपैकीं दुसऱ्या ककारांतून आमचा प्रवास चालू आहे. कांगड्यांतील या पालमपूरला डलहौसी या थंड हवेच्या ठिकाणाची प्रतिष्ठा आहे. देवदाराचे चहूकडे दाट जंगल आहे. जिकडे बघाल तिकडे 'अयं सते तिष्ठति देवदारु । पुत्रीकृतो येन वृषभध्वजेन ॥ '

उतारावर चहाचे मळे आहेत. एका लष्करी तांड्याला वाट देण्याकरतां गाड्या थांबतात. शेजारच्या मळ्यांतलें चहाचें पान खुडून मी हातावर चोळून बघतां. चहा निलगिरी आहे का दार्जिलिंग ! पण कसलं काय ! पानांना चहाचा सुद्धां वास येत नाहीं. रानटी झाडाचा उग्र वास ! हा कसला आलाय चहा ! गाडींतच बसून राहिलेला एक शेमलेवाला सेठी माझ्या मर्कटलीला पाहात असतो. मी गाडींत पुन्हा बसल्यावर मला तो समजावतो. जून झालीं पानं कीं खुडून तंदूरींत भाजतात. त्यावर आणखी कांहीं संस्कार झाल्यावर मग त्यांना चहाची खुशबू येते. पूर्वी इथें 'हरी पत्ती की चाय' पिकवीत असत. वायव्येकडील प्रांतांतून त्याला चागली मागणी असे. परंतु आतां तें दळणवळणच बंद झाल्यामुळें इथें फक्त 'काली चाय' पिकवितात. चहा उंची असतो.

पालमपूरच्या आधींपासूनच पठाणकोट ते जोगिंदरनगरची मीटर-गेज रस्त्याला सोबत करते. आणि आतां अकरा मैलांवरील बैजनाथपर्यंत दोघं गप्पा मारीतच चाललेलीं दिसतात. बैजनाथ पालमपूरसारखेंच उंचावर आहे. बहुतेक शहरं इकडे उंचावरच आहेत. खलाटींत शेतं नि शेतघरांच्या वाड्या-पाडे दिसतात. गाडी तळाजवळच दोन फर्लांगावर सुप्रसिद्ध बैजनाथ-शिवमंदिर आहे.

गाडीवाला जेवणासाठीं गाडी इथें थांबणार असल्याचें जाहीर करतो. परंतु इतक्या लौकर आम्हांला भूक लागलेली नसते. म्हणून आम्हीं शिवमंदिराकडे मोर्चा वळवितो! दक्षिणेंतला विस्तीर्ण प्राकार इथें नाहीं. परंतु लहान असली तरी अत्यंत सुडौल बांधणीची ही एक पुरातन वास्तू आहे. गुळगुळीत कोरीव दगडाची. उमललेल्या फुलाऐवजीं गोजिरवाण्या कळीसारखी. सन ८०४ सालचा एक शिलालेख या मंदिरांत आहे.

बैजनाथ नंतर कांगडा जिल्ह्याची तशीच पंजाब प्रांताचीहि हद्द लौकरच संपते. पूर्वेकडे लागूनच कुलू जिल्हा आहे. हा पंजाबचाच. परंतु वाटेंत पहाड आहेत. त्यांना वळसा घालण्याकरितां गाडी हिमाचल प्रदेशाच्या मंडी जिल्ह्यांत दक्षिणेकडे उतरते.

गुणवैधर्म्य हें कांडडा जिल्ह्याचे वैशिष्ट्य. जणु सुखदुःखमय जीवनाचें प्रतीक! आतां पांच मैल सपाटीचे गेले तर पुढचे पांच मैल चढावाचे. वर चढल्यावर मागें वळून बघावें तर शेतजमिनीच्या सोनसळ्या नि डेरेदार वृक्षांच्या बुट्ट्या काढलेले अनेक शालू उन्हांत पसरून वाळत घातल्याचें विलोभनीय दृश्य दिसतें. लहान टेकड्या म्हणजे लोकर कापायला झालेल्या गुबगुबीत मेंढ्याच जणूं!

आतां थंडीचा हंगाम जवळ येत आहे. म्हणून बर्फाला सुरुवात व्हायच्या आधीं आपापलीं जनावरें मैदानी प्रदेशाकडे हाकून न्यायची सगळ्या मेंढपाळांची नि गोपाळांची धांदल उडाली आहे. यांच्याकरितां वाटोवाट बस थांबवावी लागते. शुभ्र धवल वीत-वीत केसांच्या मेंढ्या आणि हात-हात लांबीच्या केसांची आयाळ असलेले मेंढे! मेंढपाळाची फिरान (कफनी) शुभ्र लोकरीची. तिला कमरबंध बांधला कीं तो एक होल्डॉलच होतो. आणि सर्पणासून नुकत्याच बाळंत झालेल्या मेंढ्यांच्या बाळांपर्यंत सर्व वस्तू याच्यांत मावतात.

बैजनाथच्या पुढें पंधरा मैलांवर येतें जोगिंदरनगर. गांवांत तसें पाहण्यासारखें कांहींच नाहीं. परंतु गांवाबाहेर मात्र आहे. डोंगरापलीकडे बारोटला एक जलविद्युत् केंद्र आहे. तें पाहायला जातात. प्रत्यक्ष तें पाहाण्यापेक्षां, तें पाहायला जातांना जो आठ हजारफुटी (समुद्रसपाटीपासून अर्थात) पहाड ट्रॉलींतून चढण्याचा वि उतरण्याचा अनुभव येतो तो थरारक आहे म्हणतात. इतका चढ नि उतार उभा आहे! ट्रॉलींत बसतांना सरकारवर प्रवाशाची जोखीम नसल्याचा 'इन्डेम्निटी बॉंड' लिहून द्यायला लागतो. बारोटला गेस्ट हाऊस पण

आहे. रेल्वेचा खंडाळा घाट नि खोपोलीचा मोटाररस्त्यावरचा उभ्या भिंतीं-सारखा भोरघाट ज्यांना वर्षांतून अनेक वेळां पार करावा लागतो त्यांना या ट्रॉलीचें ' थ्रिल ' किती अंशांनीं वाटेल यावर तें कौतुक अवलंबून राहील. हें उरकायचें म्हटलें तर आम्हांला दीड दिवस मोडावा लागणार आहे. तो आमच्या कोष्टकांत बसत नाहीं. म्हणून या ' थ्रिला ' ची द्राक्षें आंबट असें मात्र नाहीं.

जोगिंदरनगरच्या पुढें मंडी पस्तीस मैलांवर आहे. तीन चार मैलांवर गुमा आणि ड्रांगच्या मिठाच्या खाणी आहेत. जोगिंदरनगरहून बारोटमार्गे पद्यात्रा अगर घुडस्वारीनें मधल्या रस्त्यानें कुलूला गेल्यास त्या पहातां येतात. हें डोंगर-मीठ म्हणजे सैंधव असलें पाहिजे. जरा पुढें गाडी उतरल्यावर एक बऱ्यापैकीं नदी दिसते खालच्या दरींत. शेजारीं बसलेला लालाजी सांगतो तो ' ब्यास दर्या ' आहे. बियासची ही सोबत मंडीपर्यंत तर आहेच. पण थेट कुलूपर्यंत होणार आहे. कुलू खोरें म्हणजे मुळीं बियासचेंच खोरें.

मंडीला गाडीतळावर गाडी थांबते. आम्ही जेवायला जातों. जिथें बसतों तिथून तळावरची गाडी दिसत असते. जेवण संपतां संपतां मला दिसतें कीं कुणीतरी टपावरून आमचें सामान खालीं काढीत आहे. कसाबसा हात धुऊन आण्णांना सांगून तिकडे धावतों. गाडींतल्या सगळ्या मंडळींनीं केव्हांच सामानासह गाडी बदललेली असते. पहिली आम्ही आलेली गाडी आमच्या सामानामुळेंच खोळंबलेली असते. शेवटीं चालकांनीं आमचें सामान काढून ठेवून गाडी तबेल्यांत नेण्याचें ठरविलेलें असतें. आतां इथें गाडी बदलायची आहे हें आम्हांला काय माहीत ! आमचें तिकिट तर थेट कुलूचें होतें. रेल्वेचें तिकिट थेट टिंबक्टूचें मिळतें नि वाटेंत दहा वेळां गाडी बदलायला लागते हें माहीत आहे. परंतु बसचें सुद्धां तसें असूं शकतें ही कल्पना नव्हती. ती तशी कल्पना आम्हांला चालकानें कां दिली नाहीं म्हणून विचारतांच, आम्हीं नवे आहोंत हें त्यास माहीत नव्हतें, असें उत्तर आलें. आतां तर आम्हांला इन्फंटीतली पोरें समजून सगळेच आपापल्या परीनें समजावूं लागलेले असतात. आम्हीहि भोले बनून ऐकतो.

हिमाचल प्रदेश आणि कुलूंत दोन निरनिराळ्या कंपन्याची मक्तेदारी आहे. म्हणून गाडी बदलावी लागते. तिकिटाचे पैसे प्रमाणांत वाटून घेतले

जातात. म्हणून तिकिट एकच चालतें. नवख्या माणसास न सांगतां हें कसें समजावें ! गाडींत नवखे फक्त आम्हीच होतों. दोघे.

मंडी हें जिल्ह्याचें ठिकाण असलें तरी त्याला इतर महत्त्व काहींच नसावें. उंची चोवीसशें ऐंशी फूट असल्यामुळें हवा बरी आहे. तरीसुद्धां जुन्या नदीकांठच्या गांवांसारखें दाट नि कोंदट वस्तीचें आणि थोडेंसें गलिच्छच वाटतें. रवळसार या तीर्थक्षेत्राला जाण्याकरतां मंडीलाच यावें लागतें. सिमल्याकडून येणारा रस्ता इथेंच येऊन मिळतो.

तीन मैलांवर गेल्यावर पायउतार व्हावें लागतें. गाडी पुलावरून रिकामी जायची असते. पूल जुना आहे. आतां बियास कांठ धरूनच गाडी रस्ता चढत जाते. कुलू हा पंजाबचा निराळा जिल्हा बनविला आहे. हिमाचल प्रदेशाची हद्द संपून गाडी पुन्हा पंजाबांत प्रवेश करते. कुलू खोऱ्याची लांबी एकूण शंभरएक मैल. पार रोहटांग खिंडीच्या पायथ्यापर्यंत. म्हणजे बियासच्या उगमापर्यंत.

मंडीच्या पुढें रस्ता आतां अरुंद दरींतून चढत आहे. दरींत गर्जणारी बियास आहे. वाहातूक एकमार्गी आहे. भर दुपारीं इथें उन्हाचा कवडसा सुद्धां नाहीं. वाहातूक दुमार्गी असावी म्हणून नदीच्या पलीकडील अंगाला नव्या रस्त्याचें काम चालू आहे. ही दरी म्हणजे पंचवीस मैल लांबीची एकच एक खिंड आहे. दोन्ही बाजूंच्या पाहाडी भितींवर दाट जंगलें आहेत. म्हणून दरीचं स्वरूप रौद्र भासत असलें तरी आकर्षक आहे. नजर सारखी वर-खालीं कोसळत असते. तरी काढून घ्यावीशी वाटत नाहीं.

औटला खिंड संपते. खोऱ्याला सुरुवात होते. रस्त्यांत एक आडवी सांखळी औटच्या भर बाजारांत रस्त्याच्या वळणावर बांधलेली आहे. ही चार वाजतां उचलणार आहेत. मग दोन्ही बाजूंना तुंबलेली वाहातूक एकमेकांना डावलून पुढें चालू लागेल.

रेलगाडींत गर्दी असली म्हणजे कसें अंग चोरून बसावें लागतें ( बसायला जागा मिळाली तर ! नाहीं तर उभें राहावें लागतें तेंहि अंग चोरूनच. ) तसें दरीच्या अरुंदपणामुळें आम्ही उगीचच संकोचून गेलों होतों. आतां उन्हें दिसतात. आणि मोकळें मोकळें वाटतें. दिवस लहान आहेत. म्हणून आतां साडेचार वाजतांच सावल्या लांब लांब झाल्या आहेत.

मोठें असें गांव बजौरा येतें. इथें फक्त एक वजेश्वर महादेवाचें मंदिर आहे. दुसरें वैशिष्ट्य कांहींच नाहीं. बैजनाथ सारखेंच हें सुडौल लहानसें देऊळ आहे. १९०५ सालच्या भूकंपांत याचा एक खास कोरीव काम केलेला मूळचा भला मोठा दगड पडून दुभंगला. त्याचीच प्रतिकृति करून नवा बसविला आहे. हें मंदिर नदीकांठाकडे असून पुराणवस्तुखात्याचें संरक्षित शिल्प आहे.

बरी बाजार पेठ असलेलें अरुंद रस्त्याचें हें भुंतर. आतां कुलू फक्त सहाच मैल राहिलें आहे. उजव्या हाताला रस्ता दिसत आहे, हा पार्वती खोऱ्यांत जाण्याचा. कोपऱ्यांत मैदान दिसत आहे. हाच म्हणे कुलूचा विमान तळ. रन-वे कुठेंच दिसत नाहीं. हिरवळच दिसते आहे मैदान भर. डाकोटा, व्हायकौंट यांना एवढेंच पुरत असावें.

सकाळीं गाडींत बसल्यापासून सुमारें बारा तासांनीं केवळ पावणेदोनशें मैल प्रवास झालाय आमचा. आणि आतां दिवस मावळतांना आम्हीं कुलूच्या धालपूर मैदानांत उतरत आहोंत. मंडीपासूनच्या त्रेचाळीस मैलांनाच चार तास लागले आहेत. कुलू कुलू म्हणून घोकत होतों तें कुलू आलें आहे. परंतु उतरल्या-बरोबर चपळाई करावी लागत आहे.

मी गाडींतून उतरल्याबरोबर टूरिस्ट ब्यूरो गांठतो. सामानबिमान अण्णा उतरून घेतात. निरनिराळ्या बंगल्यांपैकीं एकच ब्लॉक शिल्लक असतो. तो आम्हांला मिळतो. परंतु एक लालाजी त्या ब्लॉक बरोबर भागीदार घ्यावा लागतो. चांगला माणूस वाटला. एकटाच होता. त्याला संबंध ब्लॉक काय करायचा आहे ? म्हणून तो आमच्या सारख्यांची वाट पाहात होता. आम्हां तिघांचीहि सोय होते. लालजीचें नांव चिरंजीलाल.

इथल्या पहाडी हमालांची कमाल आहे. शिरपुऱ्या दिसणारा एक पठ्ठा आमचे चारी डाग पाठीवर बांधून घेतो. आणि तिथून पांच फर्लांग अंतरावरच्या टेकाडावर सहज एकटा वाहून नेतो. तो दीड रुपाया हमाली घेतो. ती वाजवीच असते. त्यानें आडवून धरलें असतें तर आम्ही दुप्पट सुद्धां दिली असती. त्यांतला एकहि डाग एवढ्या उंचावर नेण्याची आमची ताकद नाहीं. बसून बसूनच आम्ही दमलों आहोंत.

रात्रीचें जेवण आटोपल्यावर आतां या ठिकाणाकडे लक्ष जात आहे.

बंगल्याची बांधणी आपली सरकारीच आहे ! परंतु ठिकाण उंचावर नि मोक्यावर आहे. भुंतरच्या अलिकडला थेट नाकासमोरचा पहाड म्हणे बिजली महादेवाचा.



*नाकासमोरचा डोंगर बिजली महादेवाचा*

टिपूर चांदणं पडलं आहे. पौर्णिमा काल-परवांच झाल्याचं आठवतं. हें आवार तसं खूब मोठं आहे. कोंकणांतल्यासारखी कोणतीहि वस्ती इथें डोंगराच्या कुशींतच असायची. 'जरा एक फेरफटका मारून येऊं का ?' म्हणून आण्णा सुचवितात. आम्ही बाहेर पडतों. परंतु फारसें कुठं भटकण्या-ऐवजीं आमच्या घरांच्या समोरच सज्जासारख्या एका डोंगरी ओट्यावर आम्ही बसतों. कुलूचं पहिलं दर्शन तरी फार आल्हादायक आहे. खालच्या बियासच्या पलीकडल्या पहाडावर वस्ती दिसत आहे. मैल-अर्ध्या-मैलावर लुकलुकणाऱ्या एकाद्या दिव्याच्या अस्तित्वामुळें ती जाणवत आहे. एवढ्या उंचीवर हीं शेतघरंच असलीं पाहिजेत. किती कष्टाळू जीवन हें ! डोंगराला

ओटे पाडायचे आणि कांहीं तरी धान्य तिथें उपजावयाचें ! सबंध रत्नागिरी जिल्हाभर हेंच जीवन आहे.

आम्ही बसलों आहोंत त्याच्या मागच्या पहाडापलीकडे कैंसधार वगैरे आणि समोरच्या पहाडावरच ‘ बिजलीमहादेव ’ हीं ठिकाणं असल्याची उठतां उठतां जाणीव होते.

♣ ♣

## कुलू (टूरिस्ट बंगला)

### ऑक्टोबर २४, १९६४

**आज** इथून मुक्काम हलवून कुठें दूर जायचें नव्हतें. धालपूर मैदानांतील यात्रेचा नि महोत्सवाचा आज शेवटला दिवस होता. उत्सव फारसा राहिलाच नव्हता. पळती यात्रा असली तरी अद्याप ती संबंधच्या सबंध मैदानांत शिल्लक होती. आपल्याकडे दसरा हा महोत्सवाचा अखेरचा दिवस असतो. तर इकडे तो पहिला दिवस.

आज सकाळीं बाहेर पडलों तेव्हां आमचा खोली-मित्र चिरंजीलालहि आमच्या बरोबर होता. याचें नांव चिरंजीलाल असलें तरी आण्णा आणि मी आपसांत त्याचा उल्लेख 'भाऊभट' म्हणून करतों. पहिल्याच दिवशीं आम्ही बंगल्यावर यायच्या पूर्वीं टूरिस्ट ऑफिसरशीं, आमच्याशीं आणि हमालाशीं सुद्धां तो ज्या कोंकणी धूर्तपणानें वागला होता त्यावरून मला आमच्या भाऊभटाची आठवण झाली, आणि या चिरंजीलालचें बारसें करून आम्ही मोकळे झालों होतों.

व्यवहारांत हा जरी असा कोंकणी माणसाचा नमुना असला तरी एरवी सहवासाला हवाहवासा वाटणारा ऐसपैस पंजाबी आहे. साठीच्या पुढल्या उमरींतला असून याची 'टांगें' (त्याचाच शब्द) मजबूत आहेत. उत्साह उतूं जातो आहे. बोलण्यांत खानदानी अदब–आर्जवीपणा असून शिवाय विनोदाचें इंद्रिय शाबूत आहे. भरदार आवाजांत पंजाबी किस्से हा सांगूं लागला कीं वेळ चांगला जातो.

हा 'भाऊभट' एका उद्योग–समूहाचा प्रतिनिधी आहे. त्याच्या उद्योगपतीनें या पाहाडी मुलखांत, पुढें केव्हां तरी कामाला येतील म्हणून, धूर्तपणानें

रानें आणि जमिनी खरीदण्याचा सपाटा लावला आहे. त्याच कामासाठीं भाऊ-भट वरचेवर कुलूला येत असतो.

मैदानांत भाऊभटाला एक तलाठी भेटला. त्या तलाठ्याकडे काम असल्याचें हळूच आमच्या कानांवर घालून, मिष्टासपणें आमची क्षमा मागून स्वारी तुरु-तुरू चालत तलाठ्याबरोबर निघून गेली. पायांत सुरवार, अंगांत पैरण नि त्यावर पांघरलेली शाल आणि गळपट्ट्याची डोक्याला गुंडाळलेली टापशी, अशा वैशिष्ट्यपूर्ण पंजाबी पोषाखांतली खुसखुशीत बोलणारी ही स्वारी कोणाच्याहि लक्षांत राहावी.

आज दुपारीं भुंइन (भुंतरजवळ)च्या विमान तळावर याला आपल्या उद्योगपतीला निरोप द्यायला जायचें होतें. या मालकांबरोबर त्यांचे कांहीं हुद्देदारहि आले होते. राना-डोंगरांत हिंडायला त्यांना सोईस्कर जावें म्हणून एक जीपहि आली होती. जीपच्या दुर्मिळतेबद्दल मी आणि आण्णा सकाळीं बोलत असतां या भाऊभटानें आम्हांला एक आमीष लावून ठेवलें होतें.

" अजी, जीप म्हणजे चैन आहे चैन या मुलखांत! आणि तुमचा काका मामा इथें कमिश्नर असल्याशिवाय कितीहि पैसे खर्च केलेत तरी जीप तुम्हांला मिळणार नाहीं. "

" मग आम्ही करावं काय ? मुंबईचीं माणसं आम्ही! तुमच्या इतकीं आमचीं ' टांगं ' मजबूत नाहींत. "

" दूरान्वयानं एक गोष्ट संभवते. पण तुम्ही खात्री बाळगूं नका. मात्र मी कोशीस करीन माझ्याकडून होईल तितकी. "

" जीप मिळायची म्हणताय काय ? "

" तर ! दुसरी कसली ? "

" म्हणजे कसं काय ? माझ्या नाहीं लक्षांत आलं. "

" हे ' हत्तीचे बच्चे ' आले आहेत ना ? ते दोन दिवसांनीं जातील विमानानें. मग जीपवाला बदमाश आहे ना ? ड्रायव्हर ? तो एक दिवस तरी इथं चोरून भाडं करील आमच्या गांवीं पोचण्यापूर्वी. तेव्हां आपण जमवूं कांहींतरी त्या कंबख्तार्शी. "

" बडी मेहेरबानी होईल लालाजी; असं कांहीं जमविलंत तर ! "

" अरे भाई, आपण साथ राहाणारे ! माझं कांहीं खर्च न होता तुमची कांहीं

सोय झाली तर बडी खुषी होईल मला. त्यांत मेहेरबानी कसली ? पण तुम्हीं हें धरून चालूं नका हं ! मी आपला एक संभव सांगितला. आणि जमून यायला फारशी हरकत दिसत नाहीं म्हणून बोल्लों तुमच्याशीं."

"मग बघा जरा. हं ?"

"अरे जरूर जरूर. बेफिक्र राहा तुम्ही."

भाऊभटानें हें आमीष लावल्यावर आमच्या डोळ्यांसमोर रोहटांग घाटी दिसूं लागली. त्याला आम्ही बोलूनही दाखविली ती.

"असं बघा लालाजी ! उद्यां आणि परवां दोन दिवस जातील आमचे मणीकरणला. आणि आल्यावर म्हणजे आजपासून चौथ्या दिवशीं आम्ही, आम्हाला जर जीप मिळाली तर बडी फजल इथून निघूं. नग्गरला जाऊं. तिथून रोहटांगला जाऊन येऊं. आणि येतांना रात्रीपर्यंत जीपवाल्यानें आम्हांला मनालीला सोडावं आणि मग खुशाल आपला रस्ता धरावा. शंभर मैलाच्या बाहेर नाहीं जाणार सगळं मोजलं तरी."

"जरा धीरे धीरे !"

"आपण म्हणाल तसं आणि भाडं पण तुम्ही ठरवाल तें देऊं."

"ठीक आहे. ठीक आहे ! माझ्याकडून कसूर होणार नाहीं. खात्री बाळगा."

स्थानिक उत्सवी वातावरणाचें उधाण अद्याप ओसरलें नव्हतें. आम्हांला त्याचें झालें तें केवळ ओझरतें दर्शन. तरीहि हें शेपूट संपूर्ण उत्सवाची झलक दाखविण्यास पुरेसं होतें. आजच्या शेवटच्या दिवशींसुद्धां म्हातारे तरणे बनून नि म्हाताऱ्या तरुणी बनून नाचत होत्या. भजनी दिंडींतील एका सुरकुतलेल्या आजीनें माझ्या पांढरे केस डोकावणाऱ्या हनुवटीला हात लावून 'क्यूं बेटा' म्हणत माझ्या हातावर प्रसाद ठेवला तेव्हां तर तिच्या उत्साहाचा मला हेवा वाटूं लागला. आजीचा चेहरा सुरकुतलेला असला तरी रेखीव होता. तिच्या काळ्याभोर डोळ्यांमुळें माझ्या तो चांगला लक्षांत राहिला आहे.

या धालपूर मैदानाजवळच्या वस्तीस म्हणतात सुलतानपूर. मूळगांव इथून दीड मैलावर आहे. त्याचं नांव आखाडा बाजार. म्हणजे हें मैदान धालपूर, सुलतानपूर आणि आखाडा बाजार मिळून झालें आहे कुलू गांव. अलिकडेच कुलू हा पंजाबांतला निराळा जिल्हा बनविला आहे.

संध्याकाळीं आखाडा बाजाराकडे एक फेरी टाकून यायचें ठरविलें. तिथल्या स्टेट बँकेचा व्यवस्थापक सोबती भेटला. या 'रानांत' येऊन पडला होता. मुलें सिमल्यास शिकत होतीं. इथें जिल्ह्याचें ठिकाण असून त्यांच्या शिक्षणाची सोय नव्हती. त्याच पगारावर परंतु खालच्या हुद्द्यावर सुद्धां मोठ्या शहरीं जायला तो तयार आहे.

आखाडा बाजार बरी बाजारपेठ आहे. पूर्वापार व्यापाराचें ठिकाण आहे. गांव स्वच्छ वाटलें. परंतु त्याचें कारण मात्र 'बियास दर्या'. पूर्वापार नदीकाठींच गावें वसत आलीं आहेत. वाहत्या नदीची पाण्याची सोय दुहेरी असते. पिण्याच्या आणि वापरण्याच्या पाण्याचा सुकाळ तर खराच. परंतु बिचारी जी कोण 'मैय्या' असेल ती आपल्या लेकरांचीं उत्सर्जितें, नि उच्छिष्टें अव्याहत साफ करीत असते.

ऐन उत्सवांत आम्ही नसलों तरी गप्पा मारतां मारतां उत्सवाच्या हकिगती समजतच होत्या. अशीं कांहीं चतुर माणसें असतात (असें म्हणतात) कीं त्यांना नुसत्या निरीक्षणानें सारें कांहीं समजतें. माझ्यासारख्या सामान्य माणसाला मात्र गप्पा उकरून काढून समोरच्या माणसाला सोसतील तसतशा त्या हाणीत राहून माहिती मिळविण्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाहीं.

बँक व्यवस्थापक आम्हांला स्वतः सांगत होताच. शिवाय बाजारांतील ओळखीच्या व्यापाऱ्यांकडे त्याच्याबरोबर आम्ही टेकत होतों. आम्ही मुंबईचे म्हटल्यावर ती मंडळी आम्हांला मुंबईच्या उलाढालींबद्दल विचारीत होती व आपल्या गांवची हकीगत सांगत होती. आम्हीहि त्यांना थापा वाटणार नाहीं अशा बेतानें मुंबईच्या व्यापारी उलाढालींच्या प्रचंडपणाची कल्पना देत होतो.

भारताच्या या कोपऱ्यांत सुद्धां यात्रा-उत्सवाचें स्वरूप भारताच्या इतर भागांशी पूर्णपणें मिळतें जुळतेंच आहे. उत्सवाच्या मुख्य दिवशीं छबिना-पालखी निघते. मग एक चमत्कार होतो. पालखी जोरानें डचमळूं लागते. देव रागावल्याचें हें चिन्ह समजलें जातें. मुखोपाध्याय प्रार्थना करून देवाला शांत करतो. पालखीचा हिंदोळा स्थिर होतो. मुखोपाध्याय मग स्वतः घुमूं लागतो. थैमान सुरूं होतें. सामूहिक पापांचा तो उच्चार करतो. मग लोक उःशाप मागतात. त्याचें परिमार्जन कसें करावें तें देव सांगतो. कोकणांतल्या मंडळीप्रमाणें त्या नंतर 'देवा म्हाराजा'

म्हणून वैयक्तिक गाऱ्हाणीं घातलीं जातात. त्यावरचे उतारे सांगितले जातात. आणि मग कार्यक्रम संपतो. आपल्या गांवाकडे याच्यापेक्षां निराळें काय असतें ?

आम्हांला यायला उशीर झाला आहे हें पुन्हां पुन्हां प्रत्येकजण सांगून आमचा मूर्खपणा आमच्या पदरीं बांधतो. तरी सुद्धां आम्हांला जरासुद्धां पश्चात्ताप होत नाहीं. जें पाहातों आहोंत 'तेंहि नसे थोडकें' असेंच वाटत असतें. कारण प्रत्येक ऋतूचें आपापलें वैशिष्ट्य असतेंच ना ?

वसंताशिवाय फुलांचा बहर दिसणार नाहीं. ऑगस्ट-सप्टेंबरशिवाय फळांचा हंगाम साधणार नाहीं. आणि डिसेंबर-जानेवारींत आल्याशिवाय तुम्ही बर्फानें वेढले जाणार नाहींत.

ऐन मार्च-एप्रिलमध्यें आपल्याकडे जसे पळस गांवच्या शिवारांत आणि डोंगरा-डोंगरावर खदिरांगारासारख्या फुलांनीं लकाकत असतात तसे या कुलू-कांगडांत सदापर्णी वृक्ष खदिरांगारासारख्या रंगाचा झळाळणारा फुलोरा धारण करून भट-क्याचें लक्ष वेधून घेत असतात. कर्णाटोपासारखी परंतु विविध रंगाची ऱ्होडो-डोन्ड्रेनचीं फुलें सबंध खोऱ्यांत आणि विशेषतः रोहटांग घाटीवरील वनस्पति दुर्मिळ उंचीवरील भागांत बहरून आलेलीं असतात. परंतु या ऋतूंत यायला सवड नसते आपणांला.

ऑगस्ट-सप्टेंबर, हा शरदाचा पूर्वार्ध. इकडे यायला आदर्शवत्. पण यायचं ठरतां ठरतां हा फळांचा ऐन हंगामहि आम्ही हुकविला. आणि आलों आहोंत या फळांच्या सरत्या हंगामांत. हिमवर्षावाला पहाडांत सुरुवात झाली असली तरी खाली सोसवेल इतपतच थंडी आहे. सरती फळें आणि किंचित् हिमदर्शन हेंहि कमी देखणें नाहीं. पाहाण्याचा बर्फ फक्त या नगाधिराजाच्या साम्राज्यांतच आहे. बाकीच्या भारतांत आहे तो बर्फ खाण्याचा.

मंडी ते भुंतर या दरम्यान काल आमच्याबरोबर एक चंदीगडकडील लहा-नसा दुकानदार होता. बरा माणूस वाटला. त्यानें आग्रहपूर्वक पुन्हां पुन्हां सांगि-तलें होतें कीं आम्ही मणिकरणला जरूर जावें. तो मणिकरणलाच निघाला होता. हें मणिकरण भुंतरपासून सुरू होणाऱ्या पार्वती खोऱ्यांत आहे. अर्धा अधिक रस्ता बस जाते. पुढें पायीं जावें लागतें. परंतु ठिकाण पाहिलेंच पाहिजे असें आहे. टूरिस्ट ऑफिसरनेंसुद्धां आज तिकडे जाण्याची शिफारस केली. म्हणून त्यांच्या-कडून तिथल्या टूरिस्ट हटमध्यें राहाण्याकरतां पास घेऊन ठेवला आहे. याचा

उपयोग आम्ही करणार नाहीं असें त्याचें भविष्यकथन आहे. परत आल्यावर आम्ही त्यास जरूर भेटावें असेंहि त्यानें आग्रहपूर्वक सांगितलें आहे. म्हणजे हें मणिकरण आहे तरी काय! उद्यां जायचें तर ठरविलें आहे. गोड्या पाण्याचे गरम झरे तिथें आहेत म्हणतात.

मणिकरणला विशेष काय आहे हें न सांगतां सर्वांनीं त्याबाबत कुतूहल मात्र निर्माण करून ठेवलें आहे. "चल तुला जम्मत दाखवितों" म्हणून कुणीं म्हटलें म्हणजे लहान मूल ती 'जम्मत' पाहायला ज्या हुरहुरीनें जातें त्याच गोड अनिश्चिततेंत आम्हीं उद्यां मणिकरणला जाणार आहोत. याला दोन दिवस लागणार आहेत. तिकडून आल्यावर 'भाऊमटा'ची जीप मिळाल्यास पाहायची.

♣ ♣

कुलू ( टूरिस्ट कॅम्प II )

ऑक्टोबर २६, १९६४

आम्ही मुंबईस परतल्यावर मुंबईच्या थंडीचा (?) मोसम सुरू होणार आहे. मुंबईची थंडी हा एक मोठा विनोदाचा विषय आहे. तरीसुद्धां थंडीचें कौतुक करावें मुंबईकरांनींच. देशावर किंवा उत्तरेकडे कौतुक होतेंच. पण तिथें थंडी पडते तरी. मुंबईला तिचा अभाव असला तरी कौतुक मात्र कांकणभर सरस. लद्दाख मधील विमानचालक जसे कपडे घालील तितपत तरी 'स्मार्ट' कपडे मुंबईच्या स्कूटरवाल्याला हवेतच. लग्नासाठीं अगर हौशीसाटीं शिवलेला गरम कापडाचा सूट किंवा शेरवानी बाहेर काढायची तरी केव्हां नाहीं तर ?

कौतुक, आपलं तसेंच दुसऱ्याचेंहि, करणें हा मुंबईकराचा स्वभाव आहे. स्थायीभाव आहे. राष्ट्रीय उत्सव, थोर पुरुषांच्या जयंत्या-मयंत्या, गणपती उत्सव हे काय सगळेच करतात. सामान्य माणसांचे थोर सत्कार करण्यांत मुंबईचा हात अखिल भारतांत (कसें व्यासपीठावरून बोलल्यासारखें वाटतें, नाहीं ? ) कुणी धरूं शकणार नाहीं. असतात एकेका गांवाचीं वैशिष्ट्यें ! संस्था हें पुण्याचें वैशिष्ट्य नाहीं का ? तसें षष्ट्यब्दिपूर्ती मुंबईला सार्वजनिकरीत्या कोणाचीहि होऊं शकते. आणि याला साठ वर्षें पूर्ण व्हावीं लागतात असेंहि नाहीं. अलिकडे पलीकडे दोनचार वर्षांत धनयोगाचा मोका बघावा नि उरकून टाकावी. एकशें पासून एक हजार संस्थांच्यातर्फे (हारांची सोय केली म्हणजे) हें होऊं शकतें.

याशिवाय जे. पी. ( ही फक्त मुंबईचीच मक्तेदारी ), एखाद्या सोसायटीपासून पार्लमेन्टच्या निवडणुका असे किती तरी मोके सतत येत असतात. सामान्यांचे थोर सत्कार करण्याचे. निदान बारशीं नि वाढदिवस तर कुठें गेले नाहींत ?

मुंबईकरांच्या कौतुक्या स्वभावामुळें मला तर वाटूं लागलें आहे कीं तक्रारी, मोर्चे, मिरवणुकी हे प्रकारसुद्धां याच स्वभावविशेषाचा एक भाग आहे.

हं ! तर मुद्दा असा कीं मुंबईस परतल्यावर थंडीचा मोसम येणार आहे. तेव्हां मला जर कुणी विचारलं, "कशाला गेला होतास त्या कुलूच्या गारठ्यांत कुडकुडायला ?" तर त्याला मी शायराच्या भाषेंत सांगेन, "हाय कंबख्त, तूने पीहि नहीं."

परंतु याशिवाय कुणी खरा शौकिन निघेलच कीं! आणि असा निघाला आणि त्यानें जर मला विचारलें, "का हो ! आम्ही कुठें जावें, म्हणजे आम्हांला कांहींतरी पाहिल्यासारखं वाटेल ?" तर आज तरी मी त्याला मणिकरणची शिफारस करीन. काल आणि आज जें दर्शन मला घडलें आहे त्यानें मी आणि आण्णासुद्धां मारावून गेलों आहोंत.

"काव्येषु नाटकं रम्यं, तत्र रम्यं शकुंतला। तत्रापिच चतुर्थोऽङ्कः तत्रच श्लोक चतुष्टयं ॥" अशी जी 'त्यांतल्या त्यांत' माहात्म्य सांगण्याची पद्धत आहे ना, त्याच चालीवर मी सांगेन—

"जा तर मग हिमालयांत ! नगाधिराजाच्या पश्चिमोत्तर भागांत !

त्यांतल्या पार्वती खोऱ्यांत ! त्यांतल्या त्यांत मणिकरणला !"

कालच्या आणि आजच्या प्रवासानें, शरीर कसें अगदीं आंबून गेलें आहे ! परंतु मन तितकेंच प्रसन्न आहे. मणिकरणाच्या दर्शनानें तें भारून गेलें आहे. माणिकरणला नुसतें सृष्टिवैभवच नाहीं. सेवाभावाचेंहि एक आगळें दर्शन तिथें घडतें. तिथल्यापेक्षां अधिक मातब्बर सृष्टिवैभव बहुधा मनाली-नग्गरला मिळेल. परंतु हा साक्षात्कार तिथें नाहीं. बाबा नारायण हरी मणीकरण या शीख सज्जन गृहस्थाच्या अखंड सेवेला या कुलूखोऱ्यांत तरी तोड नाहीं. या शीख गृहस्थाला दोन मुली आहेत. यात्रींची सेवा हेंच बाबाचें परमार्थ साधन आहे. बाबाची आध्यात्मिक साधना-सिद्धि किती आहे याचा मला अंदाज नाहीं. परंतु त्यानें चालविलेलें काम एकानें दुसऱ्याला सांगावें असें आहे.

ठरल्याप्रमाणें काल रोजीं सुप्रभातींच धालपूर मैदानांत बसच्या तळावर हजर झालों. मनालीकडून मंडीकडे जाणाऱ्या दोन गाड्या आल्या. परंतु एकहि 'सीट' त्यांत चढूं शकली नाहीं. या रस्त्यावर आम्हांला फक्त सहा मैल भुंतरपर्यंत जायचें होतें. भुंतरपासून पार्वती खोऱ्यांत अकरा मैलांवरील जारी गांवापर्यंत जीप

सर्व्हिस होती. आणि पुढें आठ मैल मणिकरणपर्यंत आपलीच पैदल सर्व्हिस असावी लागते.

अखेर सकाळच्या वेळांतील शेवटची गाडी आली. आणि आम्हीं गाडींत तर चढलों. आलेली बस जादा पॅसेंजरसह आधींच ठेचून भरलेली होती. त्यांत आम्ही एकूण अकरा जण चढलों. आंत एकमेकांच्या रेट्यामुळें आम्ही उभे होतों. बसचा हिसका बसल्यानंतर आम्हांला धडपडायला-सुद्धां जागा नव्हती. त्या सहा मैलांना पुरा अर्धा तास लागला. कारण वाटेंत 'लोडिंग' अनलोडिंग चालूच होतें. आतां रिकामी झालेली जागा मिळणार अशी वेळ आली तेव्हां आमचें उतरायचें ठिकाण भुंतर आलें होतें!

इतरांच्याबरोबर आम्ही उतरलों. आणि बघतां तों आपली मंडळी धावत सुटली! कशाकरतां तें मला समजेना. दोन पंजाबी तरुण पुढें धावत गेले. परंतु त्यांच्या मातुश्री धीरे धीरे चालत होत्या. त्यांच्या सांगण्यावरून समजलें कीं ही धावपळ पुढील जीपगाडीच्या तिकिटांकरतां होती. मीहि आण्णांना सांगून अर्थात् धावलों.

एका उघड्या पडवीत एकदां, पूर्वीं केव्हांतरी 'फर्निचर' म्हणून गणल्या गेलेल्या मोडक्या मेजापाशीं मॅनिजरसाब बसले होते. त्यांनीं सांगितलें, गाडी अद्याप जारीहून यायची आहे. ती आल्यावर तिकिटें मिळतील. यथासांग विधी पार पडल्यावर तिकिटें ज्यांना जेवढीं पाहिजे होतीं तेव्हढीं मिळालीं. तीं घेऊन आम्ही दोघे गाडीकडे गेलो. मग मला त्या धवपळीचा खरा अर्थ समजला. तिकिटें काढणारे आम्ही आठच जण होतो. गाडी जवळ आल्यावर बघतां तों गाडी आधींच ठेचून भरलेली होती. बसायला जागा कुठें नव्हतीच, परंतु धरून उभे राहायलाहि जागा नव्हती.

ही बस म्हणजे जीपला जोडलेला एक उघडा हौदा होता. दोन्ही बाजूंना बसण्याकरतां फळ्या मारलेल्या होत्या. एकूण अकरा माणसांना बसण्याची परवानगी असलेल्या त्या गाडींत आम्हीं एकूण तेवीस तिकीटवाले होतों. आम्हांला अर्थात् बसलेल्या महाभागांच्या पदस्पर्शानें पुनीत होत असलेला तळमजला टेकायला मिळाला होता. हा हौदा एकदां जागचा हालला आणि पोत्यांतल्या भांड्यांप्रमाणें दोन हिसके खाऊन आम्ही फिट्ट बसलो. बस चालू झाल्यावर एक फर्लांगभर अंतर गेली कीं नाहीं, तोंच ती थांबली. सर्वांना पाय उतारा व्हायचा

आतां खरें हिमालयीन ( यालाच अल्पाईन म्हणतात का ? ) वातावरण आलें आहे. पिनपार्वती घाटाकडील वीस-वीस हजार फुटी पहाड आणि त्यांच्यावरचे चंदेरी मुकुट आपल्याला बोलावीत असतात. फोडणीच्या पोह्यांवरील ते शुभ्र किसलेलें मोहाचें खोबरें आमच्या अर्धपोटीं भुकेला कांहीं उपयोगी नाहीं. परंतु भूक विसरायला जरूर लावीत आहे.

आतां ही जी गर्द राई आली आहे ती देवदाराची आहे. एका पुराण-वृक्षावर तो एकशें ऱ्याऐशीं वर्षांचा असल्याची पाटी लटकत आहे. शांतता इतकी नीरव आहे कीं आपापसांत बोलण्यासहि आम्हांला संकोच वाटत आहे. उतारा-वरील नाजूक हिरवळीवर सूर्य किरणांनीं फक्त आकर्षक खडी नि कुयऱ्या काढल्या आहेत. चंद्रकळेवर असतात तशा. सबंध आकाश या देवदारांनीं पेलून धरलें आहे. ते नसते तर तें आपल्या अंगावर नक्की कोसळून पडेल असें वाटत आहे.

आतां पर्यंतच्या खोऱ्याची इथें दरी झाली आहे. डोंगरांतून येणारे ओहोळ इथें पार्वतीला भेटतात. हा पाणवठा मोठा सोईस्कर ठिकाणीं आहे. निम्म्या रस्त्यावर लालाजींच्या कुटुंबांतील तरुणांनीं पुढें येऊन तीन धोंडे मांडून चक्क चूल पेटविली आहे. आतां ही मंडळी इथें काय स्वयंपाक करणार किंवा काय ? नाहीं वेताच्या टोपलीतून त्यांनीं घरून तयार करून आणलेली रोटी, तर्कारी वगैरे काढली आहे. ती फक्त गरम करून मधली वेळ साजरी करायचा त्यांचा विचार दिसतो. कल्पना छान आहे. खऱ्या खवय्यांना हें सर्व सुचतें.

" चष्म्याचें थंडगार पाणी पिऊन आम्ही न बसतां पुढें चालूं लागतों. "

" पंडतजी ! अरे ओ पंडतजी ! " लालाजींच्या हाका ऐकूं येतात. आम्हांलाच हाका मारीत आहेत अशी खात्री झाल्यामुळें आम्ही थांबतों. " ठहरिये भाई " करीत लालाजी धोतर सांवरीत आमच्याजवळ पोंचतात.

" कहिये, लालाजी, क्या बात है ? "

" अरे ! मुझे बूढेको क्या भूखा रखोगें ? "

" अखिर बात क्या है ? अपका खाना तो गर्म हो रहा है. भूखे क्यू रहोगे ? "

" हाँ ! मगर महमान तो जा रहे है. बगैर उनके मैं खाना नहीं खाऊंगा. " आतां लालाजींच्या म्हणण्याचा मतलब माझ्या पुरा लक्षांत आलेला असतो.

"अरे! लालाजी! आप बडे आतिथ्यशील है. धन्यवाद आपको. मगर जारीमें हमने भरपेट खाया है. म्वाफ कीजिये! आप बडे शौकसे खा लीजिये!"

"अब आपके सामने क्या सत्याग्रह करना पडेगा? पक्की रसोई है! पंडतजी! फिक्र न कीजिये!"

हें वाक्य पुरें होतें न होतें तोंच लालाजी आण्णांचे हात धरून त्यांना ओढूं लागतो.

"अरे अरे! लालाजी!" —आण्णांचा दुबळा प्रतिकार.

"चलिये चलिये! उदर पहुंचनेमें देर न होनी चाहिये."

आमचा कांहींच इलाज नसतो. लालाजीला 'अन्नदाता सुखी भव' अशी मनापासून शुभेच्छा मिळते. अंदर की बात अशी असते कीं भुकेल्याला अन्नाचें महत्त्व पुन्हां एकदां पटलें होतें. त्याच्या अभावीं आम्हीं मणिकरणाला केव्हां आणि काय अवस्थेंत पोहोचलों असतों त्याची आम्हांला चांगली कल्पना आहे. फुल्के, आचार नि तर्कारीची लहेज्जत अद्याप ताजी आहे आमच्या तोंडांत.


तासाभराची तर लालाजींची आणि आमची ओळख. आतां मात्र त्यांची आठवण कायम राहाणार आहे.

आतां इथून कसौल एक मैल. त्याच्यापुढें मणिकरण दोन मैल. खाण्यामुळें हुशारी नक्कीच आली आहे. तरीसुद्धां चढ जाणवूं लागला आहे. चढ थेटपर्यंत थोडा फार आहेच हें माहीत आहे. पायांची तक्रार फार जोरानें सुरू झाली आहे. आण्णा फारच थकले आहेत. त्यांची ही कसोटीच लागत आहे. आतां वरचेवर टेकावें लागत आहे. उंचीमुळें नव्हे थकल्यामुळें.

पावणेपांच वाजले आहेत. पार्वती मैय्या एका पाय-पुलावरून पार करायची आहे. तिथें एक मजूर भेटतो. त्याला विचारतांच तो सांगतो, "हें काय मणिकरण!" एका हाकेवर पुसटशी खुज्या घरांची वस्ती दिसते. आमचा मोठा विरस होतो. हेंच बघायला आपण एवढी पायपिटी करून आलों? परंतु एवढ्याजणांची शिफारस चुकीची कशी ठरेल? कांहीं तरी असेलच! तिथें गेल्यावर तें दिसेल! मनाची कांहीं तरी समजूत घालीत आम्ही पुढें सरकतों. आतां सर्व यात्री आमच्या पुढें गेले आहेत. आम्हीच शेवटले.

खडकांतून खोदलेली पायवाट आठदहा मिनिटं एक एक पाऊल कष्टानं टाकीत तुडवितों. आणि एक वळण मारल्यावर अकस्मात् गांव पुढं उभं ठाकतें.

पहिली वास्तू हीच बाबाची मठी हें कुणी सांगायला लागत नाहीं. खालच्या बाजूला वाफा येत असलेली गरम पाण्याची प्रशस्त कुंडं दिसतात. सहा पायऱ्या उतरून आम्ही कुंडांच्या ओसरीवर येतों. लालाजी वगैरे मंडळींच्या हातांत चहाचे बम्पर्स आहेत. इतर प्रवाशांचा तोच कार्यक्रम चालू आहे. लालाजींच्या



*एका हाकेवर पायरस्त्याच्या टोकाला खुज्या घरांची वस्ती दिसते.*
*हेंच तें मणीकरण. दिसायला सुंदर नाहीं पण असायला....*

सांगण्यावरून त्यांच्या सामानाशेजारीं आम्हीं आमच्या सामानाच्या पिशव्या ठेवतों नि हात पाय धुवायला जातों. गरम गरम पाण्यानं हात पाय धुतल्यावर खूपच हुशारी वाटते. आम्ही परततों.

"दो मूर्तियाँ अभी आयी थी न? काहाँ गये?" उतार वयाची पण ताठ अंगकाठीची एक मूर्ती दोन हातांत दोन चहाचे बम्पर्स घेऊन आम्हांला पाठमोरी आहे, आणि लालाजींना विचारीत आहे.


" नमस्कार बाबाजी ! " न सांगता हेच ते बाबाजी म्हणून आम्ही ओळखतों.

" नमस्कार नमस्कार ! चाय लीजिये. " आम्हांला नमस्कार करण्यासाठीं बम्पर्स एकदां वर करून बाबाजी ते आमच्या हातीं देतात. निदान दोन दोन कप तरी चहा त्यांत असतो. इकडे सिंगल कप, डबल कप वगैरे भाषा कुणाला माहीतच नसावी.

" बाबाजी, हम ठहर सकेत यहाँ ? "

" हाँ हाँ बेटे ! शौकसे ! आपीकी सेवाके लिये है यह सब. " सभोवतीं हात ओवाळीत बाबा आम्हांस निर्धास्त करतो.

चहांत गवती चहा पण होता का काय कुणास ठाऊक ? पण चहा प्यायल्यावर आणखी तरतरी येते. गांवाबाहेरच्या पुलावर थंडी वाजत होती. आतां या मठांत ती पळाली आहे. उंची तीच आहे. सहा हजार फूट. परंतु इथें आम्ही मुंबईच्यासारखे सहज, न कुडकुडतां कपडे काढतों. आणि कुंडांवर स्नानास जातों.



*दोन्ही कुंडांच्या मधोमध बांधलेला पूल. रेडियमयुक्त गरम पाण्याचे मणीकरण तीर्थ. पलीकडे पार्वतीमैय्या. गार ठणक पाण्याची.*

दोन्ही कुंडांच्या मधोमध इकडून तिकडे जाण्यासाठीं पूल बांधला आहे. त्यावरून आम्ही पलीकडे जातो. लालाजी ओरडून सांगत असतो कीं फार वेळ डुंबूं नका, चक्कर येईल. परंतु थकलेल्या शरीराला त्या बेताच्या गरम पाण्याच्या शेकाचा मोह सोडवत नाहीं. कांहीं तरुण या दुसऱ्या कुंडांतल्या उष्णतेला शरीर सरावलें म्हणजे पुलाखालच्या कमानींतून अधिक गरम पाण्याच्या कुडांत शिरत आहेत. त्या पहिल्या कुंडाच्या वर चौथऱ्यावर एक शंकराची पिंडी असलेली घुमटी आहे. त्याच्या बाजूला अंगणांत उथळ आणि लहान टाकीवजा कुंड आहे. यांत या आवारांतला उकळत्या पाण्याचा मूळ झरा आहे. तळच्या रेतींत उकळतें पाणी खदखदत आहे. पाणी स्वच्छ आणि मधुर आहे. तें रेडियमयुक्त आहे म्हणतात. लहानशा पन्हळीनें तें खालच्या कुंडांत व तेथून दुसऱ्या कुंडांत जात आहे. वर गरम पाण्याचे तीन प्रकार आणि कुसवापलीकड दहा फुटांवरून गारठणक पाण्याची पार्वतीची फेसाळत वाहाणारी धार ! हा चमत्कार नसला तरी या गुण-वैधर्म्याचें कौतुक वाटत आहे. कांहीं झरे नदीच्या पात्रांतसुद्धां आहेत.

स्नानानंतर शारीरिक थकवा नाहींसा होतो. तरी पण चक्करल्यासारखें होतेंच आहे. पार्वती मैय्याच्या गार पाण्यावरून मधूनच एकादी थंडगार झुळूक अंगावर येत आहे. तर आतां आम्ही बसलों आहोंत-खरं म्हणजे आडवारलों आहोंत-ही चुनेगची जमीन सुखद गरम आहे. चांगलें अंग शेकून निघत आहे. सबंध ओसरी-भर हा सामुहिक अंग शेकवण्याचा प्रयोग चालू आहे. या दरींत दुपारच्या नंतर ऊन आम्हांला दिसत नाहीं. तरी पण आतां ही दिवस मावळायची वेळ झाली असावी. अंग शेकत शेकत आम्हांला झोपसुद्धां लागायला येते. इतक्यांत लाला-जींची चाहूल लागते.

" कुछ सेवा करोगे, पंडतजी ? "—लालाजी.

" कैसी सेवा ? "

" यही ! आलूके मटरके छिलके निकालना. आप बडे सेवाभावी हैं. "—आतां सेवाभावी हा नसता गुण माझ्या अंगीं लालाजींनीं चिकटविल्यावर मला काय नाहीं म्हणता येतंय ! तसे लालाजी मोठे धूर्त आहेत. मी उठतो आणि झक्कत बटाटे सोलायला बसतो. मंडीहून भुंतरपर्यंत आमच्याबरोबर असलला चंदीगडचा

लालाजी आमच्याबरोबर सेवेला आहे. मधून मधून चार दिवस सेवा करायला तो इथें येतो.

काम करणाराला दिवसाचे चोवीस तास इथें पुरणार नाहींत. परंतु सक्ती कुणावरच नाहीं. न करणाराला तूं अमुक कर म्हणून कुणी म्हणणार नाहीं. त्यानें खुशाल यावें, दोन वेळां आपल्यासारख्याच इतर चाळीस–पन्नास (क्वचित् शें-पाऊणशें) सहप्रवाशांबरोबर पुरुवा झोडावा, दोन वेळां बम्पर बम्पर चहा प्यावा, लहर येईल तेव्हां गरम पाण्याच्या कुंडांत डुंबावें, बाबांनीं दिलेलें कांबळें पांघरून रात्रीं डाराडूर झोप काढावी, सकाळीं उठून पुन्हां चहा घ्यावा, बाबांना वाटल्यास नमस्कार ठोकावा नि चालूं लागावें. देण्याघेण्याचा प्रश्नच नाहीं. कोणी कांहीं विचारणार नाहीं. सर्वांनाच बाबा हंसत हंसत निरोप देतात. असें हें मुक्तद्वार आहे.

बाबांच्या वास्तूंत शिरतांना डाव्या हाताला रस्त्याला लागूनच एक हॉल सह-कुटुंब यात्रींसाठीं जरा बंदोबस्तानें बांधलेला. त्याच्याखालीं एकाखालीं एक अशा अंगणाकडे उतरत्या दोन खोल्या. हें सर्व जवळ जवळ दगडांत खोदलेल्या गुहांच्या स्वरूपाचें आहे. कांबळी मिळालेली सडी मंडळी कुंडांच्या ओसऱ्यांवरून झोपतात.

बाबांच्या मुक्तद्वारांत भोजन साधें पण रुचकर आहे. भात, चपाती, डाळ, उसळ नि चटणी. यात्री भोजनावर आडवा हात मारतात. एक एक पंजाबी सात-आठ चपात्या खात आहे तर आम्हांला दुसरीहि घशाखालीं घालवत नाहीं. जेवतांना चवीला या पार्वती खोऱ्यांतील दंतकथा चालू असतात. त्यांत कांहीं बाबांच्याहि आहेत. एकूण पन्नास तरी पान जेवून उठलें आहे.

आम्ही ज्या खोलींत झोपलों आहोंत तिथें अंथरुणा-पांघरुणाची जरुरी नाहीं. जमिनीवर फक्त एक तरट अंथरलेलें आहे. जवळची शाल आम्हीं उशाला घेतली आहे. लालाजी माझ्या बाजूलाच पडले आहेत. कोपऱ्यांत एक पणतीसारखा दिवा आहे. बाहेर बिजलीचे झगझगीत दिवे आहेत. आमच्या खालची जमीन सुखद उन्ह उन्ह आहे. या रेडियमयुक्त पाण्याच्या स्नानानें व जमिनीच्या शेकानें कैक आधी-व्याधी नाहींशा होतात म्हणतात.

कांबळ्याचें वाटप व इतर कामांचा उरक पार पाडून बाबा आमच्यांत गप्पा मारायला येतात. आल्यापासून बसलेले असे मी त्यांना प्रथमच पाहात होतों. बाबांची बोली हिंदी-पंजाबीचें मिश्रण आहे. वाणी मिठास आहे.

" बाबाजी ! खरोखरीच या उकळत्या पाण्यावर स्वयंपाक करतां येतो का हो ? " मला त्याबद्दल मोठी उत्सुकता आहे जाणण्याची. गंधकाच्या वासाचे गरम झरे माझ्या पाहण्यांत आहेत. परंतु मधुर पाण्याचा असा हा पहिलाच.

" हाँ हाँ, बेटा ! चपात्यांशिवाय सगळाच स्वयंपाक करतों ना आम्ही त्याच पाण्यावर ! " – बाबा.

" आणि चपात्यांची व्यवस्था काय करतां ? "

" माझी बेटी तव्यावर भाजते रोट्या. इतर मंडळी असली कीं तीहि मदत करतात. "

" पण रोट्यासुद्धां या पाण्यांत होतात म्हणतात ! "

" होतात, होतात ! पण त्यांची चव सगळ्यांना आवडणार नाहीं बेटा ! म्हणून तव्यावर भाजतों. "

" त्या पाण्यांत भाजायच्या म्हणजे काय करायचें ? "

" पुरीसारखी रोटी लाटायची आणि तळणी मधल्या तुपांत पुरी सोडतात ना ? तशी पाण्यांत सोडून द्यायची ! "

" पाण्यांत बुडत नाहीं ? "

" बुडते ना ! पण पुन्हां फुलून वर येते. अरे ग्यान् ! "

बाबा काय सांगणार हें त्यांच्या मदतनिसानें ओळखून तो एक वाडगा बाबांच्या पुढें धरतो.

" ह्याच त्या ओल्या रोट्या काय ? "

" चव तर बघा." असें म्हणत बाबानें आमच्या सर्वांच्या हातावर एक एक तुकडा ठेवला. नागपंचमीला उकडलेलीं दिंडें आमच्याकडे करतात ना ? तशा लागत आहेत या.

" जास्त वेळ लागतो का हो ? "

" कशाचा आलाय वेळ ? टोकरीभर बटाटे किती वेळांत शिजले तें बघितलंत ना ? भात तर यूं हो जाता है. " इथें बाबाजींनी एक चुटकी वाजविली.

" पाण्याचें तपमान उत्कलन बिंदूपेक्षां जास्त असलं पाहिजे."

" बहोऽत ज्यादा ! भगवानकी माया आहे ही बेटा. इथं काय कमी पडणार आहे ? खीरगंगेला तर इससे भी ज्यादा."

" खीरगंगा ? "

"हाँ? खीरगंगा है यहांसे पूरे एक दिनकी यात्रापर. परंतु तिथें भगवंताची माया अजायब आहे. तिथें एक साधू आहे. पण तो माझ्यासारखा दुनियादारींत नाहीं पडला. आज कैक वर्षे त्याची साधना चालू आहे. अशा साधकाला उदरंभरणासाठीं भगवंतानं कुदरती साधनं ठेवलीं आहेत. तिथल्या रानांत आपोआप उगवणारं देवभात भेटतं. जंगलगोभी मिळते. कंद मिळतात. खारट, आंबट वगैरे चवीचीं झाडपानं मिळतात. बकरीचं, क्वचित् गाईचं दूध मिळतं. साधकाला आणखी दुसऱ्या कशाची अपेक्षा असणार?"

"आणि उकळत्या पाण्याचे झरे?"

"अरे ते तर इथल्यासारखेच आहेत. बडा पोहोचलेला बाबा आहे तो!"

"पण बाबा! तुम्ही इथें जो अखंड यज्ञ चालवलाय हा, हें फार मोठं पुण्यकृत्य आहे. त्या बाबापेक्षा मोठं पुण्य या बाबांच्या खातीं जमा होत असलं पाहिजे."

"अरे अरे! असं नये बोलूं. तो बाबा मोठा सिद्ध पुरुष आहे."

"असेल असेल! त्यांची साधना-सिद्धी मोठी असेल. परंतु ती आम्हांला समजत नाहीं. तुमची ही लोकाभिमुख साधना इथें येणाऱ्या प्रत्येकाला मदतरूप होते. म्हणून ती जाणवते."

"आपण काय समजायचं असेल तें समजा. पण माझं काम, आहे यापेक्षां मोठं व्हायला हवं एवढीच चिंता मी करतों. तें जाऊं द्या! परंतु तुम्ही खीरगंगेला जरूर जाऊन या."

खीरगंगेला जाऊन येण्याबद्दल आतां आम्हांलाहि चुटपूट लागून राहिली आहे. पण जाऊन यायला तीन दिवस तरी हवेत. ते आमच्यापाशीं नाहींत. त्या तयारीनं आम्ही आलों नसल्यामुळें कपडे, पांघरुणें वगैरे घेतलेली नाहींत. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे पुढें एव्हढें चालत जाण्याची आमची उमेद नाहीं.

पुन्हा केव्हां तरी इथें येऊं तेव्हां जरूर जाऊं म्हणून बाबाला कोरडें आश्वासन आम्ही देतों व आतां माफ करण्याविषयी विनवितों. आमची कमजोरी ओळखून बाबाही सांगतो, "बरं बरं! पुन्हा याल ना, तेव्हां घोडं घेऊन या, म्हणजे नक्की जाणं होईल."

खीरगंगेला आज जी अवस्था यात्रीची होत असेल तीच दहा बारा वर्षांपूर्वी इथें होती. बाबाचें हें मुक्तद्वार केवळ जनाधारावर चालतें. कांहीं मदत

आपोआप मिळते. ती (धान्य वगैरे) जारीला येते. तिथून इथें आणण्याची व्यवस्था मग बाबा करतो; कांहीं वेळां पुरवठा आघाडीवर आणिबाणीची परिस्थिती उद्भवते. बाबाची धावाधाव होते. पण बाबा बाणी संभाळतो. या वयांत सुद्धां बाबाचा खांदा तसा मजबूत आहे. त्यानें सगळें पेललें आहे. जनताभिमुख बाबा माणसामाणसांत भेदभाव मानीत नाहीं.

या मणिकरण नांवाबद्दल एक पौराणिक आख्यायिका आहे. उमा-महेश हें 'भटकें युगुल' या खोऱ्यांतून फिरत असतांना उमेच्या अलंकारांतील एक मणी इथें पडतो. पाताळांतील शेषनागाला चावटपणाची लहर येते. पडल्या बरोबर तो तो मणी पळवून पाताळांत नेतो. पार्वती ही जगन्माता असली तरी ती तुमची आमची. शंकराची ती पत्नी, बायको. इतर बायका आपल्या नवऱ्याशीं जशा वागतात तशी ती त्याच्याशीं वागणार. "तें कांहीं नाहीं! माझा मणी मला आत्तांच्या आत्तां पाहिजे." म्हणून आपल्या नवऱ्यापाशीं ती हट्ट धरते. स्त्री हट्टा पुढें कांहीं इलाज असतो? बिचारे शंकरजी! तो मणि परत मिळविण्याच्या उद्योगाला लागतात. नटराजांचे तांडव सुरू होतें. दमदार पदन्यासानें पृथ्वी कंपायमान होते. शेषाला पृथ्वीचा डोलारा डोक्यावर संभाळणें कठीण जातें. बिचारा शरण येतो महादेवाला, आणि पाण्याच्या धारेबरोबर मणी पृथ्वीवर पाठवून देतो. भूगर्भातील पाणी तें! उकळतेंच असणार. तेच हे गरम झरे.

महेश्वरानें बहुधा कित्येक वर्षें जाम पावती पाठविलीच नसावी. म्हणून १९०५ च्या भूकंपापर्यंत या क्षेत्रांत असे मणी मधून मधून या गरम झऱ्यांतून येतच राहिले. भूकंपानें शेषाला पावती पोचविली आणि तेव्हांपासून हे मणी येण्याचें बंद झालें असावें.

कसल्या तरी खनिज पदार्थांच्या गोळ्या येथील रघुनाथजीच्या मंदिरांतील पुजारी अद्यापहि दाखवितो म्हणतात. देवळाच्या मागें असलेल्या मोठ्या गरम झऱ्यांतून वर आलेलेच हे मणी, १९०५ च्या भूकंपापूर्वी. असें हें पौराणिक कालापासून वाजत गाजत असलेलें मणिकरण क्षेत्र बाबानें जागतें आणि पवित्र राखलें आहे.

खरें म्हणजे इथें एक दिवस तरी मुक्काम व्हायला हवा होता. परंतु आमच्याजवळ दिवस शिल्लक नाहीं.

आम्ही मुंबईचे म्हणजे चहाबाज असें ओळखून पहिला चहा सूर्योदयाबरोबर झाल्यावर तासा-दीडतासानें बाबा आम्हांला पुन्हा चहा देतो. प्रसन्न वातावरण आणखीच प्रसन्न होतें. बाबाला आदरपूर्वक नमस्कार करून बाबाचा आम्ही आशिर्वाद घेतों. निघतांना आण्णा बाबाच्या हातीं एक पांच रुपयांची नोट ठेवतात. ती कितीची आहे हें न बघतां धर्मादाय पेटीप्रमाणें बाबा ती कोपरीच्या खिशांत कोंबतो.

निरोपाच्या शेवटीं नमस्कार करतांना बाबा पुन्हा एकदा खीरगंगेकरतां येण्याची अठवण देतो. आणि सांगतो कीं तुम्ही याल तों पर्यंत या पुलापर्यंत जीप यायला लागलेली असेल.

♣ ♣

## कुलू (टूरिस्ट बंगला II)

*ऑक्टोबर २७, १९६४*

माणसाला थोडें फार कांहीं होत असलें आणि आज जसें मला पडून राहायला लागलें आहे, तसें पडल्या पडल्या माणूस जें कांहीं करतो त्यालाच बहुधा मनन आणि चिंतन म्हणतात. विनोबा, नेहरू...पण कशाला हीं मोठीं नांवें घ्या उगाच! बायका मुलांचें चिंतन नि आजची नग्गरची सहल हुकल्याचें मनन केलें म्हणजे मी काय चिंतक थोडाच होणार आहे? विश्वाची चिंता करतो त्याला चिंतक म्हणायचें!

तसा चिंतक व्हायचा मीसुद्धां आज प्रयत्न केला. भारताचें पुढें कसें होईल याचा विचार केला. परंतु काय व्हायला हवें आहे तेंच मला माहीत नसल्यामुळें कसें होईल ही चिंताच मला लागेना. आंतरराष्ट्रीय तणातणी कशी कमी होईल याचा विचार करूं लागलो. पण मग विचार असा आला कीं, आपला मुलगा व त्याच्यापेक्षां दोनच वर्षांनीं वडील असलेली मुलगी यांच्यांतली तणातणी नाहीं आपल्याला कमी करतां येत! तर जगांतली तणातणी कमी करण्याचा मी काय उपाय शोधून काढणार! कुणी कुणाची खोडी काढायची नाहीं हा उपाय मी मुलांना सुचवितो, पण त्यांच्या कांहीं तें गळीं उतरत नाहीं. तणातणी करणाऱ्या राष्ट्रांनासुद्धां या पेक्षां दुसरा कोणता उपाय मी सुचविणार!

भारतानें अणुबॉंब बनवावा किंवा नाहीं वगैरे वगैरे अखिल मानव जातीच्या भवितव्याबद्दलचे विचारसुद्धां मला (वर्तमानपत्रांत वाचल्यावरून) सुचले. म्हणजे आठवले. तींच तींच अक्षरें (वर्तमानपत्रांत वाचलेली) पुन्हां पुन्हां दिसत. तीहि पांढऱ्या ढगांसारखीं विरून जात. मग मला आमच्या आजीचा शब्दप्रयोग आठवला. 'मातीचे चिकटविलेले कुल्ले.' आणि माझ्या लक्षांत

आलें कीं आपण कांहीं चिंतक होऊं शकत नाहीं. मनन मात्र करतां येतं. वाचलेल्या, पाहिलेल्या, अनुभविलेल्या गोष्टींचें.

काल-परवा मी जितका चढलों, चाललों, तितकेच आण्णा चढले, चालले होते. माझ्यापेक्षां त्यांची दमछाक झाली होती. आणि तें साहजिक होतें. परंतु रात्रीच्या झोपेनंतर ते ताजेतवाने झाले होते. आणि मला थोडासा ताप आला होता. म्हणजे आण्णांना म्हातारा (मनांतल्या मनांत) म्हणतां म्हणतां मीच म्हातारा ठरलों होतों. सकाळीं त्यांनीं मला चक्क चापलेंच.

"...समजलं समजलं! तुम्हीं आज नुसतं पडून राहायचं. स्नानाच्या आज गोळया घ्यायच्या हं! नाहींतर जाल हुशारी वाटते म्हणून स्नान करायला तुमच्या अंगांत ताप आहे तों पर्यंत तुम्हीं पुढारी नाहीं. मी पुढारी. आलं लक्षांत?"–आण्णा.

"तसं पुढारीपण आपल्यापैकीं कुणालाच जमलं नाहीं. तें जाऊं द्याहो! पण आण्णा थोडासा ताप असला तरी नग्गरला यायला हरकत नाहीं मला. कन्याकुमारीला तर..."

"कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंतचे तुमचे तापांतील पराक्रम मला माहीत आहेत. तरी पण तेव्हांची गोष्ट निराळी होती. आतां कांहीं तुम्ही तरुण नाहीं."

"तरी पण अण्णा, माझ्या अंगांत विशेषसा ताप नसावा."

"थोडासा तरी आहे ना! तोच जास्त होऊं नये म्हणून जपायाला नको का? काल तुम्हांला जेवण गेलं नाहीं. आज दुपारीं इच्छा असल्यास थोडासा नुसता भात जेवा. संध्याकाळीं मी तुम्हाला भरपूर दूध आणून देतों तें घ्या. उद्यांना तुम्ही मोकळे व्हाल. पुढच्या कार्यक्रमाकरतां तरी तुम्ही मोकळं व्हायला हवं." लहान मुलासारखें अण्णा मला समजावीत होते.

"ठीक आहे. सगळं कबूल तुम्ही म्हणतां तें. आज बाहेर कुठं जाणार नाहीं. तुम्ही म्हणतां तसं सगळं तंतोतंत मी पाळीन. परंतु तुम्ही एकटे नग्गरला कां जाऊन येत नाहीं? नग्गर हे एक 'मस्ट' पैकी ठिकाण आहे. तुम्ही खुश्शाल जाऊन या ना!'

"आहो! माझा तरी उत्साह कुठें एवढा उतू चाललाय! मला पण एक दिवस विश्रांती मिळेल अनायासं. मनालीला तर आपण जाणार आहोंतच ना? मग सगळयाच ठिकाणीं जायचा अट्टाहास कशाला हवा? तेंहि उत्कृष्ट ठिकाण आहेच ना?'

" जाऊन या हो तुम्ही ! "

" जाऊंद्या हो तुम्ही ! "

आण्णांच्या मनांत ते म्हणाले त्याप्रमाणें फारसा उत्साह नसेल, किंवा मला एकट्याला सोडून त्यांच्याच्यानें जाववलें नसेल. ते गेले नाहींत खरे. आणि एकूण नग्गर आमचं हुकलें आहे. कश्मीरांत मागें अमरनाथ असाच हुकला होता. नेहमीं कांहींतरी हुकत राह्यलाच हवें. सतत सर्वच मनाप्रमाणें घडत गेलें तर माणूस आपली जागा विसरेल. विश्वाच्या या अवाढव्य पसाऱ्यांतील आपलें एका क्षुद्र कणाचें स्थान विसरेल आणि परिणामीं दुःखी मात्र होईल.

आमच्या ' भाऊभटा 'ची जीप आम्हांला कधीं मिळेल असें आतां आम्हांस वाटतच नाहीं. जीपच्या चालकास आणखी दोन दिवसांत पंजाबांत कारखान्याच्या गांवीं जाण्याची आज्ञा झालेली आहे. तेव्हां जायच्या आधीं दोन दिवसांत चोरटें भाडें करून जितके जास्त पैसे मिळवतां येणें शक्य आहे तितके तो मिळविणार आहे. आम्हींहि भाडें द्यायला राजी आहोंत. परंतु ' भाऊभटा'च्या न कळत तें साधणार नाहीं. म्हणून ' भाऊभटा'च्या देखत तो आम्हांला नाना सबबी सांगतो आहे. ' भाऊभटा 'ला त्याचेंच आतां वाईट वाटत आहे. त्याचा नाइलाज झाला आहे. जीपवाला त्याला एकट्याला कुठें मधूनच चार-सहा मैलांवर सोडायचें आणायचें काम करतो आहे. तरी पण त्याच्या हुकमतींत तो नाहीं. म्हणूनच आमचें घोडें पेंड खातेंय, नि भाऊभट खंत करतोय !

बसनें नग्गरला जायला मिळालें असतें तरी तो धावता दौराच झाला असता पुढाऱ्यासारखा. नीटपणें बघायचें म्हटलें तर आठ एक दिवस तरी हवे होते. या आठ दिवसांत सुद्धां चंदरखानी आणि जवळपासची आणखी कांहीं सौंदर्य-स्थळें पाहूं शकलों असतों. आणि मलानासारखें वैशिष्ट्यपूर्ण खेडें पाह्यचें राहूनच गेलें असतें.

हें खेडें दुर्गम आहे. आणि त्याच्याबद्दल कांहीं वैशिष्ट्यें कळल्यापासून हें गांव आहे तरी कसें तें समक्ष पाहण्याची माझी फार इच्छा होती. या खेड्यांत राज्य म्हणजे हुकूमत कोणाचीच नाहीं. जम्लू या ग्रामदेवतेचें तिथें राज्य आहे. आळतेकरांच्या संशोधनांतले शेकडों वर्षांपूर्वीचें दक्षिणेंतील अग्रहार गांव मला स्वप्नवत् वाटे. विनोबांच्या ग्रामदानी गांवापेक्षांहि निराळीं अशीं हीं अग्रहार गांवें होतीं. सर्व थरांतले ग्रामस्थ गांवगाडा चालवीत असत. ग्रामदेवतेच्या नांवानें.

या मलाना गांवाचें तसेंच आहे. जम्लू या ग्रामदेवतेलाच इथली प्रजा करभार देते. तो पैसा ग्रामदेवतेच्या जामदारखान्यांत जमा होतो. मुख्य पुजारी हा ग्रामदेवतेचा प्रतिनिधी. गावांतल्या सार्वजनिक कामाला गांवकऱ्यांच्या सल्ल्यानें तो याच जामदारखान्यांतील द्रव्य त्यांच्या समक्ष काढून आणून खर्च करतो. क्वचित् गावांत पाहुणा आला तर त्याचें आदरातिथ्य उत्तम केलें जातें. वैयक्तिक मालकीची जमीन इथें नाहीं. गांवकरी करीत असलेली शेतीभाती ग्रामदेवतेची आहे.

अग्रहार गावें किंवा अलिकडील विकसित ग्रामदानी गावें आणि हें मलाना गांव यांत फरक इतकाच–तो अर्थात सर्वांत महत्त्वाचा आहे–कीं, गांवकरी हें जें सामूहिक जीवन जगत आहेत तें परंपरागत रूढीमुळें. सामूहिक जीवनाची समाज-व्यवस्था जाणीवपूर्वक स्वीकारून नव्हे.

रस्ता दुर्गम म्हणून बाह्य जगाशीं याचा संबंध फारसा नाहीं. कसल्यातरी सुगंधी वनस्पती इथें मिळतात. गांवकरी त्या गोळा करून दलालाला विकतात. एवढाच याचा बाह्य जगाशीं संबंध. ग्रामशासनाचा एक नमुना पाह्यचें आमचें हुकलें होतें.

मोहेंजोदडो, हडाप्पा या हजारों वर्षांपूर्वीच्या भारतीय नगरांचें नमुने, राहाणी-मान वगैरे संस्कृतीची बाह्यांगे आपण ज्या उत्सुकतेनें आणि ज्या कुतूहलानें बघूं तितक्या किंबहुना त्यापेक्षां जास्त उत्सुकतेनें मी हें गांव न्याहाळलें असतें. मोहें-जोदडो अगर हडाप्पा इथें पुरातन संस्कृतीचीं केवळ बाह्यांगें पाहायला मिळतील. पण इथें या गांवांत त्या संस्कृतींचें अंतरंग, माणसाचें मन, पाहायला मिळालें असतें. ममीज पाहणें निराळें आणि तोच माणूस सचेतन पाहाणें निराळें. ही महत्वाची संधी हुकली होती.

## म ना ली (टूरिस्ट रेस्ट कॅम्प)

*ऑक्टोबर २८, १९६४*

" खाना रक्खा है साब! जल्द ली जिये. नहीं तो ठंडा हो जाएगा." चौकीदार जेवणाचे पदार्थ व ताटल्या वगैरे सामान शेजारच्या खोलींत मांडून ठेवून आम्हांला सांगायला येतो.

" अरे बेतसिंग! देखो. इधर इलेक्ट्रिक हीटर कहीं नहीं मिलेगा?" वाढत्या थंडीची आतां चिंता वाटूं लागते. जेवणापेक्षां (तें तर पदरांत पडल्यासारखेंच होतें.) शीत निवारणाचें महत्व आतां मोठें होतें.

" इधर तो नहीं है जी. गांवमे शायद किरायेसे मिलेंगी, कल देखूंगा साब."

" आच्छा आच्छा! कल जरूर देखना भला! और देखो चंद मिनटमें गर्म गर्म फुल्के लाना."

" जी साब!"

इथें जेवण गार व्हायला कांहीं मिनिटें सुद्धां लागत नाहींत. जेवतां जेवतां तें गार होतंय. पारा शून्याच्या आसपास आहे. जेवढे म्हणून गरम कपडे अंगावर चढविणें शक्य आहे तेव्हढे चढविले आहेतच. आतां जेवणानंतर थंडी जास्तच वाजते किंवा काय कुणास ठाऊक. आतां निजतांना गरम पांघरुणें आमचीं आहेत तीं आम्ही घेणारच आहोंत. परंतु इष्ट मित्रांसाठीं ज्या शाली सामानांत आहेत त्याहि आमच्या पांघरुणांना जोडून ठेवल्या आहेत. शिवाय झोपायच्या खोलींतला दिवा रात्रभर जळता ठेवणार आहोंत. लहानसा हीटरच तो. तेव्हढीच उष्णता राहील. या प्रवासांत थंडीचा एवढा झपाटा कुठें अनुभवला नाहीं. नऊ वर्षांपूर्वी तेरा हजार फुटावरील बावजनच्या झोपडींतील ती रात्र मला आठवते हे आतां.

आजची तिथी पंचमी–षष्ठी असावी. अकरा वाजायला आले. अद्याप निशानाथाची चाहूल नाहीं. कुठल्यातरी टेकडी वरून आमच्यापर्यंत पोचायला त्याला थोडा वेळ लागणार आहे. त्या दिवशीं शंकर टेकडीवर स्वारी आमच्याकडे टक लावून बसली होती. पण आमचेंच आधीं तिकडे लक्ष नव्हतें. चक्रनेमिक्रमेण एकेकाची पाळी येते. आज त्याची वाट पाहाण्याची पाळी आमची होती. वाट पाहावी लागली तरी आम्ही बसणार आहोंत. लहानपणीं कांचेला काजळ लावून सूर्यग्रहण पाहाण्याकरतां तटकळत बसत असूं तसे. किंवा गांवकरी नेहरूंच्या गाडीची वाट पाहात रा जरस्त्यावर तटकळ बसत तसे. कांहीं तरी दिव्य दर्शनाचा साक्षात्कार होणार असल्याची खात्री आहे.

कुलूला आल्याचें सार्थक झालें असें वाटावें असें हें दुसरें ठिकाण! पहिलें माणिकरण. आणि दुसरें हें मनाली. पहिल्याचा विशेष आध्यात्मिक तर याचा नैसर्गिक. दोन्ही सौंदर्याचेच आविष्कार.

इथें हें जें जाणवत आहे त्याचें कांहींसें श्रेय आम्ही उतरलों आहोंत या ठिकाणाला आहे. एकाद्या गांवाचा बरा वाईट, स्पष्टास्पष्ट असा कांहीं तरी ठसा आपल्या मनावर उमटतो. त्यांत आपल्या राहात्या जागेचा, त्याच्या सभोंवतालच्या वातावरणाचा आणि तिथल्या सोयी गैरसोयींचा सुद्धां आपल्या मनावर होणारा परिणाम अंतर्भूत असतो. येरवडा-नाशिकचें हवापाणी चांगलें आहे. तिथल्या तुरुंगांतल्या कोंदट बराकींत राहाणाऱ्या हतभागी जीवांना त्याची काय मातबरी वाटणार? बंगलेवाल्यांना, म्हणजे त्यांत राहाणाऱ्यांना जरूर वाटते.

इथला हा रेस्ट कॅम्प, बस-तळापासून आपल्या मलबारहिलइतक्या उंचीवर आहे. सात फर्लांग चढ चढावा लागतो. चढतांना आण्णांची चांगलीच दमछाक होते. पण वर आल्यावर स्वारीची तबियत खूष! वरून खालच्या खोऱ्यांतलें मनाली गांव, पलीकडील मैदान आणि 'बियास दर्या'ची धार या सगळ्या गोष्टी चित्रांतल्यासारख्या लहानसर दिसतात. त्या पाहून थकवा कुठच्या कुठें पळतो.

जी गोष्ट पहलगांवच्या परिसरांत जाणवते तीच अधिक उत्कटत्वानें इथें जाणवत आहे. हिमाच्छादित शिखरांनीं वेढलेलें खोरें बघितलें कीं माझें हिंदु अंतर्मन त्या परिसराचा संबंध भोलानाथाशीं जोडून मोकळें होतें. बाराहि ज्योतिर्लिंग भारताच्या अष्टदिशांस आहे. गिरिकुहरांत आहेत तशींच सागरतीरीं आहेत. परंतु त्यांचें

'हेड ऑफीस' आणि 'रजिस्टर्ड ऑफीस' दोन्ही हिमशिखरांतच असलीं पाहिजेत अशी आपली लहानपणापासूनची दृढभावना आहे. आपल्या कामा-निमित्त आपल्या पंतप्रधानांप्रमाणें दौरे त्यानेंहि जगभर केले असतील. परंतु आपलें 'मिशन' संपलें कीं तो जो परत आपल्या घरीं म्हणून येत असेल तो मात्र असल्या पुण्यभूमींतच.

अशी एक भव्य कल्पना यात्रींच्या जगांत रूढ आहे कीं पुरा पंधराशेच्या पंधराशे मैल पसरलेला हा नगाधिराज म्हणजेच एक उमा-महेश्वराची नंदीवर आरूढ झालेली त्रिशूलधारी स्वारी. नेपाळांतील पशुपतिनाथापाशीं या स्वारीचें मध्यांग. गौरीशंकर, एव्हरेस्ट नि कांचनगंगा हीं त्रिशूळाचीं तीन अणकुचीदार पातीं. इतरहि आणखी तपशील सांगितला जातो. ही कल्पनाच एवढी भव्य आहे कीं सामान्य माणसास तिचें आकलनच होत नाहीं. कागदावर समजूं शकतें. पण मनांत ठसत नाहीं. नगाधिराजाच्या किंचिद्दर्शनानें काय समजणार? समजायचीच पंचाईत तिथें रसग्रहण कोण करणार?

आतां जवळ जवळ अद्याप अंधार आहे. अंधारांतच उजेडाच्या आशा सामाव-लेल्या असतात. अंधाराला जो समजूं शकला नाहीं त्याला उजेडांतहि प्रकाश दिसणार नाहीं. असें अंधाराबद्दल कांहीं तरी गूढ गूढ बोललें नि लिहिलें जातें. माझ्यां बाबतींत अंधाराची मात्रा फारशीं कांहीं चालतच नाहीं. अंधार झाला कीं मला झोप येऊं लागतें. आज आतां मी जो ताटकळत बसलो आहे तो मोठ्या कष्टानें. कौमुदी फुलेल नि आपल्या कष्टांचें चीज होईल या आशेनें. पुढच्या करमणुकीच्या कार्यक्रमाच्या आशेनें मुलें जशी व्याख्यात्यांचे व्याख्यान ऐक-ण्याची कळ सोसतात तसा.

फार लहानपणीं माझ्या मामाची रंगाची पेटी माझ्या हातीं आली होती. चांगले तास दोन तास मी त्या वेळीं चित्रकलेंत रमलों होतों. फक्त काळा व गडद निळा दोनच रंग मी वापरले होते. तेव्हां जी चित्रकला उमटली होती कागदावर त्यांत हत्ती, घोडे आणि पशु-पक्षी तर होतेच, पण शिवाय देव आणि राक्षस सुद्धां मी काढले होते. ते सर्व या काळोखांत माझ्या समोर आतां आहेत.

आतां हा उजवीकडचा डोंगर आईष्ता आईष्ता कौमुदीवरचें झाकण उघडीत आहे. मघांपासून काळोखाच्या या भव्य डेऱ्यांत जें घुसळण चालू होतें त्यावर आतां नवनीताचा हा थोरला गोळा आला आहे! दिवसा पाहिलेल्या वस्तुजाताचे

रंग आतां फार मोहक दिसूं लागले आहेत. त्या सर्वांवरून कौमुदीचा दैवी हात फिरला आहे ना ! ही कौमुदी फुलायच्या आधीं तिच्या विभावरी मातेला थोडे का कष्ट पडले होते ? कुलाचार संभाळणें नाहीं तरी गृहिणीलाच बघावें लागतें. दिनराज ! पुरुषच तो ! त्याला काय ! ताम्हणांतला गुलाल, हळद, कुंकू उधळून संपविल्यावर, पश्चिम गोलार्धातील आपला पुरुषार्थ करायला स्वारी निघून गेली होती. एक एक नीरांजन दीप तेवता ठेवून विभावरीनें कौमुदी नांवरूपाला येईपर्यंत, कसें बसें प्रकाश दानाचें आपलें कौटुंबिक व्रत संभाळलें होतें. चार-साडेचार तासानंतर आतां कुठें तिला विश्रांती मिळाली होती.

आमच्या समोर आमच्याच डोंगराच्या उतारावर कौमुदीच्या शुभ्र फुलांचा खच पडला आहे. घनदाट वृक्षराजी खालीं प्राजक्ताच्या फुलांची पखरण आहे. तर विरळ पर्णराजीखालीं शुभ्र कमळांची उधळण आहे. एकादा वेडाहीं ( हा कवि असूं शकेल ) वेचायला धावावा इतकीं हीं खरींखुरीं फुलें वाटत आहेत. वेंचायला उठायची कल्पना मनांत येतांच गुरगुटून चांगली ऊब आलेलें पांघरूण काढायला लागेल ही जाणीव होते नि मग लक्षांत येतें कीं समोरच्या दैवी धवलतेला पकडतां येणार नाहीं. नुसत्या दर्शनांतच धन्यता मानावी लागेल.

एक एक गोष्टीला आतां स्पष्ट आकार येऊं लागली आहे. थेट नाकासमोर, पार लांबच्या श्रेणींत असलेलें हिमशिखर हें हिमशिखर नसून शिव-मंदिराचा रुपेरी कळस आहे. या मंदिराच्या भव्य प्राकाराचें प्रवेशद्वार या मंदिराला शोभण्याइतकें भव्य, आमच्यापासून केवळ वीसपंचवीस फुटांवर आहे. दोन देवदार ! डांगमधल्या सागांसारखे उंच सरळसोट ! यांच्यावरच या भव्य प्रवेशद्वाराची मदार आहे. यांचा उंचावरील शाखाविस्तार दहा मजली गोपुरापेक्षां निश्चित आकर्षक आहे. माणूस काय निसर्गावर मात्र करूं शकलाय ? वरच केवळ शाखा विस्तार असलेली दोन देवदारांची ही महिरप एकदां लक्षांत आली कीं तिच्यावरची नजर बळेंच काढून घ्यावी लागते. शहरांत हजारो रुपये खर्चून कंत्राटदारांनीं बांधलेल्या कमानी झक मारतात हिच्यापुढें !

ताजमहाल पहिल्या प्रवेशद्वारांतून कांहींसा असाच दिसतो. दरवाजांतून आंत शिरायच्या आधीं ताज, आमच्या समोरच्या शिवमंदिरासारखा असाच स्वप्निल वाटतो. असाच दैवी वाटतो. ताजमहालाचा मुख्य आर्किटेक्ट या जागीं आधीं यऊन गेला असला पाहिजे. तरी सुद्धां त्याची कलाकृती या भव्याकृतीची लघु-आकृतीच झाली आहे.

पंडित नेहरू सवड सांपडली कीं मनालीला येत असत. त्यांच्यासारख्या कवि हृदयाच्या चिंतकासच या परिसराचा लोभ वाटावा. सृष्टिवैभवानें नटलेला हा कुलू-राणीचा प्रदेश माणसाचा दृष्टिकोन विशाल बनविणारा आहे. पंडितजी इथें आले कीं नग्गरला सुद्धां जात असत. या नग्गरला निकोलस रोएरिश हा रशियन चित्रकार कांहीं वर्षे वास्तव्य करून होता. निसर्गाशीं लांबचें-जवळचें नातें असणाऱ्या कोणत्याहि पेशाच्या माणसाची हीं काशी–रामेश्वर तीर्थं आहेत.

सकाळीं कुलहून निघतांना आम्हांला कल्पना नसते. कीं ऐकीव आणि पुस्तकी माहितीवरून आम्ही केलेल्या कल्पनेपक्षां ही कुलू राणी इतकी आकर्षक आहे. आमचें हें निवासस्थान ज्या मोक्यावर बांधलेलें आहे, त्यामुळें आम्हांला तो स्वर्गाश्रम वाटत आहे. साहेबानें बांधलेलें ठिकठिकाणचे डाक-बंगले पाहिल्यावर त्याला सौंदर्य दृष्टि होती याची खात्री कुणालाहि पटावी. परंतु आमच्या लोकशाहीच्या बाल्यावस्थेंतील (ही अवस्था आणखी किती वर्षे बाल राहाणार आहे!) सरकारच्या बाबतींत हा एक गोड अपवाद म्हणायला हवा. किंवा कांहीं चुकीची गोलमाल तरी झाली असावी. या प्रवासांतील आमचें सर्वोत्कृष्ट निवासस्थान हेंच. उंची सुमारे साडेसहा हजार फूटच आहे. परंतु बर्फ सान्निध्यामुळें पारा उंचीच्या मानानें अधिक खालीं उतरतो.

तिब्बतची सरहद्द इथून रस्त्यानें सुमारे पाऊणशें मैल असेल. सरळ रेषेंत फारच कमी असावी. आम्ही कांहीं सरहद्द पाहायला आलेलों नाहीं. तरी पण ती जाणवत आहे. लष्कराच्या 'यातायाती'(हा मात्र हिंदी शब्द )मुळें.! दहाच मैलांवर रोहटांग. ती चढून गेल्यावर एकच भारतीय विभाग मध्यें राहिला. लहौल. परंपरागत एक वाहाता रस्ता मनाली–राहाला–रोहटांग असाच तिब्बतमध्यें पोहोचला आहे. आतां रोहटांगपर्यंत जीप चढते. आणि पुढें मैदान आहे. हवी तिकडे जीप न्यावी. बस सर्व्हिस मात्र राहाला पर्यंतच (रोहटांगचा पायथा) आहे.

पंधरा-वीस वर्षांपूर्वी एका प्रवाशानें एक चूष केली होती. बरोबर जीप आणली होती. ती मोडून खेचरांच्या पाठीवर लादून रोहटांग चढवून वर नेली. तिथें पुन्हा जोडली आणि मनसोक्त शेकडो मैल फिरविली. विद्युत्चलित वाहन तिथल्या स्पित्ती, लहौली म्हणजे जवळ जवळ तिब्बतीच, लोकांनीं कधीं पाहिलेलें नव्हतें. त्याची त्यांनीं पूजा काय केली, माणसांना खाऊं-पिऊं काय घातलें! मोठी धमाल उडवून दिली होती त्या जीपवाल्यानें!

या गांवांत हिंडतांना स्थानिक माणसाशिवाय इतर उघडे वाघडे हिंडणारे हमाल, मजूर कोण स्पिती आणि कोण तिब्बती हें कांहीं आपल्याला ओळखत नाहीं. सगळेच मंगोलियन चेहरे. स्थानिक मात्र ओळखता येतात. जवळ जवळ कष्मीरींप्रमाणेच आहेत हे. देखणे, चपल. नांवं मात्र खालिक, सादिकच्या ऐवजी बेतसिंग, जगतसिंग अशीं आहेत. प्राचीनकालाच्या स्थानिक कथा आणि दंतकथा यांचा तोंडवळा राजस्थानी आहे.

कांहींहि नवीन पाहिलें कीं माणसाच्या मनांत तुलना सुरू होते. कोकणांत कुठेंहि जायचें झालें कीं एकादी तरी घाटी चढावी किंवा उतरावी लागते. कराव्या लागणाऱ्या चढउतारामुळें माणसें चपळ, लहान चणीचीं व काटक-चिवट अशीं असतात. इथलीं नि कष्मीरांतील माणसें तशींच म्हणजे कोंकणी माणसांसारखीं आहेत. चेहऱ्यामोहोऱ्यानें कोंकणी मनुष्य चांगला उजवा असतो. कष्मीरांतील चेहऱ्यांत आर्यत्व बव्हंशीं असल्यामुळें तो चेहरा खरोखर मोहक असतो. या कुलू खोऱ्यांत मात्र कोंकणच्या इतपतच उजवेपण आहे. तरीहि त्यांत निराळे पण आहे. नाहीं म्हटलें तरी मंगोलीय छाप जाणवते. तिब्बतींच्या इतकी मात्र नाहीं.

इथें ठायीं ठायीं कोंकणची आठवण येते. हा कुलू प्रदेश म्हणजे कोंकण अधिक बर्फाच्छादित शिखरें, डोंगर-दऱ्यांची उंची आणि खोली थोडी अधिक उत्कट, इतकेंच.

कष्मीर नि कुलूंत पुष्कळसें साम्य आहे, तरीहि वैविध्य इतकें कीं एक पाहिलें म्हणजे दुसरें पाहिलं असें म्हणतां येणार नाहीं. दोहोंचीं आकर्षणें निरनिराळीं. तसा विविधपणा सगळीकडेच सृष्टींत भरून राहिला आहे. पृथ्वीवरील मनुष्यवस्ती सव्वातीनशें कोटीच्या सुमाराची आहे. परंतु एकासारखा तंतोतंत दुसरा मनुष्य मिळत नाहीं. जुळ्या भावांत तिसऱ्याला फसण्याइतकें साम्य आढळलें, तरीहि त्याच्यांत सूक्ष्म फरक असतोच. इतर प्राण्यांतसुद्धां हेंच आढळतें.

इथें बसलें म्हणजे मन अंतर्मुख होऊन असेंच कुठें तरी भटकत जातं. आण्णा असेच टक्क डोळे उघडे ठेवून कुठें तरी गुरफटलें आहेत.

♣ ♣

## म ना ली ( टूरिस्ट रेस्ट कॅम्प )

### ऑक्टोबर २९, १९६४

उद्यां सकाळीं खरें म्हणजे पाहाटेसच इथून निघायचें जिवावर आलेंय. परंतु निघायला तर हवें आहे. परवां पठाणकोटला मुंबईची गाडी गांठायची आहे ना ? या ठिकाणीं आणखी दोन तीन दिवस हिंडायला आणि शेवटीं एकादा दिवस नुसतं लोळायला मिळायला हवा होता ! एका दृष्टीनें निघावें लागत आहे हेंहि ठीक आहे. चुटपुट लावणारी, ओढ लावणारी वस्तू पुरेपूर मापानें कधीं मिळूंच नये. त्याचें महत्व, त्याचें कौतुक मग दुय्यम, पुसट होतें.

थंडी जाम पडली होती म्हणूनच आज सकाळीं जाग लौकर आली. झोप मात्र अपुरी झाल्यासारखी वाटत नाहीं. आज मनालीच्या आसपास पांच-चार मैल तरी भटकून यायचें आम्हीं ठरविलें आहे. इथें स्नान करण्यापेक्षां मागच्या डोंगरांत वसिष्ठ गांवच्या गरम पाण्याच्या ( गंधकयुक्त ) कुंडांत स्नानाला जायचें आम्ही ठरवितों, चहा-नाष्ता उरकून आम्हांला बाहेर पडायचें असतें.

पहिल्या चहाच्या वेळींच बेतसिंग प्रवाशांशी नोंद-वही आमच्या पुढें ठेवतो. आमच्या नोंदी भरून झाल्यावर मी ते अथपासून इतिपर्यंत चाळून पाहातों. मराठी माणसांचीं नांवें फक्त दोनच आढळतात. पुढें होऊन बेतसिंग ‘ आमच्या मुल्लूखवाल्यां ’ ची म्हणून पुष्कळशीं नांवें काढून दाखवितो. ते सगळे आमचे मुल्लूखवाले असतात यांत संशय नाहीं. सगळीं नांवें मुंबईचींच, पत्ते मुंबईचे. फक्त तीं मराठी नव्हतीं. एवढेंच मला खटकत होतें.

यावर एक ठराविक समर्थन केलें जातें. “ मराठी माणसे आपल्या राजधानींतच बिचारी भांडीं घाशीत आहेत, फार तर खर्डे घाशींत आहेत. आणि साचे चालवित आहेत. त्यांच्यापाशीं कुठला आलाय पैसा नि स्वास्थ्य ? ” या म्हण-

ण्यांत अगदींच तथ्य नाहीं असें नाहीं. आणि हें तथ्य भूषणावह तर मुळींच नाहीं. परंतु म्हणून काय इथें येणाऱ्या माणसांत दोनच मराठी नांवे मिळावीं ? इथें यायला लागणारे पैसे आणि स्वास्थ्य असणारीं माणसे दोनच ? हॅट् हें कांहीं खरे नव्हे.

या कुलू खोऱ्यांत प्रवाशांची सोय केवळ अभावानेंच जाणवते. बस मधून जाण्यासारख्या ठिकाणीं बसमध्यें गर्दी. म्हणजे अपुऱ्या गाड्या. पुढें डोंगरांत जायला स्वारीला घोडें नाहीं, सामानाला खेंचर नाहीं का हमाल नाहीं. जिथें जीपच जाऊं शकेल अशीं कित्येक ठिकाणें आहेत. परंतु जीपा मिळत नाहींत. प्रवाशांनीं जीपा काय आपल्या सामानांतून आणायच्या आहेत ? जीप मिळावी म्हणून रास्त मार्गानें आम्ही मुंबईपासून प्रयत्नशील आहोंत. योग्य माणसांची योग्य त्या व्यक्तीसाठीं अधिकाऱ्यांसाठीं ओळखपत्रें-शिफारसपत्रें आणली आहेत. परंतु त्यांना बसच्या तिकिटांइतकी सुद्धां कुणी किंमत देत नाहीं. जीप फुकट नाहीं मागितली. होईल तो सर्व खर्च, मजुरी, भाडं वगैरे आम्ही द्यायला तयार आहोंत, परंतु जीप कुठेंहि मिळाली नाहीं आतां मिळणार नाहीं. इथें आमचा कुणी दोस्त, नात्याचा, अगर संबंधाचा अधिकारी नाहीं ना ? तसें असतें तर कोणत्यातरी खात्याची जीप आम्हांला उपलब्ध झाली असती. तशा आणखी कुणाला उपलब्ध झालेल्या जीप्स आम्हांला भेटल्याच आहेत.

वर्तमानपत्रांतून जाहिरातीचा खर्च करून राज्यसरकार जाहीर निमंत्रण देतें तरी कोणत्या तोंडानें ? आणि कशाला ? इथें आलेल्या प्रवाशांच्या जखमांवर मीठ चोळायला ? जाहीराती देऊन प्रवाशांचें शिव्याशाप खाण्याची ही काय हौस या सरकारची ! जाहिराती नसल्या तरी कांहीं हौशी भटक्ये येणारच आहेत. परंतु ते आपल्या जबाबदारीवर येतील, भटकतील, चालतील, चढतील, पडतील. आपल्याला सोसेल तें करतील. परंतु मग तें कुणाच्या नांवानें चरफडणार तरी नाहींत.

न्याहारी उरकून आम्ही बाहेर पडतों ते प्रथम हिडिंबा देवीच्या मंदिरांत जातों. आमच्या राहात्या जागेपासून हें केवळ फर्लांगभर अंतरावर आहे. पुन्हा देवदाराची गर्द राई. इतकी गर्द कीं मुंबईला पारशांच्या घरांच्या ओट्यांवर पांढऱ्या रांगोळीचे ठसे मारलेले दिसतात तशी इथली सर्व देवदारवटीची जमीन सडा-संमार्जनानंतर कोवळ्या उन्हाच्या ठशांनीं शोभिवंत केलेली दिसत आहे,

देवीचें दर्शन मात्र आम्हांला होत नाहीं. पुजारी पूजा उरकून दरवाजे बंद करून गेला आहे. हे जाडजूड दरवाजे आणि कोरीव कातीव खांब सगळे देवदाराचें आहे. आणि याला शेकडो वर्षें झालीं आहेत म्हणतात.

आपल्याला देवदारी खोके माहित असतात. आणि तें लाकूडहि आपण फार हलक्या प्रतीचें मानतों. परंतु इथें तें शेकडों वर्षें टिकण्याइतकें मजबूत आहे. या डोंगरउतारावरील देवदारवटीला एक शिस्त आहे. माड-पोफळीच्या बागांसारखी.

तिथून आम्हीं गांवांत उतरतों. बाजारांतील कांहीं इमारती जळल्याचें आम्ही कूलूलाच वाचलें होतें. बाजाराला सगळी अवकळाच आलेली आहे त्यामुळें. मूळ गांव अगदीं लहानसें खेडें. नेहमींच सुस्त. प्रवाशांच्या कमीजास्त संख्येवर गांवाची हालचाल अवलंबून.

नदी पारकरून आम्हांला वसिष्ठला जायचें आहे. मैलभर मनाली-तिब्बत रस्त्यानें चालल्यावर आमच्या रेस्ट कॅम्पइतकेंच वर चढायचें आहे. गिर्यारोहण संस्थेला उजवी घालून आमची चढायला सुरुवात होते. इतक्या साजिऱ्या-गोजिऱ्या डोंगरांतलें हें गांव अगदींच वठलेलें आहे. गरम ( गंधकाच्या ) पाण्याचे झरे आणि जवळचें वसिष्ठ ऋषीचें अतिप्राचीन मंदिर या शिवाय या वसिष्ठचें दुसरें कांहीं एक वैशिष्ट्य नाहीं.

स्नान करून कुंडांतून भेलकांडतच बाहेर पडतो आम्ही. इतका थकवा येतो. आण्णा तर जरा वेळ आडवे होतात ओसरीवर. मी जेमतेम वसिष्ठांचें दर्शन घेतों नि बाहेरच्या ' प्रभात रेस्टोरॉं ' नामक टावरणांत चहा नाष्ट्याची व्यवस्था करतो. हा कार्यक्रम उरकल्यावर पुन्हा हुशारी येते आणि आम्हीं मार्गस्थ होतों.

कांहीं म्हणा, सृष्टिवैभवाची जाणीव होते ती विशेष म्हणजे डोंगर उतरतांना. चढतांना विशेष जाणवतात ते म्हणजे रस्त्यांचे चढ आणि पायांतले कढ ! आतां कुठं आमचें लक्ष या आणि समोरच्या पाहाडाकडे जातें. समोरचा संबंध डोंगर ओटे पाडलेल्या शेतांनीं भरलेला आहे. पार मागें शिखरावर बर्फ दिसत आहे. एक मोठी घळहि बर्फानें भरलेली खालीं ओघळली आहे. आख्ख्या कुलू खोऱ्यांत नांव घेण्यासारखें पीक म्हणजे आलू ( बटाटा ) आणि भात. मका आणि कडधान्येंहि होतात. पण क्वचित्. वाळत घातलेलीं मक्यांची कणसें घरांच्या छपरांवर दिसत आहेत तीं नारिंगी रंगाचीं आहेत.

घरांचीं छप्परें कौलांचीं नाहींत कीं पत्र्याचीं नाहींत. तीं आहेत गुळगुळीत दगडाच्या खापऱ्यांची. खापऱ्या चांगल्या वीतभर-हातभर लांबीच्या आहेत. याच

डोंगरांतून त्या काढलेल्या आहेत. कोकणांत जसे जांभ्याचे दगड हरएक गांवीं खणून कापून काढतां येतात तशा. याचें छप्पर कौलांपेक्षां साधं नि सुबक दिसतेय.

औरंगाबादला एक पाणचक्की आहे. ती पाहायला प्रवाशांची झुंबड लागते. या उतारावर त्या ठिकठिकाणीं डझनभर तरी आहेत. परंतु पाहायला प्रवासीच नाहींत. डोंगराच्या उतारावर म्हणाल तिथें पाण्याचा झोत चाकाच्या पात्यावर पडायला ओंजळ धरून उभा आहे. एक पातें फिरतें. त्या जागीं येणारें दुसरें फिरतें. तिसरें फिरतें. सबंध चाक फिरतें. या चाकाला वरच्या बाजूला जोडलेल्या जात्यांत धान्य भरडून निघत आहे. इतकी साधी रचना आहे कीं याला यंत्र म्हणवत नाहीं. सहज सुलभ ! सहज सुंदर ! या निष्काम कर्म योगिनींची ही सेवा फार पुरातन काळापासून अखंड चाललेली आहे.

आपण पाय टाकावा तो दगड आपला चकाकतो आहे ! त्यांत रुपें नाहीं, कथील नाहीं का शिसेंसुद्धां नाहीं. अभ्रकाचे कण आहेत ते.

आमच्या समोरून डाव्या हाताकडून उजव्या हाताकडे एक निळसर पक्ष्यांची रांग जाते. हे रानकोंबडे असावेत. आपल्याकडील रानकोंबडे मातकट रंगाचे असतात. निळ्या डोंगरांतले हे निळसर रंगाचे असावेत. गरुड पक्षी मध्य हिमालयाप्रमाणें या भागांतहि दिसतात म्हणतात. ते दिसावे अशी इच्छा आहे.

आमची उतारवाट आतां तिब्बत रोडला मिळायला आली आहे. रस्त्यापलीकडला टीचभर रुंदीचा गर्जत चाललेला 'बियास दर्या' आतां दिसूं आणि ऐकूं येऊं लागला आहे. त्या एवढ्याशा नदींत मधून मधून कापीव लाकडें वाहून दुसऱ्या गांवीं जाण्याकरतां सोडलेलीं दिसत आहेत. क्वचित् तीं एकमेकांस भेटत आहेत. जरा वेळ एकमेकांस सोबत करून पुन्हां दूर फेकलीं जात आहेत.

त्या लाकडांप्रमाणें आम्ही मोठ्या रस्त्याला उतरतों, तोंच आमची गाठ एका शिकाऱ्याशीं पडते. त्याच्याबरोबर दोन मजूर आहेत. त्यांच्या दोघांच्या मिळून खांद्यावर असलेल्या एका काठीला चार पक्षी उलटे टांगलेले आहेत. दोन कवडे. दोन तित्तिर. सागुतीची त्याची व्यवस्था छान झाली आहे.

"नमस्ते !" पहिला रामराम त्याचा. फार वेळ त्याला बोलायला कुणी मिळालें नसावें.

"नमस्ते, नमस्ते !" आमचा प्रति रामराम.

"बम्बईवाले ?"–शिकारी.



9408

"जी हाँ!" यानें कसें नेमकें ओळखलें? कांहीं प्रांतीयांचे चेहरे-मोहरे ओळखतां येतात. उदाहरणार्थ, पंजाबी, शीख, मद्रासी ( चार प्रांत ) बंगाली, कष्मिरी ही मंडळी परंतु मुंबईवाल्याचें तसें नाहीं. का या प्रांतांपैकीं दिसत नाहीं तेव्हां 'मुंबईवाल्याचा' खडा टाकून पाहायला हरकत नाहीं अशी तर याची तर्कपद्धती नाहीं ना?

"आपका दौलतखाना?' मी विचारतों.

"मेरा गरीबखाना स्यालकोट था जो अब पाकिस्तानमें चला गया. फिलहाल मैं ठहरता हूं जलंदर." बिचारा पाकिस्तान-हिंदुस्थानच्या फाळणींत बेवतन झाला आहे.

"आपने हमको बम्बईवाले करके कैसे पहचाना?"

"यूँ ही! मैं कभी कभी बंबई आता हूं. और वहाँसे खंडाला जाया करता हूं एक पारसी दोस्त के साथ."

"आच्छा आच्छा! खंडाळा आप आते हो. शिकार खेलनेके लिये. नाहीं?"

"तुम्ही मराठी आहांत हें पण मी ओळखलं." आतां तर तो मराठी बोलूं लागला. मला एक कल्पना सुचली.

"हे पाहा मि...?"

"जसजीतसिंग."

"मि. जसजीतसिंगजी? एक विचारूं का आपणाला?"

"बेशक."

"आपण 'स्पोर्टस्'च्या सामानाचा व्यवसाय करतां का?"

"अरे! हे कैसं पहचानलं आपन?"

"मी मराठी आहे हें जसं आपण ओळखलं, तसंच?"

माझा खंडाळ्यांतला 'ळ' उच्चार यानें ऐकला आणि माझं मराठीपण अचूक हेरलें. तसें तो पूर्वी स्यालकोटला असल्याचें त्यानें सांगितलें म्हणून, मी पण खडा टाकून पाहिला. तो बरोबर लागू पडला. फाळणीपूर्वी स्यालकोटची पुष्कळशी मंडळी बेताच्या लाकडाचें खेळण्याचें सामान बनविण्याच्या धंद्यांत असत हें मला माहीत होतें.

"अनुभव ही फार मोटी चीज आहे जिंदगींत." आण्णा आतां भाग घेऊं लागले. शिकारी मोठ्या अदबीनें ऐकूं लागला.

" जी हाँ ! अन्नाजी ! "

" या जंगलांत जनावरं तरी कोणतीं मिळतात ? "

" भारी शिकारीच्या हौशीनं मी या जंगलांत येत नाहीं. आपल्या सारखाच 'सीनिक ब्यूटी' बघायला येतों. जानवरं आहेत. रीछ आहे. चित्ता आहे. कांहीं किसमची हरियन आहे. भारल खोकड वगरा वगैरा. पन डाहाण्या शेर, बडा सुव्वर वगैरा भारी जानवरला ही शरदी बरदाष्त नाहीं होत. हत्ती, सिंह तर असणार नाहींत. तुम्हांला माहीतच आहे. "

" म्हणजे आमच्यासारखेच भटकायला आलांत म्हणायचे तुम्हीसुद्धां. "

" अरे आन्नासाब, भटकण्याची पण एक धुंदी आहे. तुमच्यासारख्याला मी काय सांगावं ! तुम्हीच या वयांत बगलेंत थैली लटकावून पहाड चढताय. "

" आतां खंडाळ्याला कधीं येणार ? " मी पृच्छा करतों.

" अरे भैय्या, त्याच्या आधीं आपण जलंदरवरून पास होणार आहांत. तेव्हां माझ्या झुपडीत आलंच पाहिजे तुम्ही दोघांनीं." धूर्तपणानं तो आपल्या निमंत्रणाचा क्रमांक आमच्या अगोदर लावतो. बोलत बोलत आम्ही नदीच्या पुलावर आलेले असतों. बरोबर असलेली पाण्यांतील कांहीं लांकडं एक एका कमानींतून तर दुसरं दुसऱ्या कमानींतून अशीं दूर दूर फेकलीं जातात. आतां तो शिकारी आणि आम्ही यांचे रस्तेसुद्धां असेच निरनिराळे होणार आहेत. जलंदरला उतरण्याचा त्यानं इतका आग्रह केलाय कीं शेवटीं आम्हाला 'हो' म्हणावें लागलेंय. एकमेकांच्या पत्त्यांची देवघेव करून आम्ही निरोप घेतों. पठाणकोटला गाडींत बसल्यावर मुंबई-सेंट्रलपर्यंत वाटेंत कुठें उतरणें शक्य होणार नाहीं. तरी सुद्धां दिवाळीच्या दिवशीं आम्ही कसेबसे मुंबईस पोहोंचणार आहांत.

आतां दुपारचा एक वाजला आहे. खालीं गांवांतच जेवण उरकून एकदम विश्रांतीकरितां मगन्न वर जायचें आम्ही ठरवितों. बेतसिंगाला तसेंच सांगून आलेले असतों.

संध्याकाळीं पुन्हा गांवांत मला यायलाच हवेंय. बसमध्यें आम्हांला जागा राखून ठेवायच्या आहेत उद्यांच्या पठाणकोटच्या. जमल्यास इथली एकादी फळबाग बघायची आहे. सकाळीं हिडिंबेच्या जंगलांत भेटलेल्या बागवानानं येवढं बोलावलें आहे ! जाऊन येऊं.

इथूनहि आम्ही पुष्कळसें पाहिल्याशिवायच निघणार आहांत. रोहटांग

घाटीच्या पायथ्यापर्यंत तरी जाऊन यायला हवें होतें. राहालापर्यंत तर बस जाते आतां. इथें म्हणे अमेरिकेंतील वायुगुहा सारखीं वायुविवरें आहेत. वारा सपाट्यानें आंतून निरनिराळे आवाज करीत बाहेर पडत असतो. या विवरांच्या आंत पोकळी असून विवरांची तोंडे उंचावर कुठें तरी पर्वतांत असलीं पाहिजेत आणि त्या उंचावरील वाऱ्याचा सोसाटा इथून शंखध्वनी करीत बाहेर पडत असावा. कुणी सांगावें ! अमेरिकेंतील वायु-गुहेसारखे चमत्कार इथेंहि असं शकतील. हजारों वर्षें निसर्ग कोरीत असलेले शिल्प इथेंहि आढळून येईल. त्यापेक्षां कदाचित् निराळें असेल. परंतु निसर्ग-चमत्कार नक्की आढळतील. कुणी संशोधन केल्यास अर्थात्.

या मनालीजवळचीं सौंदर्य-स्थळें आमचीं थोडीं का राहिलीं आहेत? परंतु त्यांपैकीं मातबर स्थळें दोन-दोन, तीन-तीन दिवसांच्या सहली आहेत. वसिष्ठ ज्या डोंगरांत आहे त्याच्या थेट माथ्यावर आकर्षक वातावरणांत भृगु तलाव आहे. इथें पोचायलाच दोन दिवस लागतात. परंतु पोहोचल्यावर आल्याचें सार्थक झाल्यासारखें वाटतें म्हणतात. भृगुऋषींच्या वास्तव्यानें पुनीत झालेलें स्थळ कसें तरी असेलच कसें? मनालीच्या वरच्या पाहाडांती अकरा हजार फुटांवरील झिन्नाराणाचा किल्ला सवड असती तर नक्की पाहिला असतात. शतकांपूर्वींच्या राजस्थानी वजणाच्या याच्या दंतकथाहि थकल्या भागल्या प्रवाशाला रिझवितात. या मनालीचा किंचित् वास, सहवास मला चिरकाल साद घालीत राहील.

♣ ♣

## प ठा ण को ट (रिटायरिंग रूम)

*ऑक्टोबर ३०, १९६४*

आज पहाटे पांच वाजतां आमच्यापुढें एक मोठा पेंचप्रसंग उभा राहिला. सामान गाडीतळावर कसें न्यायचें! कांहींच व्यवस्था न करतां मी स्वस्थ राहिलों असें घडलेलें नाहीं. काल संध्याकाळीं दोन हमालांना शक्य तों रात्रीं मुक्कामालाच रेस्ट कॅम्पमध्यें यायचें व न येऊं शकल्यास पहाटें साडेचारला तरी हजर असलें पाहिजे, असें ठरवून बजावून आलों होतो. शिवाय बेतसिंगाच्या ते ओळखीचेसुद्धां आहेत. अखेर बेतसिंगाला स्वतःलाच विचारून पाहायचें, नाहींतर दोन खेपा स्वतः करून आम्हांला सामान नेण्याशिवाय गत्यंतर नाहीं. अशा कष्टसाध्य सोडवणुकीपर्यंत आलों. बेतसिंग स्वतःच आपल्या पोऱ्याच्या मदतीनें सामान नेण्याचें मान्य करतो. दोन खेपांत तरी आम्ही पुरें सामान नेऊं शकूं किंवा कसें हा विचार करीत राहाण्याची आतां जरूरी उरली नव्हती.

बेतसिंगानें दाखविलेल्या माणुसकीबद्दल त्याला त्याच्या अपेक्षेबाहेर फळ मिळतें आणि गेले दोन्ही दिवस त्यानें केली त्यापेक्षां जास्त चांगली सेवा त्याला करतां आली नाहीं म्हणून तो हळहळ व्यक्त करतो. चांगला व्यवहारी आणि संस्कारी मनुष्य आहे.

पंधरा मिनिटें गाडी तळावर आम्ही आधींच पोहोंचतो. पंधरा मिनिटें बस उशीरा सुटते. म्हणजे आमचा त्या जळक्या बाजाराचें कळकट स्वरूप पाहात ताटकळत घालवण्याचा एकूण काळ अर्धा तास होतो.

“ आपण कुठून आलांत ? ” महाराष्ट्रापासून दीड हजार मैलांवर शुद्ध मराठींत हें कोण विचारीत आहे ? भल्या पहाटं आणि या कडाक्याच्या थंडीत आमच्या-सारखेच दुसरेहि कांहीं भटक्ये महाराष्ट्रांतून आले आहेत काय ?

" मुंबईहून. आपण ?"– माझं उत्तर नि प्रतिप्रश्न.

" आम्हीहि मुंबईचेच. हे श्री. माळी आणि मी चांदेकर."

" नमस्कार, नमस्कार ! वा वा !" मी आमचीं नांवें सांगितलीं.

" नमस्कार, नमस्कार ! वा वा !"

" आमच्यासारखेच भटकायला, का काम होतं कांहीं इकडे ?"

" म्हणजे भटकायचंच काम होतं. आमच्या कॉलेजची गिर्यारोहकांची तुकडी घेऊन आलों होतों आम्ही इथल्या गिर्यारोहण संस्थेंत."

" प्रशिक्षणासाठीं ?"

" होय."

" मग कुठपर्यंत मजल मारलीत ?"

" देओ तिब्बा गांठलं कीं आम्ही !"

" म्हणजे किती फूट हो ?"

" एकोणीस हजार."

" विद्यार्थीपण चढले तिथपर्यंत ?"

" काहीं चढले, सगळे नाहीं."

" बरं पण तुमचे विद्यार्थी कुठं आहेत ?"

" दोन दिवसांनीं मागाहून येतील. आम्हांला जरा घाई आहे."

" बरं झालं भेटलांत. गाडींत वेळ तरी चांगला जाईल."

कट्राँए, कुलू, भुंतर आणि औट ! पुन्हा तींच ठिकाणं ! सकाळीं चहा नीट-पणें जमला नव्हता. इथें औटला बरा आहे. मुंबईस जायला आम्ही उत्सुक आहोंत–तरी कुलु खोरें सोडतांना मन थोडेंसें तरी भारावते आहे. लहानपणीं आपल्या मावशीकडून आपल्या घरीं आपल्या आईकडे परततांना वाटत होतें तसें कांहीं तरी. भुंतरला गाडी आल्यावर पार्वतीखोऱ्याकडे साहजिक नजर जाते. मणिकरण डोळ्यांपुढें तरळूं लागते. मंडीला गाडी पोचते. आतां निसर्गाचें रौद्र तांडव संपलेलें असतें.

मंडीला मी चपळाई करून पन्डो-पठाणकोट गाडींत जागा मिळवितों. हेतू असा कीं जोगिंदरनगरला उतरून बारोटला जाऊन येतां आल्यास पाहावें. मुंबईची आमची गाडी उद्यां संध्याकाळपर्यंत पठाणकोटला गांठायची आहे. परंतु

हे मनोरथ तसेंच मनांत राहातात. लवकर पोहोंचूं म्हणून जी गाडी पकडतो ती 'रथ' निघते. मराठी मंडळींची सोबत आम्ही गमाविलेली असते.

जोगिंदरनगरला गाडी थांबते. तिथें सगळीं वेळापत्रकें मी जमवून बघतो. परंतु भरंवसा येईना, उद्यां पठाणकोटला वेळेवर पोचेन असा, पालनपूरला आल्यावर तसेंच डलहौसीच्या फाट्यावर गाडी आल्यावर तोच हिशोब मी करतों. तोहि जमत नाहीं.

आणखी तीनचार दिवस फुरसत असती तर? तर काय झालें असतें? आणखी एक दोन ठिकाणें पाहून झालीं असतीं. तरी पण आणखी कित्येक राहिलींच असती.

शेवटीं काळोख पडल्यावर पठाणकोटला गाडी पोहोचते. आतां उद्यां संध्याकाळीं गाडींत बसेपर्यंत आराम आहे.

माझा एक बूट गाडींतून कुठें तरी पडला. दुसरा शाबूत आहे. आतां मुंबईच्या आमच्या मामा कांबळेनें दुसऱ्या पायाचा एकच बनवून दिला तर याचा उपयोग! तोंपर्यंत वाहाणा आहेतच.

इथें आल्यावर माळी आणि चांदेकर कुठें दिसलेच नाहींत. वाटेंत मंडीला त्यांची सोबत सोडून पन्डोहच्या गाडींत 'हुशारी' करून जागा मिळविली. परंतु ज्या उद्देशानें ती मिळविली तो साधला नाहीं, ही गोष्ट ते भेटले असते तर त्यांस सांगतां आली असती. त्यांचा संभाव्य गैरसमज काढतां आला असता. ते मनांत म्हणत असतील, मंडीपर्यंत गप्पा हाणीत आलेली ही मंडळी दुसऱ्या गाडींत जागा पटकावून एकदम निघून जातात हें आहे तरी काय? पन्डोहच्या गाडींत जागा मिळाल्यावर हात वर करण्यापेक्षां आणखी सविस्तरपणें त्यांचा निरोप घेतां आलाच नव्हता.

आमच्यापेक्षां त्यांचीच गाडी अनपेक्षितपणें लवकर पोहोचून मुंबई गाडी तर त्यांनीं गांठली नसेल?

आज शेवटले चार तास आमचे अनपेक्षितपणें अत्यंत बेचैनींत गेले. दुपारीं 'ट्रिब्यून' दैनिकांत एक लहानशी दोन ओळींची चार दिवसांपूर्वीची मुंबईहून आलेली बातमी वाचली. 'ऑपेरा हाऊस जवळच्या औद्योगिक वस्तींत भयंकर आग लागून अंदाजे ××× नुकसान झालें.' आण्णांच्या राहात्या जागेला हें

वर्णन लागूं पडत होतें. घरांत वहिनी (आण्णांच्या वृद्ध पत्नी) आणि मुलगे-नातसा पुतण्या. काय झालें असेल कुणाला ठाऊक!

पठाणकोटला आल्यावर ही हुरहुर थांबली. माझ्या मुलाचें दोन दिवसांपूर्वीची तारीख असलेलें पत्र मिळालें. त्याच्यांत आण्णांच्या घरची खुशाली होती. पत्र आगीच्या दुसऱ्या दिवशी लिहिलेलें होतें. म्हणजे आगीचा संबंध आण्णा राहत असलेल्या वाडीशीं नव्हता, असा निष्कर्ष आम्ही काढला. तरीसुद्धां कांहीं वेळ ओढून ताणून शक्याशक्यतेचे विचार आण्णांना बेचैन करीतच राहिले. शेवटीं 'टेलिफोन करूं या' म्हणून मी सुचविलें तेव्हां नको म्हणून ते थोडेसे निश्चिंत झाले.

आज 'वातानुकूल विश्रामालय' घ्यावें लागलेंय. परंतु त्याचें 'वातानुकूल' यंत्र बिघडलेलें आहे. या हवेंत त्याची जरूरहि नाहीं. आणि जरूरी नसतांना, यंत्र बिघडलेलें असतांना दुप्पट भाडें पडलें आहे एवढेंच बिघडलें आहे.

♣ ♣

## फं टि अ र मे ल ( परततांना )

*ऑक्टोबर ३१, १९६४*

" **पठाणकोटला** गेला सबंध दिवस आपण जवळजवळ लहान मुलासारखा उंडारण्यांत घालविला." —आण्णा.

" आतां साऱ्या विवंचना संपल्या आहेत. डोक्याला कसला ताप नाहीं आहे. दिवसा उजेडीं पोहोचूं किंवा नाहीं, उतरायला जागा कशी मिळेल, पुढला मुक्काम कसा आंखायचा यांपैकीं कांहीं कांहीं आतां शिल्लक नाहीं. सहल संपलेलीच आहे आतां. मुंबई गांठायला काय चाळीस तास आतां लागतील तेव्हढेच !" —मी.

" खरी उंडारण्याला सुरुवात झाली एअर कन्डिशन्ड रिटायरिंग रूमपासून."

" आतां तें 'वातानुकूल विश्रामालय' आपण जें घेतलं तें काय चैन करायची म्हणून ? दुसरी साधी खोली रिकामीच नव्हती. आणि 'प्रतीक्षालयांत' कशी खेचाखेंच होती तें आपण बघितलंच. मग हा एक दिवस, थोड्या आरामांत आणि निर्वेधपणं घालवायचा म्हटला तर दुसरा इलाज काय होता ?"

" आहो, पण त्याचं समर्थन कशाला करताय तुम्ही ? उलट मी म्हणतोंय झालं तें बरंच झालं. तें घेतल्यापासून आपला नूरच पालटला. शिवाय मुंबईस पोचेपर्यंत आपला खर्च अंदाजाच्या बाहेर होणार नाहीं असं तुम्ही म्हणताय ना ?"

" तें तर खरंच आहे. पण आपला खरा नूर पालटला 'देशी घी' मधली न्याहारी सकाळीं आपण गांवांत जाऊन घेतली तेव्हांपासून. काय झक्क बेत जमलाय पण ! नाहीं तरी रेल्वे कॅन्टीन्स नि टूरिस्ट कॅन्टीस मधल्या तोच तोचपणाचा अगदी वीट आला होता नाहीं ?"

" वा ! जेवणाचा सुद्धां बेत अगदीं छान जमला. परंतु रस्त्यावर बाकड्यावर बसून न्याहारी करणं चमत्कारिक वाटतं. संकोच वाटतो. "

" संकोच वाटतो खरा ! परंतु सगळेच तसं करीत असतात. अहो, या पंजाबांतल्या मोठमोठ्या शहरांत 'माल' म्हणून जें मोक्याचं ठिकाण असतं तिथं तर संध्याकाळीं हा खाण्याचा कार्यक्रम सहकुटुंब सहपरिवार चालतो. त्यानंतर हात धुणं नि मग इतर विधी रस्त्याच्या कडेला उरकणं यांतसुद्धां कुणाला कांहीं गैर वाटत नाहीं. तशी इकडील मंडळी टापटिप्रीबद्दल फारशी प्रसिद्ध नाहींच आहेत. "

" तरीसुद्धां तगडीं जवान माणसं पाहिलीं कीं बरं वाटतं. तुस्त असतो एक एक जण ! समृद्ध प्रांत आहे. "

" प्रांत समृद्ध तर आहेच. पण मेहनतीसुद्धां आहेत माणसं. अलिकडे इकडच्या खेड्यापाड्यांतून न्याहाल झाले आहेत. परदेशी पाव्हण्यांना हीं चंदीगडकडचीं खेडीं सुधारलेलीं म्हणून मुद्दाम दाखवितात. "

" सुधारलेली शेती, लघुउद्योग यांत पंजाब आघाडीवर आहे. दक्षिणेकडील प्रांतांनी हेवा करण्यासारखा मुलख आहे हा. शिवाय सरहद्दीवरचा आणि लष्कराची मदार ज्याच्यावर आहे असा हा प्रांत ! "

" तर हो ! या भांडवलावर तर इथल्या पुढाऱ्यांचे दिल्लीला लाड चालतात. "

" जरा भाईसाब वो पानी का लोटा उपर दे दीजिये. " एक पंडितजींची फर्माईश. आतांपर्यंत हे वरच्या बर्थवर आपल्या घरून आणलेला डबा आमच्याकडे पाठ करून संपवीत होते. पाणी पिऊन ढेकर देत स्वारी खालीं उतरते नि आमच्या गप्पांत सामील होते. मूळ डलहौसीचे राहणारे हे पंडित रेल्वेंत नोकर आहेत. साडेतीनशेंच्यावर पगार असल्यामुळें यांना पहिल्या वर्गाचा पास असतो. यांनीं एकदां मुंबई पाहिलेली असते.

" एवढा खर्च करून आलांत तसे आमचं डलहौसी तरी बघायचं होतं. धौलाधर मालिकेंतील हें ठिकाण म्हणजे हिमालयाचें प्रवेशद्वार समजलं जातं. "

" डलहौसीबद्दल ऐकलंय आम्हीसुद्धां. पण असं बघा, तीन आठवडे आम्हांला सवड होती. यांत काय काय म्हणून बघायचं ? थोडसंच पाहतां येतं आणि पुष्कळसं राहातं हा नेहमींचाच अनुभव आहे. तुम्हीं मुंबईला आला होतात ना ? काय काय पाहिलं सांगा बघूं ! "

" अरे भाईसाब ! एक हसा मुंबईला होतों ना ! मुंबई बहोत बघितली. लक्झुरी बसमधून हिंडलों. एलफंन्टा बघितलं, सचिवालय, मेट्रो बघितलं, दर्यांत नौकाविहार केला. "

" एक आठवडा होता म्हणतां ? म्हणजे पुष्कळच पाहिलं असणार. "

" मुंबईसारख्या शहरांत पाहण्यालायक जशा पुष्कळ गोष्टी आहेत तशाच झुपडपट्टीसारख्या समजण्यालायक पण पुष्कळ समस्या आहेत. "

" वाहवा ! खरे भटक्ये दिसतां आपण ! "

" अरे भाईसाब ! मघाचपासून आपल्या गोष्टी ऐकतोय मी. म्हटलं गप्पा मारण्यालायक मंडळी दिसताहेत. म्हणून तर खालीं येऊन बसलोंय. पुष्कळ फिरणं झालंय नाहीं म्हटलं तरी माझं. रेलवेचा फुकट पास असल्यामुळं हा शौक परवडतो आम्हांला. "

" छान छान ! समानशील मनुष्य भेटला कीं बरं वाटतं. "

" तर मी काय म्हणत होतों कीं डलहौसीला आपण आवश्य यावं एकदां. पंडित नेहरूंना फार आवडायचं आमचं हें पांच टेकड्यांवरचं गांव. "

" पांच टेकड्या आहेत काय ? आणि हवा ? "

" अरे तीच तर सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट. उत्तम हवेमुळं इथं प्रथम आरोग्यधाम १८५१ सालीं साहेबानं बांधलं. मग शहर वाढलं. एक दिवस येऊन बघून जाण्यासारखं आमचं गांव नव्हेच. सबंध सुट्टी इथं घालवायला पाहिजे. सिमल्याइतकी महागाई नाहीं. आपण जरूर या एकदां. माझी झुपडी आहे स्वतःची. मला फार आनंद वाटेल आपण तिचा लाभ घेतलांत तर. हा माझा दिल्लीचा पत्ता."

" तुमच्या दिलावरपणानं तुम्ही तर आम्हाला गुदमरून टाकलं ! "

" आपल्याला या गोष्टीची कदर आहे म्हणून तर एवढा उत्साह वाटतो. आणि याल ते आपला परिवार घेऊन या. बालबच्च्यांच्या सुखाकरतां तर आपण मेहनत करतां. खरं का नाहीं ? "

" खरं आहे. आम्ही जरूर लक्षांत ठेवूं पुढल्या वर्षी."

" जें जें पाहिलं आहे तुम्हीं तें तुमच्या आपोआप लक्षांत राहातंच. परंतु न पाहिलेल्या ठिकाणांच्या यादींत आमचं डलहौसी पहिलं धरा, म्हणजे याल तुम्ही."

" आपण युक्ती बरोबर सांगितलीत. न पाहिलेलीं ठिकाणंच जास्त लक्षांत राहातात. दुष्प्राप्य वस्तूबद्दलच जास्त कौतुक असतं. हा आमचा पत्ताहि घेऊन ठेवा. जरूर पडल्यास संकोच करूं नका."

आतां जलंदर जक्शन आलं आहे. जसजीतसिंगाची मला आठवण येते. प्रवासांतल्या ओळखी-विशेषतः समशौकिनांच्या-किती आल्हाददायक असल्या तरी त्या टिकूं शकत नाहींत. या पंडिताची म्हणून कशी टिकणार आहे !

♣ ♣

फ्रं टी अ र मे ल (परततांना)

नोव्हेंबर १, १९६४

आजचा प्रवासाचा शेवटचा दिवस. उद्यां आम्हीं मुंबईला पोचतों आहोंत. गेलो थेट आणि आतां परतत आहोंत ते सुद्धां थेटच. दहाबारा दिवस सहज भटकतां आलें असतें. न पाहिलेली आणि पाहाण्यासारखी अशा स्थळांना काय तोटा होता. कोस्ट्यास निदान पंडिताकडे तरी जायला हवें होतें.

कशाकरितां म्हणून आम्ही या सहलीला गेलो होतो ? आणि पूर्वींसुद्धां मी भटकलों आहे तो कशासाठीं ? सभा, संमेलन अगर परिषदेसारखे सार्वजनिक निमित्त नाहीं. व्यक्तिगत अगर स्वतःच्या पेशाबाबतहि काम नव्हतें. मग कां गेलों होतां ? श्रीमान् लोक, कांहीं हौशी श्रीमंताचा अपवाद वगळतां, केवळ आपल्या रेकॉर्डला असावा प्रवास म्हणून जातात, तसे आम्हीं गेलों होतो ? मिरविण्या-साठीं ? आमच्या पदरांत काय पडलें होतें ? याचें व्यावहारिक उत्तर शून्य, असें आहे. सहज न परवडण्याऱ्या आमच्या सारख्यांचे कांहीं शेकडें खर्चच झालेले होते. पैसे नव्हते तेव्हांहि हा शौक करीत होतो ना !

कवि कविता कां करतो ? चित्रकार चित्रें कां काढतो ? गायक कां गातो ? किंवा नर्तक कां नाचतो ? या चालीवर याचें उत्तर प्रतिप्रश्नांनीं देतां येण्यासारखें नाहीं. तशी अष्टौप्रहर करण्याची ही साधना नाहीं. जात तीच. पण प्रकार निराळा. हा एक जीवन समृद्ध करणारा शौक आहे. ज्याला तो नसतो ते त्याला आंबट शौक म्हणतात. आम्हांला तो गोड वाटतो. त्यांत होणारे हाल शरिराला बोचत नाहींत. होणारी फजिती-परिस्थितीनें निर्माण केलेली-मनाला टोचत नाहीं. पदरीं पडणाऱ्या निराशेनें मन खचत नाहीं. पैशांची अडचण, जागेची अडचण, तिकिटांची अडचण, खाण्यापिण्याची अडचण या सगळ्यांवर उत्साह मात

करतो. आतां आम्ही परत चालवों आहोंत. रिकामे नाहीं जात आहोंत. कित्येक दिवस, कित्येक महिने पुरेल इतका उत्साह, उल्हास छातींत भरून घेऊन चाललों आहोंत. जीवन आणखी समृद्ध झालें आहे अशी धारणा आहे.

प्रवास हा एक छंद आहे. हौस आहे. मन आणि बुद्धी विशाल करणारी निर्मळ हौस आहे. शिकारी, शिकारीसाठीं रानावनांत भटकतो. जिवाचे हालहाल करून घेतो. म्हणून का त्याचा शिकारीचा शौक हा आंबट शौक म्हणायचा ? त्याला मिळणारा शिकारीचा आनंद उत्कट नि उच्च प्रतीचा असतो. म्हणून त्याला कोण काय म्हणतो याची पर्वा नसते. दिसेल त्या जनावराला गोळी घालीत नाहीं तो. अनुभवी शिकारी अविचारी नसतो. विवेकाविवेक तो चांगला पाळतो. उपद्रवी जनावरें तो मारतो. जनावरांच्या बाबतींत त्याचें मन हळवें बनलेलें असतें. रानांतल्या प्राण्यांच्या जगाची त्याला चांगली माहिती असते. म्हणून त्याचा आनंद उच्च प्रतीचा म्हणायचा.

प्रवासांत कांहीं व्यक्ती आपल्या मनावर कायमचे ठसे उमटवितात. मनुष्यस्वभावाचें आपलें ज्ञान वाढतें. भेटणारी कांहीं सत्प्रवृत्त असतात. कांही दुष्प्रवृत्त. धालपूर मैदानांत भेटलेली बुढीमा, मणिकरणच्या वाटेवरचा लालाजी आणि खुद्द बाबा नारायण हरी यांना एकदां भेटल्यानंतर कुणी विसरूं शकेल काय ? कांहीं इरसाल नमुनेहि लक्षांत राहातात. रामदास स्वामींनी म्हटलें आहे—

कुग्रामें अथवा नगरें । पहावीं घरांचीं घरें ॥
भिक्षामिषें लहान थोरें । परीक्षूनि सोडावीं ॥

♣ ♣

मुं ब ई ( आमची खोली )

*धनत्रयोदशी, ऑक्टोबर २, १९६४*

**आज** सकाळीं नऊ वाजतां फ्रंटीयर मेल मुंबई सेंट्रलला फलाटावर लागली. फलाट माणसांनीं नुसता फुलून गेला होता. गर्दीचा डोंब उसळला होता. क्वचित् ओळखीचे चेहेरे दिसूं लागले. म्हणजे ही गर्दी आमच्या स्वागतार्थ होती ? नाहीं नाहीं ! आम्ही नेमके कोणत्या दिवशीं येणार आहोंत हें कुणाला कळविलेंच नव्हतें. आणि कळविलें असतें तर ? कुणी तरी सामान उतरून घ्यायला आलें असतें कदाचित ! बस्स ! वीस दिवस नि एकवीस तासांची आमची ही यात्रा आज संपली.

मनुष्य प्राणी हा कळप करून राहाणारा प्राणी आहे असें लहानपणापासून मी वाचीत आलों आहे. तसाच मनुष्यप्राणी हा–विशेषतः यांतला नर–भटक्या आहे असें, खरोखर तसें असतांना, कुठेंच कसें आढळत नाहीं ? मी कांहीं मानववंशशास्त्रवेत्ता नाहीं. तरी सुद्धां मोठे लोक भटकतात एवढें तरी सर्वांना मान्य व्हावें. नाहीं तर अनादिकालापासून माणसानें भटकण्याचा पराकोटीचा शौक एवढ्या आस्थापूर्वक केला असता कशाला ? ज्याच्या जवळ कांहीं आहे किंवा ज्याला कांहीं मिळवायचें आहे तो भटकायला बाहेर पडलाच म्हणून समजावें. मग तें ‘ कांहीं ’ एकादी इल्म असो, पराक्रम असो, तत्त्वज्ञान असो, पांडित्य असो, हौस-छंद कला असो, संदेश असो किंवा आणखी कसला माल असो.

आर्य पामीर पटारावरून निघाले ते आपली वैदिक संस्कृति घेऊन. त्यांतला अगस्ती तर पार कन्याकुमारीपर्यंत पोहोंचला. पहिला मोठा प्रातिनिधिक भटक्या प्रभू रामचंद्र, कांहीं तरी निमित्त ( आतां तें वाजवी असेल सुद्धां ! ) मिळतांच स्वारी निघाली चौदा वर्षांच्या भटकंतीला ! सहकुटुंब सहपरिवार ! आणि त्याच्या हातून पराक्रम घडले.

दुसरा प्रातिनिधिक गट पांडवांचा. हेंहि कुटुंब कबिला घेऊन निघालेले भटक्ये.

द्यूतांत म्हणे हरले हे आणि म्हणून देशोधडीला लागले. अरे ! जुगारांत हरले तर दिवाळें काढायचें होतें ! फार प्रामाणिक असाल तर कोरडें दिवाळें काढावें. ओलें राखून काढूं नये ! पण नाहीं. देशोधडीला जाण्याची हौसच यांना. म्हणून पंधराशें मैलांचा हिमालय पूर्व-पश्चिम भटकले. भीमाची एक राणी हिडिंबा ही कुलू खोऱ्याची सगळ्यांत मोठी देवता बनून राहिली आहे. आणि मध्यम पांडवाची एक राणी उलूपी ही पूर्वेकडील कामरूपांतील ऐतिहासिक पुरुष बभ्रुवाहन याची मातृदेवता आहे.

याच्याहि अलिकडले शंकराचार्य. हा नंबुद्री ब्राह्मण आपलें 'म्हणणें' आटोपल्यावर जो निघालाय तो साऱ्या भारतभर फिरला. चौदिशांस यानें मठ स्थापन केले. आणि हिमालयांत अदृश्य झाला. त्यानंतरच्या सगळ्या संतांना सुद्धां हाच एक छंद ! भटकण्याचा. नामदेवाचे अभंग तर पंजाबांतल्या ग्रंथ साहेबांत समाविष्ट केलेले आहेत.

रामदास ! स्वतः तर भारतभर भटकलेच, आपल्या शिष्यांना भटकायला लावलें, शिवाय भिक्षेच्या मिषानें भटकण्याचा ठायींठायीं उपदेशहि करून ठेवला आहे.

अगदीं आतांचा, आजचा सुप्रसिद्ध भटक्या म्हणजे विनोबा. भूदानाचा संदेश देत देत कष्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत बारा वर्षे नि तेरा महिन्यांत पंच्चावन्न हजार मैल भटकला.

भटक्यांची आणखी एक जमात आहे. मंत्री आणि पुढाऱ्यांची. परंतु ही श्रेणीच वेगळी. ही हौशी भटक्यांची जमात नव्हे. धंदेवाईक. शिवाय यांची पद्धतहि उलटी आहे. मोठे होण्याकरतां हे भटकत नाहींत. आधीं हे पदसिद्ध मोठे होतात आणि मग दुसऱ्याच्या खर्चानें भटकतात. खर्च दुसऱ्याचा असल्यामुळें यांचें भटकणें अंधांतरीं असते. यांच्या मैलांची कसली गिनती करायची !

मूळ मुद्दा असा कीं, सगळीं मोठीं माणसें खूप भटकतात. मी सुद्धां खूप भटकतों (माझा तसा समज आहे !) आतां फक्त मी मोठा मनुष्य व्हायचें तेव्हढें शिल्लक राहिलें आहे. आणि तरीहि नाहींच झालों मोठा तर बघेन बघेन नि एक दिवस बारा नाहीं तर चौदा वर्षे भटकण्याचा संकल्प सोडीन ! सोडणार नाहीं !

♣ ♣

# मार्गदर्शनार्थ परिशिष्टें

## परिशिष्ट 'अ': कश्मीर

**कमींत** कमी वेळांत जास्तींत जास्त स्थळें पाहाण्याची धडपड प्रत्येक प्रवासी करीत असतो. तशी ती योजनापूर्वक करतां यावी म्हणून हीं परिशिष्टें.

मुंबई कलकत्याहून जाणाऱ्या माणसास तीन दिवस श्रीनगरला पोहोंचावयास व तीन दिवस परतावयास लागतात. म्हणजे दोन आठवड्याच्या फुरसतीनें जाणाऱ्या प्रवाशास श्रीनगरला गेल्यावर सात-आठ दिवस तिथं मिळतात.

**सहल एक दिवसाची :** सकाळीं झेलम नदीच्या धरणापर्यंतची अमीराकदल या पहिल्या पुलापासून सात पुलाची सफर. शिकाऱ्यानें जातांना रघुनाथजी मंदिर, एकादी सिल्क फॅक्टरी अगर दुकान, हमदान मसजीद, कालीमाता, पथ्थर मसजीद वगैरे स्थलांस भेट.

दुपारीं विश्रांतीनंतर शंकराचार्य (तक्त-ई-सुलेमान) टेकडी चढून शिवमंदिर पाहून झाल्यावर श्रीनगरच्या शहराचे व आसमंताचे संपूर्ण व प्रसन्न दर्शन.

**सहल दोन दिवसांची :** सकाळीं बसनें **पहलगांव**कडे कूच. जातांना, पांपूर (केशराची शेती), अवंतीपूर, अनंतनाग, कोकरनाग, मार्तंड या ठिकाणीं पाहाण्याकरतां ही बस थांबते. सायंकाळीं सवडीप्रमाणे व उत्साहानुसार पहलगांवच्या आसमंतात दोन अडीच मैलाचा फेरफटका. दुसरे दिवशींकरितां जरूर तर घोडे ठरविणें. पहलगांव, उंची ६२०० फूट.

दुसरे दिवशीं सकाळींच **चंदनवाडी**कडे कूच. चंदनवाडी अंतर ८ मैल. उंची ९५०० फूट. चंदनवाडीस भोजन. बर्फाचा पूल खास आकर्षण.

**सहल एक दिवसाची :** हा रविवार असावा. रविवारी मुघल बगीच्यांतून पाणी सोडलेले व दिव्याची रोषणाई असते. शिकाऱ्यानें, टांग्यानें अगर बसनें शालीमार, निषात, चश्मशाही, नेहरूपार्क आदि बगीचे पाहाणें. सकाळीं लवकर निघाल्यास जेवण बरोबर घेणें इष्ट.

**सहल एक दिवसाची :** सकाळीं बसने गुलबर्ग-फुलांचे मैदान-कुरण-कडे प्रयाण. बसेने. अंतर २४ मैल. बस टंगमर्ग पर्यंत २० मैल जाते. पुढें ४ मैल पायी अगर घोड्यावरून. भोजनोत्तर गेल्यास लगोलग गुलमर्गच्या पुढें साडेतीन मैल खिलन मर्ग (मेंढ पाळांचे कुरण) उंची ९७०० फूट. नंगा पर्वत, हरमुख या सर्वोच्च शिखरांचे व संपूर्ण कश्मीर खोऱ्याचे विहंगम दर्शन.

गुल्मर्गला भोजन उरकून टंगमर्ग व बसने संध्याकाळीं श्रीनगरला परत.

**सहल एक दिवसाची :** बसने वुलर सरोवराची सफर. वाटेंत बस गांधरबल, क्षीरभवानी, मानसबल, वुलर, बांदीपूर, वलतब, शोपूर, बारामुला व शहीद स्मारक इथें पाहाण्यासाठीं जरूरीप्रमाणे थांबते.

**सहल एक दिवसाची :** बसने सोनमर्ग व जवळील टेकड्यांत हिमनदी पाहावी.

आठवा दिवस एम्पोरियम सेंट्रल मार्केट वगैरे स्थानांस भेटी देऊन खरेदी करण्यांत सहज जातो. सर्व बसेसची तिकिटें आदल्या दिवशींच राखून ठेवावी.

आठ दिवसांपेक्षां आणखी सवड असल्यास वरील सहली वाढवून आणखी प्रेक्षणीय व दुर्गम स्थळांना भेटी देता येतील. त्यापैकीं महत्त्वाच्या कांहीं खालीलप्रमाणें.

पहलगांवहून चंदनवाडीला गेल्यावर पुढें वीस मैलावर अमरनाथ गुहा आहे. पिसूघाटी, शिशनाग-बावजन, महागुण घाटी ( उंची १४७०० फूट ) पंचतर्णी व अमरनाथ. यास दोन दिवस आणखी लागतील.

पहलगांवहून आरू, लिद्दरवत व कोलाहोई ग्लेशर्स ( सर्वोत्कृष्ट हिमनदी ). पुऱ्या तीन दिवसाची सफर आहे.

गुलमर्गला गेल्यावर एक दिवसाच्या सवडीनें खिलामर्गच्या पुढें साडेसात मैलांवर अलापत्तरला सुवासिक मधुर पाण्याचे हिमखंड तरंगत असलेले ( प्रखर उन्हाळ्याचे चार महिने सोडून ) फ्रॉझन लेक ( उंची १४५०० फूट ) पाहावें. आणखी एकाद दिवसाची सवड असल्यास गुलमर्गचीच राणी मंदिरासारखी ठिकाणें संध्याकाळीं बाबमऋषी अगर निंगल नाल्याची सफर करावी.

श्रीनगरला एकसंध तीनचार दिवस राहतां आल्यास मुक्काम स्वच्छ पाण्यांतील नौकागृहांत ठेवण्याचा योग जमवून आणावा. या जलमंदिरांत राहण्याचा अनुभव आगळा असतो.

## परिशिष्ट ‘ब’ : कांगडा

काश्मीराहून अगर कुलूहून परततांना ( अगर कुलूला जातांना सुद्धां ) चार दिवसांची सवड असणारास खालील कांगडा जिल्ह्यांतील सहली उरकतां येतील. पठाणकोटहून येणाऱ्या रेलवेचे टोंक जोगिंदरनगर. हें ठिकाण याकरतां सोईस्कर पडेल. ( वीज-कंपनी, पी. डब्ल्यू. डी. आराम घरें व हॉटेल्स आहेत.)

**सहल एक दिवसाची :** लहानशा वीजगाडींतून वीज-घराच्या जलाशयाकडे जाणें हा थरारक अनुभव आहे. आठ हजार फूट उंच पर्वताचा उभा कडा चढून जायचे असते गाडीला. वर आराम-घर आहे.

**सहल दोन दिवसांची :** बसनें जाऊन धरमशाळा ( कांगडा जिल्ह्याची उंचावरील राजधानी ) पालमपूर ( हवेशीर शहर ) व कांगडा ( पुरातन देवळें ) हीं तीन प्रमुख ठिकाणें पाहातां येतील. जीपगाडी मिळाल्यास ज्वालामुखी ( जळता वायू असलेल्या मंदिराबद्दल प्रसिद्ध ) व नधौंसारखी आडवाटेची आकर्षक स्थळेंहि पाहता येतील.

जोगिंदरनगरहून कुलूला जाणें असल्यास तट्टे-खेचरांची व्यवस्था झाल्यास भुभू खिंडींतून ( कुलू बेचाळीस मैल ) व दुलची खिंडींतून ( कुलू ८४ मैल ) डोंगर रस्त्यानें शौकिनानें जाण्यासारखें आहे.

## परिशिष्ट 'क' : कुलू विभाग १ (मुक्काम कुलू उंची फूट४०००)

या विभागांत कश्मीरप्रमाणें सहलीची साधनें हुकमी मिळत नाहींत. आधींपासून तरतूद करावी. तरीहि जरूरीप्रमाणें स्वतःच्या पाया-खांद्यावरच भरिभार टाकण्याची वेळ आल्यास तयारी असावी. उतरावयास पर्यटण खात्याचे बंगले, ब्लॉक्स, खोल्या असतात. शिवाय सरकारी डाक बंगला, आराम-घरें आहेत.

**सहल दोन दिवसांची : मणीकरण तीर्थ :** राहाण्याची सोय-तीर्थावर मोफत. बाबाकडे. टूरिस्ट हट पण आहे. सहा मैल भुंतरपर्यंत बस, तिथून जारी पर्यंत १२ मैल डोंगरी बस. जेवण जारीला उरकून पुढचें आठ मैल सध्यां पायींच जावें लागते. कांहीं वर्षांतच थेट मणिकरणपर्यंत बस जाईल, रात्रौ मुक्काम मणिकरणला. उंची ५७०० फूट. दुसरें दिवशीं परत कुलूला.

आणखी दोन दिवसांची सवड काढल्यास मणिकरणच्या पुढें आठ मैलांवर पुलगन ( उंची ७००० फूट ) येथें मुक्काम करून आणि पुढें सहा मैलांवरील क्षीरगंगेला मणिकरणसारखे गरम झरे पाहातां येतील.

**सहल एक दिवसाची : नग्गर :** कुलूपासून १२ मैलांवर मोठ्या सडकेवर कट्राएं ( उंची ४८०० ) पर्यंत बस. झुलता पूल ( व्यासवरील ) ओलांडून नग्गरला पोचेपर्यंत एक हजार फूट चढावे लागतात. जुन्या राजवाड्याचे विश्रांतीधाम बनविलेलें आहे. जुनी देवळें व अप्रतीम वनश्रीसाठीं प्रसिद्ध.

( ग्रं. क्र.) १६४० 



शक्य असल्यास आणखी दोन दिवसांची सवड काढून पायवाटेनें नग्गरच्या मागची कडी ओलांडून चंद्रखणीचे ' इस्से जादा ' सृष्टिवैभव अनुभवावे व त्या खालीं असलेल्या संपूर्ण ग्रामस्वराज्य अनुभवीत असलेल्या मालन खेड्याला भेट द्यावी.

**सहल दोन दिवसाची : विजली महादेव :** कुलूच्या समोरील डोंगरावर या बिजली महादेवाचें स्थान आहे. याच्या प्राकारांतील लोखंडी खांबावर वीज पडली कीं हें शिवलिंग फुटतें. तें सत्तूच्या पीठानें पुन्हां जोडतात.

**सहल एक दिवसाची : कैसधार :** सिव्हिल रेस्टहाऊसच्या मागील डोंगरापलीकडे. १० मैलांवर. अप्रतिम वनश्री. आरामघर आहे. दूधदुभतें मिळतें.

## कुलू विभाग २ (मुक्काम मनाली उंची ६००० फूट)

कुलूपासून २३ मैल. राहावयास टूरिस्ट बंगले, हट्स् वगैरे आहेत. शक्यतों कुलूहून यांत राहण्याची परवानगी आणावी. हॉटेलसहि आहेत.

**सहली एक दिवसाच्या :** (१) कोटी-राहाला : राहालाच्या बसनें निघून साडेसात मैलावरील कोटीला उतरावें. उंची ८५०० फूट. तिथून राहाल्यास दोन मैल चालत जावें. वाटेंत वनश्री, अनेक भुयारांची मुखें आणि राहाला धबधबा पाहाण्यासारखा आहे. (२) येथून रोहटांग खिंड लागते. जीप आतां वरपर्यंत जाते; परंतु ती सार्वजनिक वाहातूक नव्हे. वर जाणें असल्यास (सुमारें चार हजार फूट) पायीं जाऊन येण्यास आणखी एक दिवसाची सवड हवी. अंतर १०॥ मैल आहे. लहौल भागांतील अप्रतीम सृष्टी सौंदर्य वाटेंत बघावयास मिळते. (३) सकाळीं उठून वसिष्ठ २ मैलांवरील गांवीं गरम झऱ्यांवर स्नान उरकावें. (गंधकाचें पाणी आहे म्हणून भूक लागल्यावर पुन्हा न्याहारी करावी लागते.) परत गावांत येऊन भोजन उरकावें. सायंकाळीं धुंगरी ( हिंडिंबा देवीचें ) देऊळ व मनालसू धुवांधार पाहावी. ४) झिन्ना राणा या प्राचीन राजाच्या, बऱ्याच दंतकथा असलेला किल्ला.

या शिवाय मनालसूनाला, हमता धबधबा, भृगू ऋषींचा तलाव या सहली स्थानिक मार्गदर्शकांच्या सल्ल्यानें आखतां येतील.

७४०८८ ... ७/१०/७५ ... ६४० ... ७१३१७७

● ● ●

REFBK-0015040